

मासिक वार्तापत्र • अंक 28 • जुलै 2022 • सहयोग मूल्य - रु. 10 • 16 पाने

# कामगार बिगुल

नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक

कामगारांच्या जीवनाची विदीर्ण स्थिती, कामगार वस्त्यांमधून, कामगारांच्या तोंडून 3

राहुल गांधींची सुद्धा ईडी चौकशी: वाढत्या आर्थिक संकटापायी भांडवलदार वर्गाच्या वाढत्या दमनकारी चरित्राची अभिव्यक्ती 13

विनाशकारी पूराने वेढले आसामला 5

## ‘अग्निपथ आंदोलन’: बेरोजगारी विरोधातील आग भडकू लागलीये!

### कस्पटासमान वागणूक या देशातील युवक विसरणार नाही !

### अग्निपथ योजनेच्याच नव्हे तर कंत्राटीकरणाला जन्म देणाऱ्या भांडवलशाही विरोधात संघटित व्हा!

संपादक मंडळ

14 जून नंतर देशभरात अनेक राज्यांमध्ये आणि विशेषत: बिहार, राजस्थान, हरियाणा, पूर्व उत्तरप्रदेश, तेलंगणामध्ये केंद्र सरकारच्या ‘अग्निपथ’ या कंत्राटी सैनिक भरती विरोधात आंदोलनाचा आगडोंब उसळला. अनेक ठिकाणी आंदोलकांनी नासधूस केली, रेल्वेगाड्यांना आग लावली, आणि या योजनेला आपला तीव्र विरोध जाहीर केला. अचानक उसळलेल्या या आंदोलनाने केंद्र सरकार भांबावून गेले. फॅसिस्ट भाजप सरकारने आपल्या गैर-लोकशाही पद्धतीला अनुसरून एकाही मंत्र्याद्वारे या आंदोलनावर वक्तव्य न देता सैन्याच्या उच्च-अधिकाऱ्यांना आणि गुप्तहेर खाते प्रमुखांना पुढे केले आणि ही योजना कशी चांगली आहे याबद्दल युवकांना उपदेशाचे डोस देण्याचे काम केले. देशभरात हजारो युवकांना अटक केली गेली आहे आणि शेकडो एफ.आय.आर. दाखल झाले आहेत. आंदोलनाकडे दुर्लक्ष करत केंद्र सरकारने भरती चालू केली आहे. धमकी सुद्धा दिली गेली आहे की जे लोक आंदोलनात सहभागी होत आहेत त्यांना अग्निवीर म्हणून भरती केले जाणार नाही.

जून महिना संपता संपता आंदोलनाचे लोण ओसरले असले तरीही या संतप्त आंदोलनाने देशातील बेरोजगारीच्या भयावह स्थितीला समोर आणले तर आहेच, सोबतच या योजनेच्या माध्यमातून कॉर्पोरेट कंपन्यांना स्वस्त-आणि-शिस्तबद्ध कामगार पुरवण्याचे मोदी सरकारचे फॅसिस्ट इरादेही उघड केले आहेत.

**काय आहे ‘अग्निपथ’ योजना?**

या योजनेनुसार दरवर्षी 17.5 ते 21 वर्षे वयाच्या जवळपास 40,000 युवकांना, ज्यांना “अग्निवीर” म्हटले जाईल, सैन्याच्या तिन्ही शाखांमध्ये फक्त 4 वर्षांकरिता भरती केले जाईल आणि त्यापैकी फक्त 25 टक्के युवकांना 4 वर्षांनंतर नियमित केले जाईल. उरलेल्या 75 टक्के युवकांना पुन्हा एकदा बेरोजगारांच्या राखीव “फौजे”त सामील व्हावे लागेल. अग्निवीरांना महिन्याला रु. 30,000 पगार असेल (जो 4 वर्षात 40,000 पर्यंत जाईल) ज्यापैकी फक्त रु. 21,000 हातात येतील आणि राहिलेले रु. 9,000 साचत जातील, जे 4 वर्षांनंतर त्यांना मिळणारे अकरा लाख रु. बनतील. तेव्हा सरकार जे 11 लाख रुपये देणार आहे, ते काही ईनाम नाही तर या युवकांच्या पगाराचेच पैसे असतील. योजनेला ‘अग्निपथ’ असे “प्रखर” नाव दिले गेलेले असले तरी ही वास्तवात एक चार वर्षे “कामाची सहल” (Tour of Duty, ToD) प्रकारची योजना आहे. आजवर सैन्य दलामध्ये नियमित सैनिक भरती हा देशामधील युवकांकरिता रोजगाराच्या आशेचा एक बारिक किरण होता. परंतु अग्निपथ योजनेने या आशेला सुरूंग लावला आहे.

**अग्निवीरांना दाखवली जात आहे खोटी आशा**

अशी खोटी आशा दाखवली जात आहे की या युवकांना केंद्रिय सशस्त्र पोलिस दलात (सी.ए.पी. एफ.), रेल्वे पोलिसात, किंवा इतर सुरक्षा यंत्रणांमध्ये नोकरी मिळेल. केंद्र सरकारने असाही “इरादा” जाहीर केला आहे की या अग्निवीरांना इतर वित्तीय संस्था, बँका, इंश्युरन्स कंपन्यांमध्ये नोकरी दिली जाईल. या इराद्यांमागे किती खरेपणा आहे?

अनेक वर्षे गृहमंत्रालयाने म्हटले

पान 6 वर

## लोकशाहीची थट्टा चाललेली नाही, ही लोकशाहीच थट्टास्पद आहे!

### महाराष्ट्रात सत्ताबदल कसला? एक जाऊन दुसरे लुटखोर आलेत!

अभिजित

महाराष्ट्रात शिवसेना-राष्ट्रवादी-काँग्रेसचे सरकार जाऊन एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वातील शिवसेनेचा मोठा गट आणि भाजपचे सरकार सत्तेत आले आहे. अनेक दिवस एकनाथ शिंदेंचे “बंड” आणि त्यांनी जवळपास 40 आमदारांना घेऊन केलेला पोबारा हा बाजारगप्पांचे केंद्र बनला होता. अजूनही फडणवीसांनी कशी “फिल्डींग” लावली, आणि आमदार गुवाहाटीला कसे पळाले, आणि एकेक करून शिवसेना कशी फुटत गेली या सर्व बाजारगप्पा भांडवली मीडीयात चालूच आहेत आणि जनतेलाही असे मुद्दे जणू काही चित्तथरारक सिनेमाच असावा अशा पद्धतीने चघळायला दिले जात आहेत. चर्चांमध्ये नेहमीप्रमाणे गायब आहे ती कामगार-कष्टकरी जनतेची स्थिती, ज्या जनतेचा अजूनही या लोकशाहीवर केविलवाणा विश्वास आहे की हे सर्व निवडून दिलेले लोकप्रतिनिधी आपल्या भल्यासाठी काहीतरी करत असावेत.

काही उदारवादी नेहमीप्रमाणे लोकशाहीची थट्टा वगैरे चालली आहे असे गळे काढत बसलेत. अनेक उदारवाद्यांना तर काँग्रेस-राष्ट्रवादीची सत्ता जाऊन भाजपचे सरकार येणार या कल्पनेनेच फेफरे येत आहेत. शिवसेनेच्या तथाकथित “सेक्युलर” होण्याचे पोवाडे गाणारे भाट आता चेहरा कुठे लपवावा या विवंचनेत आहेत आणि अजूनही आशा लाऊन आहेत की सर्वोच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपाने जुने सरकार परत येईल.

**एक जाऊन दुसरे लुटखोर आलेत**

अनेक दशके काँग्रेस, किंवा राष्ट्रवादी प्रणित सरकारं आली आणि गेली. 1999-2014 काँग्रेस-राष्ट्रवादीचेच सरकार होते, 2014-19 शिवसेना-भाजपचे होते, 2019-2022 शिवसेना-राष्ट्रवादी-काँग्रेसचे सरकार होते. या सर्व काळात कामगार-कष्टकऱ्यांच्या जीवनात काय मोठा फरक पडलाय? राज्यातील 70-75 टक्के लोकसंख्या असलेल्या शेतमजूर, गरिब शेतकरी, औद्योगिक कामगार, नाक्यांवरील बांधकाम कामगार, घरकामगार, स्विगी-झॉमेटोसारखे डिलिव्हरीचे काम करणारे ‘गिग’ कामगार, पथारीवाले, हातगाडीवाले, कष्टकरी व्यावसायिक, अशा सर्व कामकऱ्यांच्या जीवनात काय फरक पडलाय? या संपूर्ण काळात रोजगार मिळणे दिवसेंदिवस दुरापास्त होत गेले आहे, मजुरीचे दर वाढणे दूरच उलट महागाईने कंबरडे मोडले आहे, करोना काळात दवाखान्यात बेड अभावी हजारोंचे जीव गेले आणि सरकारी इस्पितळांची अवस्था कुत्र खात नाही इतकी बोगस बनली आहे, शिक्षण घ्यायचे तर फियांचे आकडे छाती दडपून येईल इतके मोठे! एकीकडे या सर्व पक्षांच्या आमदार-खासदार-मंत्री-नेत्यांचे महाल वाढत गेले, यांच्या घरांवर मजले आणि यांच्या “संस्था”, कारखाने, बँका, पतपेढ्यांची कमाई रेकॉर्ड तोड वाढत गेली आणि जनतेला मात्र दोन वेळचे खाणे दुरापास्त झाले आहे!

आठवा! 2014 मध्ये सर्व पक्षांनी स्वतंत्र निवडणुका लढल्या होत्या, आणि सर्वात मोठा पक्ष

पान 15 वर

# लॉकडाऊन मध्ये सायकलवर घरी गेलेल्या मजुरांच्या सायकलींचा योगी सरकारने केला लिलाव!

✎ बिगुल प्रतिनिधी

फॅसिस्ट योगी-मोदी सरकार किती कामगार विरोधी आहे याची अजून एक घटना समोर आली आहे. कोव्हिड लॉकडाऊनच्या काळात कोट्यवधी कामगारांना प्रवासाची कोणतीही सोय नसल्यामुळे नाईलाजाने शेकडो किलोमीटर पायी किंवा सायकलवर आपापल्या गावी जावे लागले. या संपूर्ण प्रवासातही त्यांना सतत पोलिसांच्या धाकाला आणि मारालाही सामोरे जावे लागले. त्या काळात अशाच कोट्यवधी मजुरांपैकी जवळपास 25,000 मजूर उत्तरप्रदेशातील सहारनपूर येथे पोहोचले असता राज्य सरकारने त्यांना तेव्हा पुढे जाऊ दिले नाही आणि चाचण्या न करताच क्वारंटाईन म्हणून डांबून ठेवले. यापैकी हजारो कामगारांच्या सायकली तेथेच ठेवण्याची सक्ती केली गेली. यानंतर काही दिवसांनी जनतेच्या दबावाखाली त्यांची बसने घरी जाण्याची सोय केली गेली आणि त्यांच्या सायकलींच्या बदल्यात हातात फक्त एक टोकन दिले गेले.

सर्वच कामगारांच्या सायकली त्यांना परत देणे ही त्याच योगी-मोदी सरकारची जबाबदारी होती ज्यांनी त्यांना या दुःस्थितीत आणून ठेवले होते. तरीही हा भार मजुरांवर टाकण्याचे या सरकारांनी ठरवले. आपणच सांगा या मजुरांपैकी किती जणांना परत येऊन आपल्या सायकली नेण्याचा खर्च झेपणे शक्य होते? ज्यांचे रोजच हातावर पोट आहे त्यांपैकी किती जणांना सहारनपूरला भाडे खर्च करून जाणे, आणि पुन्हा भाडे खर्च करून सायकल घेऊन येणे परवडले असते? तरीही हा सर्व भार सोसत 14,600 कामगार आपल्या सायकली परत घेऊन गेले. पण नुकतेच, जून 2022 मध्ये या सायकलींपैकी जवळपास 5,400 सायकलींचा योगी सरकारने चक्क लिलाव केला आहे आणि 21 लाख रुपयांची कमाई केली आहे.

थोडक्यात आपल्याला नाममात्र मजुरीमध्ये राबण्याची सक्ती करणारी ही सरकारं, अनियोजित लॉकडाऊन लादून कोणतीही सोय न करता नरकयातना भोगायला भाग पाडणारी ही सरकारं, रोजगाराची सोय न करता आपल्याला रोज श्रमशक्तीच्या बाजारात आणून उभी करणारी ही सरकारं, गरीबांच्या पोटावर पाय आणणारी ही सरकार आपण कामगारांनी घामाच्या कमाईतून घेतलेली साधी सायकलसारखी वस्तू सुद्धा स्वतःच्या घशात घालू शकतात!

यातूनच दिसून येते की ही सरकारं किती कामगार विरोधी आहेत आणि ही तथाकथित लोकशाही अजून काही नाही तर फक्त मालमत्ता-धारकांच्या सेवेत लागलेली व्यवस्था आहे!

## कामगार बिगुलच्या दरवाढीबद्दल

**साथींनो, कामगार बिगुलची किंमत जून 2022 च्या अंकापासून रु. 10 करण्यात येत आहे.**

भांडवली वर्तमानपत्रे भांडवलदारांनी दिलेल्या कोट्यवधी रुपयांच्या जाहिरातींच्या माध्यमातून आपल्या अंकाची किंमत कमी ठेवतात आणि बदल्यात भांडवलदार वर्गाचे गोडवे गातात. कामगार वर्गाचे वर्तमानपत्र मुख्यत्वे फक्त कामगार वर्गाने दिलेल्या निधीतूनच चालू शकते. कामगार बिगुल करिता लेखन करणारे सर्व लेखक, पत्रकार आणि याच्या छपाईपासून ते वितरणापर्यंत कामात सामील होणारे विविध कामगारवर्गीय कार्यकर्ते हे सर्व काम विनामोबदलाच करत आलेत, आणि कामगार वर्गीय राजकारणाच्या प्रचाराचे काम असेच झालेही पाहिजे. परंतु छपाई आणि वितरणासारखे खर्च मात्र करावेच लागतात. गेली 7 वर्षे अंकाची किंमत रु. 5 होती. गेल्या जवळपास दोन वर्षांपासून अंक छपाईची किंमत रु. 5 च्या वर गेली होती आणि फक्त कामगारवर्गाने दिलेल्या अतिरिक्त सहयोगाच्या जोरावरच कामगार बिगुलचे अंक छापले जात होते. परंतु गेल्या वर्षभरात इतर सर्व महागाईसोबतच कागद, छपाई आणि वितरणाच्या खर्चाने सुद्धा सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत आणि अंकाची किंमत नाईलाजाने रु. 10 करावी लागत आहे. कामगार बिगुलच्या नियमित वाचकांना आणि सहयोगीदारांना आवाहन आहे की जर जनतेचा पर्यायी मीडीया उभ्या करण्याच्या, कामगार वर्गाच्या क्रांतिकारी वर्तमानपत्राच्या गरजेला आपण समजत असाल तर कामगार बिगुलला जास्तीत जास्त आर्थिक सहयोग नक्की करावा. भांडवलदारांनी दिलेल्या निधीवर नव्हे, तर जनतेच्याच जोरावर आजपर्यंत कामगार बिगुल प्रसिद्ध होत आहे, आणि आम्हाला विश्वास आहे की आपल्या साथीने यापुढेही होत राहील.

## बिगुल व्हॉट्सअ‍ॅप चॅनेल

**जर तुम्ही आमच्याशी व्हॉट्सअ‍ॅप वर जोडून घेऊ इच्छिता, तर या लिंक वर जाऊन आमचा व्हॉट्सअ‍ॅप चॅनेल जॉईन करावा :**

**http://www.marathi.mazdoorbigul.net/whatsapp**

**चॅनेल जॉईन करण्यामध्ये काही समस्या असेल तर या नंबर वर आपले नाव आणि जिल्हा लिहून पाठवावा : 9892808704**



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वतः कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**

**लेनिन**

साथींनो

'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लूट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.

- रूम नंबर 209, हिरानंदानी बिल्डिंग-7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043 मो. - 9619039793, 9082861727
- अहमदनगर : 74992 64646
- पुणे : 8669735643

## 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

**1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांत्यांचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.**

**2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.**

**3. 'कामगार बिगुल' स्वतः अशा चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य राजकीय कार्यदिशेची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य कार्यदिशेच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.**

**4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्यांच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतिकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.**

**5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.**


# कामगार बिगुल

खाजगी वितरणासाठी

| | | |
|---|---|---|
| संपादक मंडळ | : | निखील एकडे, बबन ठोके |
| संपादकीय कार्यालय : | | रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग - 7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट), मुंबई 400043 |
| संपर्क | : | 8669735643 , 9619039793 |
| ईमेल | : | kamgarbigul@gmail.com |
| सहयोग राशी | : | रु. 10 (एका अंकासाठी) |
| वार्षिक | : | रु. 120 (टपाल शुल्काशिवाय) |

# मुक्काम पोस्ट: मानखुर्द-गोवंडी

## कामगारांच्या जीवनाची विदीर्ण स्थिती, कामगार वस्त्यांमधून, कामगारांच्या तोंडून

✍बिगुल प्रतिनिधी

कोरोना काळातील लॉकडाऊन संपून एक वर्षापेक्षा जास्त काळ उलटून गेला आहे. तरी देखील महानगरातील कामगार वस्त्यातील भयावह चित्र अजून देखील बदललेले नाही. सरकारी दावे आणि घोषणाबाजी म्हणजे कामगारांच्या तोंडाला पाने पुसल्यासारखेच आहे. कामगार वस्त्यांमध्ये जाऊन कामगारांचा जगण्यासाठी सुरु असलेला संघर्ष पाहिला तर याची प्रचिती येते. मानखुर्द-गोवंडी या भागातील कामगार वस्त्यामधून खालील परिस्थिति आपल्या समोर ...


### "कोरोना आला आणि हातातले काम गेले तेव्हापासून आयुष्याची फरफट सुरु आहे."

28 वर्षीय भगवान कांबळे मागील अडीच वर्षापासून बेरोजगार आहेत. भगवान मागील दोन अडीच वर्षाबद्दल बोलतांना सांगतात की, "नवीन लग्न झाल्यावर वर्ष दोन वर्षातच हि परिस्थिति आली आणि आयुष्याच सगळ गणितच बिघडले. बेरोजगारीच्या या काळात अधून मधून मिळणारी विविध कामे करून कसे तरी घर चालवले. कोरोनामुळे हातातले काम गेले आणि दीर्घकाळ घरातच बसून राहावे लागले होते. जवळ काहीच पैसे नसल्यामुळे कोरोना काळात कोरोना झालेल्या सोसायट्यांमध्ये जाऊन रोजंदारीवर सॅनिटायझेशन करायचे काम केले. त्यानंतर झोमॅटो मध्ये तीन महिने काम केले. तिथे दहा ते बारा तास काम करावे लागत असे, या कामात फूड ऑर्डर देण्यासाठी स्वतःची गाडी वापरावी लागते, पेट्रोलसाठी वेगळे पैसे मिळत नाहीत. पेट्रोलच्या वाढत्या दामामुळे 'कमाई कमी आणि खर्च जास्त' अशी अवस्था झाली होती. ज्या ठिकाणी एका ऑर्डरसाठी फक्त 27 रुपये, आठवड्याचे पैसे पंधराशे-आठराशे ते दोन हजार म्हणजे महिन्याला जास्तीत जास्त सहा ते सात हजार असतील तिथे महिन्याचा पेट्रोलचा दोन ते तीन हजार रुपये खर्च कसा परवडणार आहे? त्यात देखील कामाचा ताण खूप जास्त असल्यामुळे मला ते काम सोडावे लागले. त्यामुळे पुन्हा बेरोजगार म्हणून कामासाठी भटकावे लागले."

भगवान पुढे सांगतात की, "झोमॅटो नंतर काही महिने बेरोजगार म्हणून कामासाठी वणवण भटकल्यानंतर पुन्हा नाईलाजाने डॉमिनोज मध्ये काम करायचे ठरवले पण तिथली परिस्थिती काही वेगळी नव्हती 'इथे पण पळसाला तीनच पान होती!' बारा ते चवदा तास काम करून देखील गाडीचे पेट्रोल, घराचे भाडे, घरात लागणारे राशन, लाईट बिल, आणि कधी काही दुखलंच तर दवाखान्याचा खर्च देखील निघत नव्हता. इथे एका ऑर्डरसाठी 27 रुपये मिळायचे आणि महिन्याची एकूण कमाई 7 ते 8 हजार पर्यंतच जात होती. त्यामुळे पुन्हा तेच चक्र सुरु झाले. शेवटी नाईलाजाने काही महिने करून हे काम देखील सोडावे लागले. त्यानंतर पुन्हा बेरोजगार म्हणून भटकंती केली आणि हाताला जे मिळालेलं ते काम करत गेलो. यातच मी मागील तीन महिन्यांपासून बेरोजगार असल्यामुळे घरीच बसून आहे, पण एक बाब बरी झाली की, बायको एका ठिकाणी कामाला लागली आणि तिला मिळणाऱ्या पगारात घरखर्च सुरु आहे."

### "जेमतेम आयुष्य जगत आहोत."

उत्तरप्रदेशातील समशेर अन्सारी मागील वीस वर्षापासून मुंबईतील गोवंडी भागात राहायला आहेत. मुंबईत आल्यावर सुरुवातीच्या काळात जी मिळतील ती कामं करत या महानगरात आयुष्याला सुरुवात झाली. नंतर समशेर हॉटेल लाईनला वळाले. सुरुवातीला अनेक छोट्या-मोठ्या हॉटेल मध्ये काम करत समशेर यांनी आपल्या कुटुंबाची उपजीविका भागवत असतांना आठ वर्षाआगोदर स्वत:चे छोटेसे कबाब पराठ्याचे हॉटेल टाकायचा निर्णय घेतला. या हॉटेलमधील दैनिक कामासाठी कोणीही पगारी कामगार ठेवलेला नाही. समशेर , त्यांची दोन मुलं आणि पत्नी मिळून हे हॉटेल चालवत असतात. यातून मिळालेल्या उत्पन्नावर आज समशेर आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. कोरोना काळातील लॉकडाऊनमुळे बिघडलेली घडी सुरळीत झाली का? असे विचारले असता समशेर सांगतात की, "कोरोना अगोदर परिस्थिति फार चांगली होती असे नाही पण थोड ठीक होतं! कोरोनातील लॉकडाऊनमुळे सर्व धंदाच उध्वस्त झाला. जवळ थोडे जमा असलेले पैसे सुरुवातीच्या काही महिन्यातच संपून गेले होते. त्यानंतरचे आयुष्य आज सुद्धा डोळ्यात अश्रू उभे करणारे होते. या कठीण परिस्थितीमधून डोकं वर काढून आज एक वर्ष झाले पण वाढलेली महागाई पाहता गॅस, तेल, व अन्य सामानाच्या किमंती आभाळाला टेकल्या आहेत. वरून जागेचे भाडे हे खूपच महागडे आहे. अशात झोपडपट्टीतील या छोट्याशा हॉटेल वर आमच्या सर्व कुटुंबाचा उदरनिर्वाह जेमतेम चालला आहे."



### "आयुष्यात कोंडी झाल्यासारखे वाटत आहे, कोरोना पासून कामधंदे चौपट झाले आहेत."

गोवंडी मधील झाकीर हुसैन नगर मध्ये राहणारे शब्बीर शाह मुंबईतील दारूखाना या भागात शिपयार्ड वर्कशाप मध्ये मोटर मेकॅनिक म्हणून काम करतात. शब्बीर यांच्या कामाचे स्वरूप तसे फिरस्ती कामाचे आहे. दारूखान्यात जहाजाच्या डागडूगीचे अनेक इंजीनिअरिंग वर्कशाप आहेत. त्यात अनेक वेगवेगळ्या कामासाठी लागणाऱ्या मशीन्सच्या मोटार मिळतील तशा रिपेयरिंग करणे हे काम आहे. शब्बीर भावनिक होऊन आपल्या हतबलतेबद्दल सागतांना बोलतात की, "कोरोना अगोदर थोडे काम मिळत होते पण आज कोरोना संपून एक वर्ष झाले तरी पाहिजे तसे काम मिळत नाही. माझे रहायचे ठिकाण आणि कामाचे ठिकाण यात 20 कि.मी अंतर आहे. कामाच्या इलाक्यात पण बरंच फिरावे लागते त्यामुळे मोटारसायकल शिवाय दुसरा पर्याय नाही आणि आज पेट्रोलचे भाव पहिले तर माझे प्रत्येक महिन्याचे अडीच ते साडेतीन हजार रुपये खर्च होत आहेत. अशात कमावणार काय आणि घरखर्च चालवणार कसा? अनेक वेळेस तर काम करून देखील वर्कशॉपवर पैशासाठी अनेक वेळेस फेऱ्या माराव्या लागतात. घरात लागणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंच्या आणि राशन-पाण्याच्या किंमती देखील प्रचंड वाढल्यामुळे खूप काटकसर करून देखील प्रत्येक महिन्याला तारेवरची कसरत करून जीवन जगत आहोत. त्यात मुलांच्या शाळेचा खर्च वाढत चालला आहे. तीन मुलांच्या आरोग्याच्या अडचणी उभ्या राहिल्या कि पुरतं खचून गेल्यासारखं वाटते. कितीही हातपाय मारले तरी किमान गरजा देखील पूर्ण होत नाहीत. आयुष्याची कोंडी झाल्यासारखे वाटत आहे."

### "आमच्या दोघा नवरा बायकोचे पोट भरणेच अवघड असल्याने गरोदर राहायचा पण विचार केला नाही!"

27 वर्षीय आरती कोरोना महामारीपासून बेरोजगार आहे. त्या सांगतात की, "कामाची वणवण करून देखील कुठेच काम मिळत नाही. नवऱ्याच्या हाताला मागील दोन वर्षापासून नियमित काम नाही, अशात मी गरोदर झाल्यावर घरातील घरखर्च चालवायला देखील पैसे नव्हते. त्यात माझ्या आरोग्याकडे खूप दुर्लक्ष झाले आणि दोन महिन्याची गरोदर असताना पोटात दुखत असल्याने दवाखान्यासाठी देखील पैसे नव्हते. सरकारी दवाखान्यात गेल्यावर सरकारी डॉक्टरांनी माझ्या आरोग्याकडे कोणतेच लक्ष दिले नाही आणि पोटात प्रचंड दुखत असल्याने माझं दोन महिन्याचं बाळ पोटातच मरण पावलं! त्यानंतर माझी तब्येत बराच काळ खराब झाली होती, मानसिक स्वास्थ्य बिघडले होते. लग्नाला चार वर्ष होऊन देखील मुलं नाही म्हणून सासू आणि इतर नातेवाईक अगोदर बोलत असत त्यामुळे मानसिक घुसमट देखील होत होती. अशा कठीण परिस्थितीतून मी आणि माझा नवरा एकमेंकांना मानसिक आधार देत बाहेर आलो आणि आम्ही तेव्हाच ठरवलं की, "जो पर्यंत आमच्या दोघाच्या हाताला काम लागत नाही, घराची विस्कळीत झालेली घडी थोडी नीट बसत नाही, तो पर्यंत बाळाचा विचार करायचा नाही." आता मी मागील पाच महिन्यापासून एका सुपर मार्केट मध्ये कामाला लागली आहे. त्यांतून मिळणाऱ्या पैशातच नवरा बेरोजगार असतांना घरचा घरखर्च कसातरी सुरु आहे."

### "आयुष्याचा कचरा झाला आहे."

पन्नालाल गुप्ता अगोदर साठेनगर आणि मानखुर्द गोवंडीतील झोपडपट्टीत घरोघरी जाऊन स्टोव्ह आणि गॅस रिपेरिंगचे काम करत असत. दिवसभर वणवण भटकंती करून आयुष्याच्या किमान गरजा भागत नसल्यामुळे अनेक दिवस हे काम करून कंटाळून गेले होते. त्यामुळे त्यांनी दुसरे काम करायचे ठरवले; पण इतर कुठेच चांगल्या पैशाचे काम मिळत नव्हते. शेवटी कंटाळून महानगरपालिकेत कचरा गाडीवर काम करायचे ठरवले. पन्नालाल सांगतात की, "हे काम नियमित असल्यामुळे थोडं बर आहे, पण घाणीचे काम असल्यामुळे मला आरोग्याच्या अडचणी यायला लागल्या आहेत. त्यात प्रत्येक महिन्याला दवाखान्यात बराच पैसा खर्च होतो. आजारी झालो तर कामावर सुट्ट्या देखील पडतात, त्यामुळे ठेकेदार त्या दिवसाचा पगार कापून घेतो. कामाच्या ठिकाणी घाणीत हात घालून काम करावे लागते. सुरक्षेसाठी मिळणारी हॅन्डग्लोव्ह, गमबूट देखील दिले जात नाहीत. ठेकेदार या सुरक्षा साधनांना चेऊन विकून टाकतो आणि आम्हाला देत नाही. विचारायला गेलो तर 'काम करायचे असेलं तर करा नाहीतर सोडून द्या!' असे बोलतो. इतर कुठे काम मिळत नाही म्हणून नाईलाजाने हे घाणीचे काम करावे लागत आहे. सकाळी पाच वाजता उठून कामाला जावे लागते तरी पण आयुष्यात काहीच बदल होत नाही. गरिबांना सरकार कडून कोणतीच मदत मिळत नाही; उलट महागाई दिवसेंदिवस वाढत चालली आहे. अशात घरभाडे, मुलांचे शिक्षण, राशन औषध-पाणी, अशा गरजा भागवताना दमछाक होत आहे."

राज्य आणि देश विकास करत असल्याच्या गमजा मारणारे मोदी सरकार, आणि दलालीचे तुकडे खाण्यासाठी आपसात साठमारी करणारे महाराष्ट्रातील शिवसेनेचे गट, भाजप, काँग्रेस-राष्ट्रवादीची ठाकरे-शिंदे सरकारे याच पद्धतीने गरिब कामगार-कष्टकऱ्यांनी रक्त-घाम गाळून संपत्ती निर्माण करत रहावी आणि मालकांचा भांडवल संचय वाढवावा यासाठीच काम करतात हे स्पष्ट आहे.


# दाभोळकर खूनाचा रखडलेला तपास: फॅसिस्ट खुन्यांना वाचवण्याचे कारस्थान


✎ प्रवीण एकडे

येत्या 20 ऑगस्टला डॉक्टर नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्येला 9 वर्ष पुर्ण होतील. 20 ऑगस्ट 2013 रोजी दोन दुचाकीस्वार बंदूकधाऱ्यांनी गोळ्या झाडून पुण्यातील ओंकारेश्वर मंदिराजवळील पुलावर दाभोळकरांची हत्या केली होती. 9 वर्ष उलटून गेली तरी त्यांच्या खुन्यांना शिक्षा झालेली नाही. दाभोळकरांच्या खुनाची चौकशी गोगलगायीलाही लाजवेल अशा संथ गतीने सुरू आहे. या दिरंगाईमुळे महाराष्ट्र पोलीस आणि केंद्रीय तपास यंत्रणांच्या (CBI) आतापर्यंतच्या चौकशीवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. दाभोळकरांची हत्या झाल्यानंतर जवळपास 7-8 वर्ष तर फक्त ट्रायल सुरू व्हायलाच लागली आहेत. दाभोळकरांचा खून झाला तेव्हा काँग्रेस-राष्ट्रवादी युतीचे सरकार होते त्यानंतर 5 वर्ष फॅसिस्ट भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वातील सरकार आणि मागील 2.5 वर्षांपासून राज्यामध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना यांची युती असलेले महाविकास आघाडीचे सरकार होते. या संपूर्ण 9 वर्षाच्या काळात महाराष्ट्रातील सर्व प्रमुख भांडवली पक्षांची सरकारं राज्यात सत्तेत येऊन गेली, मात्र आज पर्यंत दाभोळकरांच्या खुनाची चौकशी पूर्णत्वास जाऊ शकलेली नाही. यातून स्पष्ट होते की फॅसिस्ट भारतीय जनता पार्टीचे सरकार तर तपास करणार नव्हतेच पण काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस सारख्या तथाकथित धर्मनिरपेक्ष, प्रगतिशील समजल्या जाणाऱ्या भांडवली पक्षांकडूनही न्यायाची अपेक्षा करणे फोलच होते.


नरेंद्र दाभोळकर हे व्यवसायाने डॉक्टर होते, सोबतच सामाजिक कार्यकर्ते आणि बुद्धिप्रामाण्यवादी होते. दाभोळकरांनी 1989 मध्ये महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची स्थापना केली आणि तिचे ते अध्यक्ष बनले. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या स्थापने मागचा हेतू होता अंधश्रद्धा निर्मूलन करणे, अंधश्रद्धेचा प्रचार प्रसार करणाऱ्या बाबा-बुवा यांना उघडे पाडणे आणि जनतेमध्ये अंधश्रद्धेविरुध्द जनजागृती करणे. दाभोळकरांनी अंधश्रद्धा विरोधी कायदा आणि जादूटोणा विरोधी कायदा बनावा यासाठीही अनेक प्रयत्न केले. समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा ही दाभोळकरांची इच्छा होती. दाभोळकर साधना या साप्ताहिकाचे संपादकही होते. दाभोळकरांच्या या विचारांमुळेच त्यांना हिंदुत्ववादी फॅसिस्ट संघटनांच्या विरोधाचा सामना करावा लागला. खासकरून सनातन संस्थेसारख्या हिंदुत्ववादी धर्मवादी संघटनेकडून. दाभोळकरांवर हिंदू विरोधी असल्याचा आरोप करून त्यांना जीवे मारण्याच्या अनेक वेळा धमक्याही सनातन संस्थेकडून आल्या होत्या. दाभोळकरांची हत्या आणि त्यानंतर झालेल्या पानसरे, कलबुर्गी आणि गौरव लंकेश यांच्या हत्या, या चारही हत्या एकमेकांना जोडलेल्या आहेत आणि त्यांचे खुनीही एकमेकांशी संबंधित आहेत, हे तर उघडच होते आणि आता तपासाच्या समोर आलेल्या बातम्यांमधून स्पष्ट होत आहे. अर्थात तपासात पुरावे गोळा करताना योग्य पद्धत वापरली गेली आहे की नाही आणि कमजोर धागे किती सोडले गेले आहेत याबद्दल साशंकताच जास्त आहेत.

दाभोळकरांच्या हत्येचा तपास आधी महाराष्ट्र पोलिसांकडे होता, नंतर तो केंद्रीय अन्वेषण विभागाकडे (CBI) सोपवण्यात आला. आज पर्यंत घडलेल्या गोष्टींचे योग्य विश्लेषण केले तर लक्षात येते की दाभोळकरांच्या हत्येचा तपास जाणीवपूर्वक भरकटवला गेला आहे, जेणेकरून खरे गुन्हेगार आणि त्या गुन्हेगारांना पोसणारी संघटना समोर येऊ नये. तपास रखडवण्याचे









काम अगोदर पृथ्वीराज चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील भांडवली काँग्रेस सरकारने केले आणि नंतर फॅसिस्ट भारतीय जनता पक्षाच्या सरकारने. दाभोळकरांची हत्या झाली तेव्हा काँग्रेस-राष्ट्रवादी काँगेस पक्षाचे सरकार होते. नरेंद्र दाभोळकरांच्या हत्येचा तपास करण्याची जबाबदारी तेव्हा महाराष्ट्र पोलिसांकडे होती. महाराष्ट्र पोलीस खुनाचा तपास करत असताना, पुणे पोलिसांनी 30 जणांची टीम तयार केली. या टीमच्या तपासादरम्यान मनीष नागोरी आणि विकास खंडेलवाल या दोघांना अटक केली गेली. त्या दोघांनाही 2 महिन्यांनंतर कोर्टाकडून जामीन मिळाला आणि त्यांच्यावर पुन्हा त्यानंतर कधीच आरोपपत्र दाखल करण्यात आले नाही. खूनाच्या तपासाकरिता एक वर्षे हा फार मोठा अवधी होता, आणि या अवधीत महाराष्ट्र पोलिसांची कामगिरी अत्यंत ढिसाळ होती.

एका वर्षातच मे 2014 मध्ये खुनाचा तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडे (CBI) सोपवण्यात आला, थोडक्यात मोदी सरकारच्या अखत्यारीत हा तपास गेला. केंद्रीय अन्वेषण विभागाचा तपास एवढ्या मंद गतीने सुरू होता की मुंबई उच्च न्यायालयानेही अनेक वेळा त्यांच्या तपासावर प्रश्न चिन्ह उपस्थित केले आहेत. दाभोळकरांच्या कुटुंबाने मुंबई उच्च न्यायालयाला विनंती केली होती की न्यायालयाने केंद्रीय अन्वेषण विभागाच्या तपासावर स्वतः लक्ष ठेवावे. केंद्रीय अन्वेषण विभागाने चौकशी करणाऱ्या एका महत्वाच्या अधिकाऱ्याची तडकाफडकी बदली केली होती ज्यावर दाभोळकरांच्या कुटुंबाने प्रश्न उपस्थित केले होते. पुढे 2 वर्षांनी केंद्रीय अन्वेषण विभागाने पहिली अटक केली. 10 जून 2016 ला हिंदुत्ववादी फॅसिस्ट संघटना सनातन संस्थेच्या वीरेंद्र तावडेला अटक केली गेली. तावडेला दाभोळकरांच्या हत्येचा मुख्य सूत्रधार समजले जाते, तसेच पानसरेंच्या हत्येतीलही हा मुख्य आरोपी आहे. सप्टेंबर 2016 मध्ये केंद्रीय अन्वेषण विभागाने न्यायालयात सांगितले होते की सारंग अकोलकर आणि विनय पवार हे मुख्य खुनी आहेत आणि त्यांनीच दाभोळकर यांच्यावर गोळ्या झाडल्या होत्या.

पुढे ऑगस्ट 2018 मध्ये शरद काळसकर आणि संतोष अंडूरे या सनातन संस्थेच्या सदस्य आणि शुभचिंतकांना केंद्रीय अन्वेषण विभागाकडून अटक करण्यात आली. यांना सुध्दा दाभोळकरांवर गोळ्या झाडल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली होती. त्यामुळे सप्टेंबर 2016 च्या न्यायालयीन सुनावणी दरम्यान दाभोळकरांवर गोळ्या झाडणाऱ्यांबद्दलचा जो दावा केंद्रीय अन्वेषण विभागाकडून करण्यात आला होता त्यावर प्रश्न चिन्ह उभे राहिले. यातील शरद काळसकर हा व्यक्ती दाभोळकर, पानसरे आणि गौरी लंकेश या तिघांच्याही खुनातील सामाईक धागा (COMMON THREAD) असल्याचे समजले जाते. या नंतर हिंदू जनजागृती समितीच्या अमोल काळे यालाही दाभोळकरांच्या हत्येच्या खटल्यात अटक करण्यात आली. अटक झालेल्यांपैकी काळसकर याने कबुलीही दिली आहे की त्याला सनातन संस्थेने बंदूक चालवायचे प्रशिक्षण दिलेले आहे आणि त्याने दाभोळकरांना दोन गोळ्या सनातन संस्थेच्या आदेशाखाली मारल्या आहेत.

मे 2019 मध्ये हिंदू विधिज्ञ परिषदेचे वकील संजीव पुनाळेकर आणि सनातन संस्थेच्या विक्रम भावेलाही अटक झाली. वकील पुनाळेकरवर आरोप आहे की त्याने हत्यार नष्ट करायला काळसकरला मदत केली होती. भावे वर आरोप आहे की त्याने दाभोळकरांवर हत्येच्या आधी पाळत ठेवली होती. पुनाळेकर आणि भावे दोघे सुद्धा सध्या जामिनावर बाहेर आहेत, तर इतर तिघे म्हणजे तावडे, अंडूरे आणि काळसकर हे न्यायालयीन कोठडीत आहेत. दाभोळकरांची हत्या होऊन 8 वर्षे उलटून गेल्यानंतर सप्टेंबर 2021 मध्ये पुण्यातील विशेष न्यायालयाने अखेर आरोपपत्र दाखल केले. या आरोपपत्रामध्ये तावडे याला दाभोळकरांच्या हत्येमागील मुख्य सूत्रधार असल्याचे, सचिन अंडूरे आणि शरद काळसकर या दोघांना मुख्य खुनी ज्यांनी दाभोळकरांना गोळ्या मारल्या असल्याचे, तर भावे आणि पुनाळेकर यांच्यावर इतर आरोप दाखल करण्यात आले. दाभोळकरांची हत्या झाल्यानंतर 8 वर्ष आरोपपत्र दाखल करायला लागली. 8 वर्ष फक्त आरोपपत्र दाखल करायला लागत असतील तर केंद्रातील फॅसिस्ट मोदी सरकार कडून लवकरात लवकर दाभोळकरांच्या खुनाच्या खटल्याचा सोक्षमोक्ष लागेल ही अपेक्षा करणे चुकीचेच ठरेल.

सनातन संस्थेला दाभोळकर तसेच पानसरे, कलबुर्गी आणि गौरी लंकेश यांच्या हत्येशी जोडणारे एवढे पुरावे असतानाही आज पर्यंत सनातन संस्थेवर काहीच कारवाई करण्यात आलेली नाही. एकीकडे सनातनवर बंदी घालण्याची मागणी पुन्हा जोर धरू लागली आहे, तर दुसरीकडे हा संस्थेला बदनाम करण्याचा डाव असून त्याच्या विरोधात सर्व हिंदू धर्मियांनी एक होण्याचे आवाहन संस्थेने केले आहे. सध्या देशात पसरत असलेली धार्मिक कट्टरतेची लाट आणि त्याला फॅसिस्ट मोदी सरकारकडून मिळत असलेले पाठबळ आणि तथाकथित उदारवादी पक्षांची शरणागती पाहता, सनातन संस्थेवर बंदी घातली जाईल अशी अपेक्षा करणे मुर्खपणाचेच ठरेल. फॅसिझम हे संकटात सापडलेल्या भांडवलशाहीचे अपत्य असते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि त्यांच्या पिलावळ संघटनांची हिंमत वाढण्याचे मुख्य कारण हा देशाच्या खऱ्या राज्यकर्त्या वर्गाचा, भांडवलदार वर्गाचा, भरभक्कम पाठींबा हे आहे. भांडवलाच्या पाठिंब्याशिवाय फॅसिझम कधीच असा उफाळून येऊ शकत नाही. हे विसरून चालणार नाही की काँग्रेस-राष्ट्रवादीच्या सरकारांच्या काळातच सनातन संस्थेसारख्या हिंदुत्ववादी फॅसिस्ट संघटना उफाळून आल्या आहेत आणि त्यांना वाव देण्याचे काम याच सरकारांनी केले आहे. आर्थिक संकटाने भांडवलदार वर्गाला एकीकडे फॅसिस्ट पक्षांना पाठिंबा देण्याकडे नेले आहे, तर दुसरीकडे याच भांडवलदार वर्गाने पोसलेले तथाकथित उदारवादी पक्ष सुद्धा अधिकारशाहीकडे वळलेले आहेत आणि फॅसिस्ट संघटनांना खुली मोकळीक देत आहेत.

एक तर्कवादी आणि बुद्धिजीवी म्हणून दाभोळकरांचा जीवनसंघर्ष आणि फॅसिस्टांनी केलेली त्यांची हत्या, फॅसिस्टांना सगळ्यात जास्त कशाचे भय वाटते, याचीच साक्ष देतात. ते तर्काला घाबरतात, विज्ञानाला घाबरतात, संशोधनाला घाबरतात, सत्याच्या शोधाला घाबरतात आणि ज्ञानाला घाबरतात. दाभोळकरांची हत्या म्हणजे तर्कवाद्यांच्या हत्यांच्या साखळीतील आणखी एक हत्या होय. फासिवाद्यांनी सत्तेत आल्यानंतर बिनधोकपणे हत्यांची मालिका सुरू केलेली आहे. दाभोळकर, पानसरे, कलबुर्गी तसेच गौरी लंकेश यांच्या हत्येचे उघडपणे ट्विटरवर व अन्य समाज माध्यमांवर फॅसिस्टांकडून स्वागत केले जाते यावरून फॅसिस्टांचा सध्याचा फुगीर बेदरपणा दिसून येतो. आज जनतेची मुस्कटदाबी करण्याचे कारस्थान देशभरात सुरू असताना अभिव्यक्तीचे धोके पत्करणे आणि अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्यासाठी झुंजार संघर्ष उभारणे ही दाभोळकरांच्या शहादतीला दिलेली खरी आदरांजली ठरेल.

# विनाशकारी पूराने वेढले आसामला

✎अविनाश

आसाम एका भयंकर पूराच्या संकटातून जात आहे आणि तेथील जनजीवन उध्वस्त झाले आहे. पूर आला त्याचवेळी आसामची राजधानी गुवाहाटी मात्र महाराष्ट्राच्या राजकारणाचा आखाडा बनली होती. (एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात शिवसेनेच्या आमदारांनी "आपल्या" पक्षाविरोधात बंडाचा झेंडा उचलला होता. हे आमदार 22 जून रोजी गुवाहाटीला गेले होते.) अशामध्ये आसामचा पूर नाही तर महाराष्ट्राचे राजकारण भांडवली प्रसारमाध्यमांसाठी बातमी बनलेले होते. आसाम मध्ये प्रत्येक वर्षी येणारा पूर आणि सरकारी अव्यवस्थेमुळे जाणारे बळी हा कधीही या नेत्यांसाठी आणि भांडवली मीडीयासाठी चिंतेचा विषयच राहिलेला नाही. विनाशकारी पूरांच्या या आपदेने आसामच्या जनतेची मोठी दुर्दशा करून ठेवली आहे.

### आसाममध्ये पूरस्थिती

आसाममध्ये गेला महिनाभर पावसाचा कहर चालू आहे आणि अभूतपूर्व असे नुकसान झाले आहे. आसममध्ये जून महिन्यात 109 टक्के अधिक पाऊस झाला आहे. हवामान खात्यानुसार राज्यामध्ये सर्वसाधारणपणे 252.8 मिलीमीटर पाऊस होतो, पण त्या तुलनेत यावर्षी 528.5 मिलीमीटर पाऊस झाला आहे. 28 जून 2022 पर्यंत 28 जिल्ह्यांमधील 24.92 लाख लोक पूराने प्रभावित झाले होते आणि मरणाऱ्यांची संख्या 139 झाली होती. जबरदस्त पावसामुळे आसामच्या कछार जिल्ह्यातील सिलचरचा बहुतांशा भाग पाण्याखाली गेला होता. ब्रह्मपुत्रा, बेकि, कोपिली, बराक आणि कुशियारा नद्या धोक्याच्या पातळीवर वहात होत्या. आसामच्या डिझास्टर मॅनेजमेंट अथोरिटी (ए.एस. डी.एम.ए.) च्या मते राज्यातील एकून 72 महसूल मंडळांमध्ये 2,389 गावे पुराने प्रभावित झाली होती आणि 1,76,201 लोकांनी 555 मदत-शिबिरांमध्ये आसरा घेतला होता. पूराच्या पाण्याने 155 रस्ते आणि 5 पूल नष्ट केले होते, आणि 7 तटबंद्या तुटल्या होत्या, ज्यापैकी 5 हैलाकांडी मध्ये होत्या आणि 2 विश्वनाथ येथे. याशिवाय 85,673 हेक्टरचे पीकक्षेत्र पाण्याखाली गेले आहे आणि 4,304 जनावरे वाहून गेली आहेत.

आसाम सरकारच्या अधिकृत वेबसाईटनुसार नद्यांचे विशाल जाळे असलेले आसाम राज्य पूर आणि धूप या नैसर्गिक संकटांनी ग्रस्त आहे, ज्यामुळे राज्याच्या विकासावर सतत विपरित परिणाम झाला आहे. 50 पेक्षा अधिक जोडनद्या असलेल्या ब्रह्मपुत्रा आणि बराक नद्या दरवर्षी पावसाळ्यात पूर आणि सोबत विनाश घेऊन येतात. देशातील इतर राज्यांशी तुलना केली तर आसाममध्ये पूर आणि त्यामुळे होणारी जमिनीची धूप या समस्या सर्वात तीव्र आणि वेगळ्या आहेत. राष्ट्रीय पूर आयोग (आर. बी.ए.) च्या मते आसाममध्ये पूर संभाव्य क्षेत्र 31.05 लाख हेक्टर आहे (राज्याचे एकूण क्षेत्रफळ 78.523 लाख हेक्टर आहे). म्हणजे आसाममध्ये एकूण जमिनीच्या 39.58 टक्के क्षेत्र पूरसंभाव्य आहे आणि हे क्षेत्र देशातील पूरसंभाव्य क्षेत्राच्या जवळपास 9.40 टक्के आहे. रेकोर्ड्स नुसार पूराने प्रभावित होणारे क्षेत्र सरासरी 9.31 लाख हेक्टर आहे. संपूर्ण देशातील पूरग्रस्त क्षेत्राच्या जवळपास 10.2 टक्के क्षेत्र आसाममध्ये आहे, परंतु आसाममधील पूरग्रस्त क्षेत्र राज्यातील क्षेत्रफळाच्या 39.58 टक्के आहे.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात आसामला 1954, 1962, 1972, 1977, 1984, 1988, 1998, 2002, 2004 आणि 2012 मध्ये मोठ्या पुरांना सामोरे जावे लागले आहे. जवळपास दरवर्षी पुराच्या तीन ते चार लाटा येतात, आणि आसामच्या मोठ्या भागांना उध्वस्त करतात. पुरांमुळे दरवर्षी सरासरी 200 कोटी रुपयांचे नुकसान होते आणि विशेषत: 1998 मध्ये 500 कोटी रुपयांचे आणि 2004 मध्ये 771 कोटी रुपयांचे नुकसान झाले.



### आसाम मध्ये दरवर्षी पूर का येतात?

आसाममध्ये पूर हा जीवनाचा एक भाग राहिलेला आहे. अनेक शतकांपासून दक्षिण-पश्चिम मौसमी पावसानंतर आसामच्या खालच्या भागात पूर येत राहिलाय, आणि त्यामुळेच याला 'पूराचे मैदान' म्हणून ओळखले जाते. कधी काळी लोक पुराची वाट पहात असत, कारण की खनिज-युक्त पाणी त्यांच्या जमिनींच्या सुपिकतेला भरून काढत असे. अलिकडच्या काळात मात्र पूरामुळे होणाऱ्या नुकसानीत प्रचंड वाढ झाली आहे. याचे एक प्रमुख कारण आसामची नैसर्गिक भौगोलिक स्थिती असले, तरी भांडवली विकासाने आणि नफ्याच्या हव्यासाने यामध्ये प्रचंड भर टाकली आहे.

### 1. ब्रह्मपुत्रा नदी

हिमालयाच्या तळाशी वसलेल्या आसाममध्ये दोन प्रमुख नद्यांची खोरी आहेत - ब्रह्मपुत्रा आणि बराक, आणि दोन डोंगराळ जिल्ह्यांसहीत 20 पेक्षा जास्त मोठ्या नद्या आणि 50 सहाय्यक नद्यांचे एक मोठे जाळे आहे. शक्तिशाली ब्रह्मपुत्रा नदी हिमालयातून निघते आणि बंगालच्या खाडीत जाण्याअगोदर अरुणाचल प्रदेशातून भारतात येते. ही नदी 5.46 किलोमीटरच्या सरासरी रुंदीने जवळपास 650 किलोमीटरचे अंतर आसाममध्ये वाहते, आणि त्यामुळेच पूर-मैदानांना ओलांडणारी ही प्रमुख नदी आहे. 5000 मीटरपेक्षा जास्त उंचीवर कैलास-श्रेणीतून येणारी आणि आसामात प्रवेश होईपर्यंत अत्यंत गाळयुक्त होणाऱ्या या नदीची सरासरी 2.82 मीटर प्रती किलोमीटरची खोली 0.1 मीटर प्रति किलोमीटर इतकी कमी होते. खोली कमी झाल्यामुळे वेग कमी होतो आणि नदीतळात मोठ्या प्रमाणात गाळ व पहाडी भागातून जमा झालेले अवशेष यामुळे पाण्याचा स्तर वाढतो. उन्हाळ्यात हिमनगांचे बर्फ पघळून मातीचे क्षरणही होते आणि गाळाचे अवसादन वाढते. याशिवाय पूर्वोत्तर राज्यांमध्ये पावसाळाही तीव्र असतो. राज्यातील डिसास्टर मॅनेजमेंट अथोरिटी च्या मते, जून-जुलै मध्ये सर्वाधिक पावसासोबतच वर्षभरात 2900 मिलीमीटर पाऊस पडतो. आसामच्या जल संसाधन मंत्रालयाचे म्हणणे आहे की ब्रह्मपुत्रा खोऱ्यात वार्षिक पावसाच्या 85 टक्के पाऊस पावसाळ्याच्या काळात होतो. याशिवाय खोऱ्यात एप्रिल-मे मध्ये सुद्धा चांगला पाऊस होतो जो वादळी पाऊस असतो, आणि जूनमध्ये होणाऱ्या जास्त पावसात भर टाकतो.

एक दुसरे उल्लेखनीय कारण हे आहे की आसाम भुकंपाच्या दृष्टीने सक्रिय क्षेत्र आहे. नजिकच्या काळात बांधकामांमुळे अनेकदा भूस्खलन झाले आहे. भूकंप आणि भूस्कलनामुळे सुद्धा गाळ आणि अवशेष नदीमध्ये ढकलले जातात, जे नदीच्या तळाला अजून वर उचलतात आणि पूराचा धोका वाढवतात.

### 2. नदी किनाऱ्याची धूप

गाळ वाहणाऱ्या नद्या आणि त्यांच्या सहाय्यक नद्या आसामात सोबत गाळ आणि माती वाहून आणतात. जमिनीची धूप होते आणि अधिक क्षेत्रफळ मिळाल्यामुळे नद्या विस्तारतात, आणि परिणामी पूर येतात. नद्यांच्या किनारी जमिनीची धूप आसामसाठी एक गंभीर समस्या बनली आहे, आणि पुरामुळे गावे लुप्त झाल्यामुळे लोकांचे राज्यांतर्गत विस्थापन सुद्धा होत आहे. आसामात काही जागी किनारपट्टीची धूप झाल्यामुळे ब्रह्मपुत्रेची रुंदी 15 किलोमीटर पर्यंत वाढली आहे.

आसाम सरकारद्वारे हवामान परिवर्तनावरच्या एका अहवालात म्हटले आहे की 1950 पासून ब्रह्मपुत्रा आणि तिच्या सहाय्यक नद्यांद्वारे 4.27 लाख हेक्टर जमिनीची धूप झाली आहे, जे राज्यातील एकूण जमिनीच्या जवळपास 7.5 टक्के आहे. दरवर्षी सरासरी जवळपास 8,000 हेक्टर जमिन नष्ट होत आहे. नदीकिनाऱ्याची धूप झाल्यामुळे आसामात शेतजमीन कमी होत आहे. आसामात 3,800 वर्ग किलोमीटरपेक्षा अधिक शेतजमीन, म्हणजे जवळपास सिक्कीमच्या आकाराच्या निम्मी, 1954 नंतर गायब झाली आहे.

### 3. भांडवली लूट आणि नफा

भांडवली उत्पादन व्यवस्थेमध्ये नफ्याकरिता निसर्गाचे कोणत्याही प्रमाणात शोषण ग्राह्यच मानले जाते. परिणामी तात्कालिक नफा समोर ठेवून अनिर्बंध "विकास" योजना आखल्या जातात, ज्या पर्यावरणाचे दीर्घकालिक नुकसान करवतात. बंधारे, धरणे वा कालवे बांधताना किंवा कोणतीही "विकास योजना" राबवताना निसर्ग आणि शाश्वत विकासाला केंद्रस्थानी न ठेवता फक्त कंत्राटे देऊन दलाली खाण्याला प्राधान्य दिले जाते. आसाममध्ये झालेल्या अनियंत्रित भांडवली विकासामुळे पूरांनी घडवलेल्या नुकसानीत मोठी भर टाकली आहे.

नदीचा प्रवाह मर्यादित करण्यासाठी बंधारे बांधले जातात. तथापि, हा उपाय काळाच्या ओघात आसाममध्ये आता वाढीव आव्हान म्हणून विकसित झाला आहे. पूर आटोक्यात आणण्यासाठी 1960 च्या दशकात आसाममध्ये बंधारे बांधण्यास सुरुवात झाली. सहा दशकांनंतर, यापैकी बहुतेक बंधारे एकतर कामातून गेले आहेत किंवा खराब स्थितीत आहेत आणि इतर अनेक वाहून गेले आहेत. दरवर्षी पावसाळ्यानंतर पूर आल्यावर नदीचे पाणी हे अडथळे तोडते आणि घरे व जमिनीत घुसते. आसाममधील मागील सरकारांनी गेल्या सहा दशकांत तटबंदीच्या बांधकामावर सुमारे 30,000 कोटी रुपये खर्च केले आहेत. दरवर्षी विनाशाच्या कहाण्या या अडथळ्यांच्या कुचकामीपणाचा पुरावा आहेत.

जंगलतोड, टेकडीतोड, अतिक्रमण आणि पाणथळ जमिनींचा नाश यासारख्या भांडवलदारांनी निर्मिलेल्या इतर कारणांमुळेही पूरस्थिती बिघडली आहे. बंधाऱ्यांमुळे नदीकाठी अतिक्रमण झाले आणि वाढत्या संख्येने लोकांनी नदीजवळ घरे बांधली आणि आस्थापने उभारली. राज्यातही लोकसंख्या वाढली आहे. ब्रह्मपुत्रा खोऱ्यातील लोकसंख्येची घनता 9 वरून 29 व्यक्ती प्रति चौ.कि.मी. इतकी वाढली आहे.

इंटरनॅशनल जर्नल फॉर रिसर्च इन अप्लाइड सायन्स अँड इंजिनीअरिंग टेक्नॉलॉजीने प्रकाशित केलेल्या शोधनिबंधात म्हटले आहे की पाणी-निचरा व्यवस्था सुधारण्यासाठी आसाममधील पाणथळ जागा आणि स्थानिक जलस्रोतांना पुन्हा निर्माण केले पाहिजे, जे जास्तीचे पाणी काढून टाकण्यासाठी काम करू शकतील आणि पाणी साचण्यास प्रतिबंध करू शकतील. "यासाठी ब्रह्मपुत्रा पूरक्षेत्रातील अतिक्रमणे हटवावी लागतील. मोडतोड आणि देखभालीसाठी स्थापित व्यवस्था आहे हे बघण्यासाठी तटबंदींची नियमितपणे पाहणी केली गेली पाहिजे; पहिली पायरी म्हणजे कारकून-कंत्राटदार संबंध तोडणे, ज्याने पूर हा सिस्टीममधून पैसे काढण्याचा सोपा मार्ग बनला आहे," असे हा लेख म्हणतो.

राज्य सरकारच्या हवामान बदलावरील अहवालानुसार, हवामान बदलामुळे आसाममध्ये अधिक वारंवार आणि गंभीर पूर येण्याची शक्यता आहे. अतिवृष्टीच्या घटनांमध्ये 38 टक्के वाढ होईल, असे अहवालात म्हटले आहे. पावसाळ्यात सामान्य पावसाच्या ऐवजी वारंवार कमी किंवा जास्त पाऊस पडणे आणि वाढत्या तापमानामुळे हिमनद्या वितळणे याचा अर्थ असा होतो की हिमालयातील नद्या आसाममध्ये प्रवेश करण्यापूर्वी अधिक पाणी आणि गाळ वाहून आणतील. यामुळे सखल भागात वारंवार पूर येण्याची शक्यता वाढते.

अशा परिस्थितीत एकीकडे सरकारच्या धोरणांविरुद्ध आणि सध्याच्या व्यवस्थेतील भांडवली लुटमारीच्या विरोधात लढा देण्याची गरज आहे, तर दुसरीकडे या लढ्यांना एकत्र करून निसर्गाचे शोषण करणाऱ्या मानवद्रोही भांडवलशाही व्यवस्थेविरुद्ध लढा देणे ही एक अनिवार्य अट आहे.

**अनुवाद:** राहुल

# ‘अग्निपथ आंदोलन’: बेरोजगारी विरोधातील आग भडकू लागलीये!

पान 1 वरून

आहे की सैन्याची आणि सी.ए.पी.एफ. सारख्या फौजांची संस्कृती वेगळी आहे आणि सैन्यातील युवकांना सी.ए.पी.एफ. मध्ये भरती करून चालणार नाही. 2004 साली बनवले गेलेले माजी-सैनिक कल्याण खाते (Department of Ex-Servicemen Welfare, DEWS) आजवर माजी सैनिकांना रोजगार पुरवण्यात अत्यंत अपयशी ठरले आहे. आता या खात्याला ‘अग्निवीरां’ची सुद्धा जबाबदारी मिळेल. इतर सैनिकांच्या बाबतीत तरी पेंशन, वैद्यकिय सुविधा, कल्याणकारी योजना इत्यादींची जबाबदारी या खात्याकडे होती, परंतु अग्निवीरांच्या बाबतीत तर हे लागूही होणार नाही.

वास्तवात या युवकांना सैन्यातून परत आल्यानंतर बेरोजगारांच्या राखीव सेनेत सामील व्हावे लागेल आणि कामे मिळालीच तर ती असतील सुरक्षारक्षक, कंत्राटी रिक्षाचालक, चौकीदारांसारखी, किंवा मोदी-शहांचे जे ‘स्वप्न’ आहे तशी भजी तळणाऱ्यांची.

सैन्यात नोकरीच्या आशाने 4-5 वर्षे शारीरिक प्रशिक्षण घेणाऱ्या, लेखी परिक्षेची तयारी करणाऱ्या कोट्यवधी युवकांची स्वप्ने भंग झाली आहेत. या अगोदर परिक्षा पास झालेल्या अनेक जणांना नोकरी दिली गेलेली नाही. मेडिकल आणि धावण्याची परिक्षा पास झालेल्या अनेकांची गेले अनेक वर्षे लेखी परिक्षा झालेली नव्हती. लेखी परिक्षा पास होण्याकरिता लाखो रुपये खर्चून क्लास लावलेल्या अनेक युवकांची स्थिती हलाखीची झाली आहे.

आंदोलन सुरू झाल्यानंतर युवकांना शांत करण्यासाठी मोदी सरकारने काही “सवलती” जाहीर केल्या, ज्यामध्ये संरक्षण दलात 10 टक्के जागा अग्निवीरांसाठी राखीव ठेवल्या जातील. हरियाणाचे मुख्यमंत्री मनोहर लाल खट्टर यांनी जाहीर केले की अग्निवीरांना हरियाणा सरकारमध्ये गट ‘क’ मध्ये खालीपूर्वक नोकरी दिली जाईल. भाजपच्या काही नेत्यांनी (हार्दिक पटेल, अर्जुन मेघवाल) म्हटले आहे की ते 10 (!!) अग्नीवीरांना वैयक्तिक नोकरी देतील. थाजपच्या नेत्यांना थट्टा करण्याच्या क्रूर पद्धती चांगल्याच अवगत आहेत!

हे स्पष्ट आहे की सरकार मलमपट्टी करत आहे आणि युवकांच्या असंतोषाच्या भडकलेल्या आगीवर पाण्याचे शिंतोडे मारून धग कमी करवत आहे. 4 वर्षांनंतर बहुसंख्य युवक बेरोजगार होणार, नाममात्र पगाराच्या नोकऱ्यांसाठी वणवण भटकणार आणि इतर सर्व बेरोजगार युवकांप्रमाणे त्यांची स्थिती होणार हे निश्चित.

### बेरोजगारीची स्थिती

वर्षाला दोन कोटी रोजगार देणार हे मोदी सरकारचे दावे दूरच, रोजगारात प्रचंड घट होत आहे हे समजायला आज अभ्यासक असण्याचीही गरज नाही कारण सत्य डोळ्यांना उघड दिसत आहे. देशात अभूतपूर्व बेरोजगारीचे संकट चालूच आहे. सी.एम.आय.ई. च्या आकड्यांनुसार जून 2022 मध्ये बेरोजगारीचा दर 7.9 टक्के आहे आणि बिहार (13.3), हरियाणा (24.6), राजस्थान (22.2), जम्मू-काश्मिर (18.3), दिल्ली (13.6) सारख्या राज्यांमध्ये तर तो अतिप्रचंड आहे. सन 2022 मध्ये हा दर जवळपास सतत 7 टक्क्यांच्या वरच राहिलेला आहे. अर्थव्यवस्थेमध्ये असलेले मंदीचे वातावरण कायम आहे आणि मोठ्या मंदीची चाहूल सगळीकडे दिसत आहे. 2021-22 च्या चौथ्या तिमाहीत जीडीपी वाढीचा दर 4 टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. इंडिया टुडेच्या मूड ऑफ द नेशन सर्व्हेनुसार फक्त 17 टक्के लोकांना उत्पन्न वाढेल अशी आशा आहे.

येऊ घातलेल्या मंदीवर “उपाय” म्हणून मोदी सरकारने युवकांना रोजगार पुरवणारे कायदे केले नाहीत तर कामगारांच्या यथेच्छ पिळवणुकीची परवानगी देणारे नवीन कायदे केले आहेत आणि कामगारांचे रक्त शोषून कंपन्यांना नफा कमावण्याची पूर्ण मोकळीक दिली आहे. नवीन कायद्यांनुसार कंत्राटीकरण करणे, आठवड्याला कामाचे तास वाढवणे, कंपन्यांना सहज शक्य होणार आहे. थोडक्यात कमी लोकांकडून जास्त काम करवण्याची, आणि त्याद्वारे बेरोजगारांच्या फौजेत अजून भर घालण्याची मोकळीक कंपन्यांना मिळणार आहे.

### आंदोलनाने काय दर्शवले आहे

स्वत:स्फूर्तपणे उभे झालेले हे आंदोलन युवकांच्या बेरोजगारीविरोधातील दीर्घकालिक लढ्याचा एक भाग आहे. प्रचंड बेरोजगारी आज एक जवळपास कायमस्वरूपी घटना बनली आहे. जीवनाच्या किमान गरजा सुद्धा भागवता येणार नाहीत इतक्या नाममात्र मजुरीमध्ये, आणि सर्व प्रकारच्या असुरक्षिततांसह येणारी कामे करणे आज कोट्यवधी युवकांची मजबुरी बनली आहे. सुशिक्षित असोत वा अशिक्षित, सर्वच स्तरातील युवकांमध्ये बेरोजगारी प्रचंड आहे. एकीकडे लाखो विद्यार्थी युपीएससी, एमपीएससी, इतर सरकारी नोकऱ्या, सैन्य अशांपैकी मिळेल ती संधी शोधत आणि शेवटी फक्त वैफल्य हाती मिळवत जीवनाची अनेक वर्षे वाया घालवत आहेत. रोजंदारी कामं देणाऱ्या मजूर अड्ड्यांवर सुशिक्षित युवकांची उपस्थिती आता आश्चर्याची गोष्ट राहिलेली नाही, आणि तिथेही आठवड्यातील 4 दिवस काम मिळणे सुद्धा मुश्किल आहे. या सर्व परिस्थितीमध्ये युवकांची होणारी घुसमट या ना त्या पद्धतीने येत्या काळातही बाहेर पडत राहील. नुकतेच झालेले आंदोलन हे या घुसमटीची एक अभिव्यक्ती होते.

### मोदी सरकारचा खरा इरादा काय आहे?

या योजनेमागे मोदी सरकारचा खरा इरादा आहे सरकारी खर्चात कपात करणे, आणि दुसरीकडे कॉर्पोरेट कंपन्यांकरिता “शिस्तबद्ध” (म्हणजे जास्त काम करणाऱ्या!), “राष्ट्रवादी” (म्हणजे प्रश्न न विचारणाऱ्या, मालकांचा जयजयकार करणाऱ्या) कामगारांची फौज तयार करणे.

कंत्राटीकरणाचे कारण आहे सरकारी खर्च कमी करणे. हे विसरता कामा नये की चार वर्षे मुदतीमागचे कारण हे आहे की 4.5 वर्षे किंवा जास्त सेवा केली तर कायद्याप्रमाणे “ग्रॅच्युईटी” द्यावी लागते, म्हणजे 2.5 महिन्यांचा पगार जास्त द्यावा लागतो, जो सरकारला वाचवायचा आहे. थोडक्यात सरकारला खर्च कमी करायचा आहे आणि त्याकरिता युवकांच्या आयुष्याचा बळी दिला जात आहे. सरकारला खर्च कमी करण्यासाठी मंत्री-अधिकारी, सैन्यातील उच्चाधिकारी यांना दिले जाणारे कोट्यवधींचे भत्ते, सुविधा कमी करायचे नाहीयेत तर कष्टकरी वर्गातून येणाऱ्या सैनिकांचे पैसे कमी करायचे आहेत!

या योजनेद्वारे कंपन्यांचे हित जपण्याचे वास्तव समजून घेण्याकरिता समोर आलेली काही वक्तव्ये पहा. केंद्रिय मंत्री जी किशन रेड्डी यांनी म्हटले आहे की अग्निवीरांना “ड्रायव्हर, इलेक्ट्रिशियन, धोबी आणि न्हावी” यांच्या कामांचे प्रशिक्षण दिले जाईल आणि चार वर्षांनी हे युवक “या पदांकरिता” लायक असतील. महिंद्रा कंपन्यांचे मालक आनंद महिंद्रा यांनी म्हटले आहे की “अग्निवीरांचे कौशल्य आणि शिस्त त्यांना जास्त रोजगारक्षम बनवेल; महिंद्रा ग्रुप अशा प्रशिक्षित, सक्षम, युवकांना रोजगाराची संधी देण्याचे स्वागत करतो.” आनंद महिंद्राची नेमणूक मोदी सरकारने आता रिझर्व बँकेवर केली आहे. धोरणे ठरवणाऱ्या, आणि इतकी मोठ्या “पोहोच” असलेल्या उद्योगपतीचे वक्तव्य आणि केंद्रीय मंत्र्याचे वक्तव्य दाखवतात की अग्निवीर नावाने सैनिक नाही तर कामगार प्रशिक्षित केले जातील.

देशाचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित दोवल यांनी तर एका विशेष मुलाखतीत अनेक गोष्टींना उघडपणे मांडले आहे. त्यांनी म्हटले आहे की युवकांनी चिंता करू नये, 27 वर्षे वयाची ही मुलं बाजारात येतील आणि शिस्तबद्ध झालेली असतील, त्यांच्याकडे कौशल्य असेल, आत्मविश्वास असेल, प्रशिक्षणयोग्य असतील आणि अखिल-भारतीय दृष्टीकोन घेऊन असतील, 11 लाख रुपये असतील जे वापरून ते पुढे शिकू शकतील. 4 वर्षे पूर्ण होईपर्यंत देशाची अर्थव्यवस्था 5 ट्रिलियन डॉलरला गेलेली असेल आणि उद्योगधंदे अशा ‘शिस्तबद्ध, प्रशिक्षणयोग्य’ युवकांसाठी आतुर असतील. थोडक्यात अजित दोवाल मान्य करतात की उद्योगांकरिता निमूटपणे विनातक्रार काम करणाऱ्या कामगारांचे प्रशिक्षण या योजनेत केले जाईल, असा सरकारचा इरादा आहे.

अजित दोवाल यांच्या मते गेली 10 वर्षे शेकडो मिटींगा घेऊन ही योजना बनवली गेली आहे आणि गेल्या 50 वर्षांमध्ये अनेक समित्यांनी जास्त तरूण सैन्याच्या निर्मितीसाठी सूचना केल्या होत्या, परंतु त्यासाठी लागणारा निर्णय घेण्याची हिंमत मोदींमध्ये होती जी अगोदरच्यांमध्ये नव्हती! निश्चितपणे भांडवलदार वर्गाच्या सामूहिक हितांचे रक्षण करताना जनतेचे हित पायदळी तुडवण्याचा जो निगरगट्टपणा लागतो तो मोदींकडे आज सर्वात जास्त आहे, आणि दोवाल खरेच बोलत आहेत.

दोवालांनी हे सुद्धा म्हटले आहे की या युवकांना सैनिकाचे कठोर प्रशिक्षण दिले जाणार नाही(!), ते प्रशिक्षण 4 वर्षांनंतर ज्यांची निवड होईल त्यांनाच दिले जाईल. त्यांच्या मते युद्ध यापुढे संपर्कविहीन होतील आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाची भुमिका त्यात मोठी राहील. हे युवक भरकटून जाण्याच्या शक्यतेबद्दल दोवालांचे म्हणणे आहे की सर्वात उत्तम कायदा पाळणारे नागरिक या कार्यक्रमातून निर्माण होतील ज्यांच्यामध्ये राष्ट्रवादाची भावना असेल, 4 वर्षात त्यांचे शरीरच नव्हे तर मेंदूही बदलवला जाईल आणि अंतर्गत(!) सुरक्षेत ते महत्त्वाची भुमिका निभावतील. अग्निवीरांच्या प्रशिक्षण योजनेतील गुप्ततेबद्दल त्यांनी “देशाच्या सुरक्षेचा” मुद्दा उपस्थित करत गुप्ततेची भलावण केली. याचा अर्थ हा की या योजनेमध्ये युवकांना भाजप-संघाला अभिप्रेत असलेले हिंदुत्ववादी राष्ट्रवादाचे बाळकडू पाजले जाईल आणि त्यांचा मेंदू भ्रष्ट करण्याचा पूर्ण प्रयत्न केला जाईल. या योजनेमध्ये कसे प्रशिक्षण दिले जाईल याबद्दल उगीचच गुप्तता बाळगली जात नाहीये. अर्थात संघ-भाजपचे हे इरादे असले तरी मोदी सरकारने पाठीत काठ्या घातलेल्या, बेरोजगारीने पिडलेल्या, स्वप्न भंगलेल्या, आणि भावी जीवनामध्ये असुरक्षितताच ताटात वाढलेल्या या युवकांना पूर्णपणे कह्यात आणून आपल्या गुंडसेनेकरिता परिपूर्ण कॅडर तयार होईल हा भ्रम सुद्धा सोडावा. यापैकी असंख्य युवकांची भरती बेरोजगारांच्या सेनेतच होईल आणि मोदी सरकारने दिलेली कस्पटासमान वागणूक हे युवक विसरणार नाहीत! सैनिक म्हणजे अजून कोणी नाही तर गणवेशातील कामगार-कष्टकरीच आहे आणि त्याची वर्गचेतना नेहमीकरिता मारून टाकणे कोणत्याही सरकारला शक्य नाही.

### भाजपचे राजकारण: सैन्याच्या नावाने जनतेच्या भावनांशी खेळ

सैनिकांना समोर करून नकली देशभक्तीचे राजकारण भाजप तर सतत खेळत आली आहे. पेटीएम सारख्या कॉर्पोरेट कंपन्यांच्या आणि व्यापक भांडवलदारांच्या हितासाठी नोटबंदी लागू केली गेली आणि जनतेला अपार यातना सहन कराव्या लागल्या. त्या वेळी सुद्धा सैनिक सीमेवर उभे असतात तर जनतेने रांगेत का उभे राहू नये म्हणत नोटबंदीचे समर्थन करवले गेले होते. जनतेच्या लोकशाही अधिकारांचा मुद्दा असो, काश्मिर-सारख्या मुद्यांवर सरकारच्या धोरणांचा मुद्दा असो, सरकारी दमनाला विरोध करणे असो, भाजप नेहमीच विरोधकांचा आवाज दाबण्यासाठी सैन्याचा गैरवापर करत आले आहे. सैन्याच्या नावाने अंधराष्ट्रवादाला प्रोत्साहन देण्याचे काम भाजप करतच असतो आणि सैनिकांच्या बलिदानाला जणू काही स्वत:च्या राजकीय धोरणांचे सर्टीफिकेट म्हणून वापरत असतो. प्रश्न आहे की श्रीमंतांची पोरं सैन्यात सैनिक म्हणून भरती होतात का? नाही! सैनिक म्हणून भरती होत असतात ती कामगार-कष्टकऱ्यांचीच मुलं-मुली. परंतु नोटबंदी असो वा इतर निर्णय, भांडवलदारांच्या हितासाठी भाजप जी कोणती धोरणे लागू करतो, त्यांच्या समर्थनासाठी मात्र कामगार-कष्टकऱ्यांच्या मुला-मुलींमधून जे सैन्यात भरती होतात त्यांच्या बलिदानाचा वापर भाजप आपल्या प्रचाराकरिता करत असते.

### “राष्ट्रहित” म्हणजे अजून काही नाही तर भांडवलदार वर्गाचे सामाईक हित

अनेक उदारवादी आणि सामाजिक-जनवादी संघटना व पक्ष या योजनेमुळे “राष्ट्र”हित धोक्यात येईल, देशाची सुरक्षितता धोक्यात येईल याबद्दल इशारे देत आहेत. 4 वर्षे नोकरी केलेले युवक राष्ट्राचे रक्षण कसे करतील याबद्दल यांना काळजी लागली आहे. ही योजना देशाच्या रक्षणाला ध्यानात घेता रद्द

पान 7 वर

# मुंबई मधील देवनार महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेत वर्गखोल्या आणि शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारले!

## स्थानिक नागरिकांचा रोष!!

## भारताचा क्रांतिकारी कामगार पक्षाचे शाळेत प्रवेश मिळण्याच्या मागणीला सक्रिय समर्थन!

✎ बिगुल प्रतिनिधी

शिक्षणाच्या बाजारात ज्यांच्याकडे पैसा आहे ते आपल्या मुलांना महागड्या, आतंरराष्ट्रीय दर्जाच्या, इंग्रजी शाळांमध्ये, सर्व सोयींनी युक्त अशा खाजगी शाळांमध्ये शिकवतात पण गरीब कामगार-कष्टकरी वर्गासाठी त्यांच्या मुलांना शिक्षण देण्यासाठी जो एकमात्र पर्याय उरतो तो म्हणजे सरकारी शाळांचा! मुळात मुलांचं शिक्षण करणं हे आजच्या नफाकेंद्री व्यवस्थेच्या प्रचंड महागाईच्या जाळ्यात अडकल्यानंतर गरीब कष्टकरी कुटुंबांसाठी एक आव्हान बनलेलं आहे. ते आव्हान पेलून जी मुलं सरकारी शाळेच्या दारापर्यंत येतात त्यांना देखील जर प्रवेश नाकारला जात असेल तर हे म्हणणं वावगं ठरणार नाही की 'सर्व शिक्षा अभियान' म्हणत गावभर बोभाटा करणाऱ्या भांडवली सरकारांच्या ठायी गरीब कष्टकरी कुटुंबांतील मुलांचे शिक्षण कस्पटाप्रमाणे आहे. जगले काय किंवा मेले काय!! याचाच प्रत्यय आला मुंबईतील गोवंडी भागात देवनारच्या महानगरपालिकेच्या शाळेत!

ह्या भागातील देवनार म्युन्सिपल शाळेत प्रवेशासाठी मागील पंधरा दिवसांपासून प्रवेश प्रक्रिया सुरू झाली होती. अनेक पालक आपल्या पाल्यांना घेऊन गेल्या पंधरा दिवसांपासून प्रवेशासाठी शाळेच्या फेऱ्या मारत असतांना सुद्धा प्रवेश मिळाला नाही. मुख्याध्यापकांकडून 'आज-उद्या' करून अनेकांचे प्रवेश रखडून ठेवले जात होते. शेवटी दि. 21/6/2022 रोजी शाळेच्या मुख्याध्यापकांनी, 'प्रवेश मिळणार नाही कारण आमच्याकडे जागा नाहीत', असे जाहीर केल्यावर अनेक पालकांची तारांबळ उडाली. पालकांनी मुख्याध्यापकांना विचारले असता 'आमच्याकडे पुरेसे शिक्षक आणि वर्गखोल्या नसल्याने प्रवेश मिळणार नाहीत' असे कारण सांगण्यात आले. पालकांमध्ये शाळेच्या प्रशासनाविरोधात रोष वाढत होता कारण त्यांच्या वस्तीपासून जवळ असणाऱ्या एकमेव सरकारी शाळेत त्यांच्या मुलांना प्रवेश नाकारला जात होता. पालकांच्या वाढत्या गर्दीला हटवण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापकांनी स्थानिक पोलिसांना बोलावून घेतले व पोलिसांकरवी एका पालकाला ताब्यात घेऊन देवनार पोलीस स्टेशन मध्ये घेऊन जाण्यात आले. पोलिस स्टेशन समोर पालकांनी व स्थानिक लोकांनी गर्दी करायला सुरुवात झाल्यावर पोलीस व शाळा प्रशासनावर दबाव आल्याने पोलिसांना ताब्यात घेतलेल्या एका पालकाला सोडावे लागले, परंतु प्रवेशाचा प्रश्न अनुत्तरितच होता.

शिक्षणाचा प्रश्न हा प्रत्येकाच्या मूलभूत अधिकाराचा प्रश्न असल्याने भारताचा क्रांतिकारी कामगार पक्ष सक्रियरीत्या स्थानिकांसोबत प्रवेश मिळावा ह्या मागणीसाठी मैदानात उतरला. भारताचा क्रांतिकारी कामगार पक्षाचे (RWPI) कार्यकर्ते महानगरपालिकेच्या एम-पूर्व विभागाच्या शिक्षण अधिकाऱ्याकडे मोर्चा घेऊन गेल्यावर शिक्षण अधिकाऱ्यांनी पुन्हा वर्गखोल्या व शिक्षक नसल्याने प्रवेश नाकारला जात असल्याचे कारण सांगितले. आर्थिक-सामाजिक दृष्ट्या मुंबईतील सर्वात मागासलेल्या भागांपैकी एक असलेल्या मानखुर्द-गोवंडी भागातील मुलांच्या शिक्षणाला घेऊन महानगरपालिका देखील अजिबातच गंभीर नसल्याचे दिसून आले. एकीकडे मुंबई महानगरपालिकेच्या शाळा अत्याधुनिक झाल्या असल्याचा आणि शिक्षणापासून कोणीच वंचित राहणार नाही असा दावा महाविकास आघाडी सरकारच्या वतीने मुख्यमंत्र्यांनी अलीकडेच बीकेसी मध्ये झालेल्या जाहीर सभेत केला होता, पण खरी परिस्थिती तर उलट आहे! राज्य सरकार आणि केंद्र सरकार प्राथमिक शिक्षणातील सर्व सुविधा आणि लोकसंख्येच्या प्रमाणात शाळांची संख्या असल्याचा दावा करत आहेत तर मुंबईसारख्या 'महानगरात' गरिबांच्या मुलामुलींच्या भविष्याची राखरांगोळी करत शिक्षणासारख्या मूलभूत अधिकारापासून त्यांना वंचित ठेवले जात आहे. मुंबई महानगरपालिकेचे प्रत्येक वर्षाचे बजेट एखाद्या राज्याच्या बजेट पेक्षा मोठे असतांना गरीब वस्त्यांमध्ये किमान शाळेच्या बाबतीत पालिकेचा बेफिकिरपणा हे स्पष्ट दाखवून देतो की पालिका फक्त राजकारणी, अधिकारी आणि ठेकेदारांच्या चरण्याचे कुरण आहे. पुढे आरडब्ल्यूपीआय कडून पालिका प्रशासन, स्थानिक आमदार आणि नगरसेवक यांना निवेदन देऊन तत्काळ शाळेत शिक्षक आणि वर्गखोल्या वाढवून गरीब विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुकसान थांबवण्याची मागणी केली गेली आहे. तसेच वर्गखोल्या, शिक्षक, ह्या भागातील एकूण शाळांची संख्या, इत्यादी बाबी स्पष्ट होण्यासाठी आर.टी.आय. देखील आरडब्ल्यूपीआय कडून टाकण्यात आलेला असून त्याचे उत्तर अद्याप मिळालेले नाही.

भारताचा क्रांतिकारी कामगार पक्षाच्या नेतृत्वात सतत पालकांना घेऊन शाळेतील मुख्याध्यापकांच्या व संबंधित शिक्षण अधिकाऱ्यांच्या भेटी घेत त्यांच्यावर दबाव बनवल्याने उर्वरीत अनेक मुलांना शालेय प्रशासनाला शाळेत प्रवेश द्यावा लागला आहे. ज्यांना प्रवेश मिळाला नाही त्यांच्या प्रवेश प्रक्रियेचा पाठपुरावा आरडब्ल्यूपीआय कडून केला जात आहे.

# 'अग्निपथ आंदोलन': बेरोजगारी विरोधातील आग भडकू लागलीये!

पान 6 वरुन

करा अशीही मागणी ह्या संघटना करत आहेत.

कोण आहे या "राष्ट्रा"मध्ये? तुम्ही आम्ही मेहनत करणारे, बेरोजगार युवक या "राष्ट्रा"मध्ये आहोत का? नाही. यांचे "राष्ट्र" हे भांडवलदार वर्गाचे राष्ट्र आहे. आज आसाम मध्ये जनता पूराने त्राही-त्राही होत असताना आणि महाराष्ट्रातील आमदार त्याच आसामच्या राजधानीत, गुवाहाटीत, पंचतारांकित हॉटेलमध्ये मजा मारत असताना त्यांच्या रक्षणासाठी आसाम पोलिस, आणि इकडे महाराष्ट्रात सी.आर.पी.एफ.चे जवान लावले गेले आहेत! खुद्द अग्निवीरांच्या आंदोलनासहीत इतर कोणत्याही जनांदोलनांना चिरडण्यासाठी भांडवलदारांची दलाल सरकारं पुढे करतात ती पोलिसांना, सैन्याला. मोठमोठ्या धनाढ्यांच्या रक्षणाकरिता, त्यांच्या संपत्तीच्या रक्षणाकरिता पोलिस-निमसैनिकी दलांचा वापर शोषकांच्या सरकारांकडून सर्रास केला जातो. माणसांना गोळ्या घालवणारी सरकारं भांडवलदारांच्या खाजगी मालमत्तेच्या रक्षणासाठीच पोलिस आणि सैन्यदलांना वापरत असतात. सैनिकांप्रती भक्तिभावाच्या आणि देशभक्तीच्या आंधळ्या विचारांचा प्रचार करणारी भाजप सारखी सरकारं सैनिकांना निकृष्ठ दर्जाचे जेवण पुरवतात आणि त्याबद्दल तक्रार करणाऱ्या सैनिकांना शिक्षा देतात! कॉर्पोरेट कंपन्या, भांडवलदार वर्गाकरिता अग्निवीरांच्या रूपात कामगार तयार करू पाहणारी ही सरकारं अग्निवीरांनाच लाठ्या घालायला त्याच युवकांमधून भरती केलेल्या पोलिस-सैन्य दलाला वापरतात. पेंशनचा भार कमी व्हावा म्हणून सैनिकांवरचा खर्च कमी करणारी सरकारं सरकारी आयुध कंपन्या बंद करून परकीय खाजगी कंपन्यांची हजारो कोटींची हत्यारे विकत घ्यायला मात्र तयार असतात! सैनिकांचा पगार आणि पेंशनवरचा खर्च कमी करताना, उच्चभ्रू जीवन जगणाऱ्या मोठमोठ्या अधिकाऱ्यांच्या जीवनशैलीशी मात्र कोणतीही तडजोड केली जात नाही. अग्निवीरसारखी खरेतर बेरोजगारीचीच योजना जणू काही रोजगाराची योजना आहे असे म्हणत बेरोजगार युवकांमध्ये दुष्प्रचार करणारे सरकार या युवकांना "राष्ट्रा"मध्ये मोजत नाही, तर त्या भांडवलदारांनाच राष्ट्रामध्ये मोजते ज्यांच्या हिताकरिता अशी योजना आखली जाते!

तेव्हा, सर्वप्रथम हे लक्षात घेतले पाहिजे की सेना, पोलिसांसारख्या नोकऱ्या ज्या "राष्ट्रा"च्या सेवेसाठी आहेत असे आपल्याला शिकवले जाते, ते राष्ट्र या देशातील कामगार-कष्टकऱ्यांचा देश नाही, तर सर्व मेहनत करणाऱ्या जनतेचे शोषण करून गब्बर होणाऱ्या मालमत्ताधारक, भांडवलदार वर्गाचे "राष्ट्र" आहे. जेव्हा भाजप-काँग्रेस सारख्या भांडवली पक्षांची सरकारे राष्ट्रहिताबद्दल बोलत असतात, तेव्हा त्यांच्यासमोर देशातील कोट्यवधी मेहनत करणारे लोक नसतात, तर सर्व उत्पादन साधनांचे मालक असलेले कॉर्पोरेट भांडवलदार, छोटे-मध्यम उद्योजक, धनिक व उच्च-मध्यम शेतकरी, ट्रेडर, व्होलसेलर, सट्टेबाज, बिल्डर, वित्तीय भांडवलदार, मोठमोठे व्यापारी, इत्यादी सर्व शोषक मिळून बनलेला भांडवलदार वर्ग असतो, जो सर्व कामगार, गरीब शेतकरी, अर्धकामगार, कष्टकरी यांच्या श्रमाच्या शोषणातून गब्बर होत राहतो. हे शोषण लपवण्याच्या प्रचाराचा भाग म्हणून भांडवलदार वर्गाचे हित हेच राष्ट्रहित आहे हा प्रचार केला जातो. सर्व संपत्ती पैदा करणाऱ्या, रोज काबाडकष्ट करणाऱ्या कामगार, गरीब शेतकरी, कष्टकरी, यांना नाही तर देशातील उद्योगपतींना नरेंद्र मोदी लाल किल्ल्यावरून बोलताना "संपत्तीचे निर्माते" म्हणतात ते उगीच नाही!

### बेरोजगारी विरोधातच नव्हे, तर भांडवलशाही विरोधात संघटित व्हा!

या आंदोलनाने घेतलेले उग्र स्वरूप असंतोषाची आणि नैराश्याची तीव्रता दाखवते, परंतु त्यासोबतच हे सुद्धा खरे आहे की अशाप्रकारचा हिंसाचार आणि तात्कालिक प्रतिक्रिया कोणतेही गुणात्मक परिवर्तन घडवत नाहीत. त्याकरिता आवश्यक आहे योग्य मागण्यांचे सूत्रीकरण, आणि त्या मागण्यांभोवती एक दीर्घकालिक, नियोजनबद्ध, आणि योग्य क्रांतिकारी राजकीय नेतृत्वाखाली असलेले आंदोलन उभे राहणे. त्याकरिता सर्वप्रथम आवश्यक आहे बेरोजगारीच्या प्रश्नाच्या मूळाशी जात, या प्रश्नाच्या समजदारीभोवती असलेली चुकीच्या विचारांची जंजाळं दूर करून योग्य समजदारी विकसित करणे, आणि देशव्यापी रोजगार हमी कायद्याच्या मूलभूत अधिकाराच्या योग्य मागणीभोवती संघटित होणे.

या लढ्याला योग्य आकार तेव्हाच येऊ शकतो जेव्हा आपण देशातील आर्थिक-राजकीय व्यवस्थेचे खरे वर्गचरित्र ओळखू. भारतातील राज्यसत्तेचे चरित्र भांडवली आहे आणि तिच्या सारतत्त्वामध्ये भारतातील भांडवली लोकशाही ही भांडवलदार वर्गाचे अधिनायकत्व आहे. सरकारचे काम जनतेचे नव्हे तर भांडवलदार वर्गाच्या सामूहिक हितांचे रक्षण करणे आहे आणि अग्निवीरसारख्या योजना याचे निदर्शक आहेत. नफ्याकरिता चालणारी बाजाराची भांडवली आर्थिक व्यवस्था रोजगार निर्मितीसाठी नाही तर भांडवलदारांच्या नफ्यासाठी चालते; स्वाभाविकपणे अशी व्यवस्था बेरोजगारीला जन्म देतच राहते आणि बेरोजगारांच्या राखीव फौजेमुळेच मजुरीचे दर उपासमारीच्या स्तराकडे ढकलणे भांडवलदारांना शक्य होते. त्यामुळेच भांडवली व्यवस्थेमध्ये बेरोजगारीच्या प्रश्नावर कायमस्वरूपी उपाय शक्य नाही. उत्पादन साधनांवर समाजाची सामूहिक मालकी असलेल्या, नफ्याकरिता नव्हे तर सर्व कामकरी जनतेच्या सर्वाधिक शक्य उन्नतीकरिता चालणाऱ्या समाजवादी उत्पादन व्यवस्थेमध्येच सर्वांना रोजगाराचा खरा अधिकार मिळू शकतो. तेव्हा बेरोजगारीविरोधातील आंदोलनाला भांडवली व्यवस्थाविरोधी आंदोलनाची राजकीय कार्यदिशा देणे हे क्रांतिकारी कामगारवर्गीय चळवळीचे कर्तव्य ठरते. अग्निपथ सारख्या योजनांच्या विरोधात युवकांच्या त्या सर्व हिश्श्यांपर्यंत आज बेरोजगारीच्या सर्वसामान्य समस्येचे विश्लेषण घेऊन जाणे आणि रोजगार अधिकाराच्या आंदोलनाला गती देणे हा आपला तातडीचा कार्यभार बनतो.

# कामगार वर्गाचा राजकीय पक्ष कसा असावा? (पुष्प दुसरे)

## कामगार वर्गाच्या पक्षाचा प्रचार क्रांतिकारी असतो

✎ सनी

कामगार वर्गाच्या पक्षाचा प्रचार क्रांतिकारी असतो. हा प्रचार कामगार वर्ग आणि सामान्य कामकरी जनतेतूनच ठरतो. म्हणजे, क्रांतिकारी प्रचारासाठी योग्य विचार, योग्य नारे, आणि योग्य धोरणे सामान्य कामकरी जनतेच्याच योग्य विचारांना संकलित करून्, त्यांच्यातून योग्य विचारांना छाटून आणि त्यांचे सामान्यीकरण करूनच सूत्रबद्ध केले जाऊ शकतात. लेनिन म्हणतात की, "कामगारांच्या सर्वसामान्य हितांच्या आणि आकांक्षांच्या आधारावर, विशेषत: त्यांच्या सर्वसामान्य संघर्षांच्या आधारावर, कम्युनिस्ट प्रचार आणि आंदोलनाच्या कारवायांना असे चालवले जावे की त्यामुळे कामगारांमध्ये पाय रोवता येतील." हीच गोष्ट सामान्य कामकरी जनतेमध्ये केल्या जाणाऱ्या प्रचाराला सूद्धा लागू होते. याचा अर्थ हाच होतो की कामगर वर्गाच्या पक्षाचा प्रचार क्रांतिकारी जनदिशेच्या तत्त्वाने निर्देशित असतो. पक्षाने जनतेमध्ये विखुरलेल्या योग्य विचारांना एकत्र करून, त्यांच्यातून मूलभूत मुद्दे वेगळे करून, त्यांचे सामान्यीकरण करून एक योग्य राजकीय कार्यदिशा सूत्रबद्ध केली पाहिजे आणि तिला परत जनतेमध्ये घेऊन गेले पाहिजे. जेव्हा हे विचार नाऱ्यांच्या आणि प्रचार सामग्रीच्या रुपात जनतेपर्यंत पोहोचतात, तेव्हाच जनता त्यांना स्विकारते. जेव्हा जनता कामगार वर्गीय पक्षाच्या योग्य विचारांना आत्मसात करते, तेव्हा "हे विचार एका अशा भौतिक शक्तीत बदलतात, जे समाजाला आणि दुनियेला बदलून टाकतात." (माओ)

जनतेची चेतना उन्नत करण्यासोबतच आंदोलनांमध्ये जनतेला नेतृत्व देण्यासाठी कामगार पक्षाने आपल्या प्रचाराला अत्यंत गांभिर्याने तयार केले पाहिजे. विशेषत: आजच्या काळात आणि भारतासारख्या देशांमध्ये जिथे कामकरी जनतेची मोठी संख्या क्रांतिकारी चेतनेपर्यंत पोहोचलेली नाही, आपण कम्युनिस्ट प्रचाराच्या नवनवीन रूपांचा सतत शोध घेतला पाहिजे. लेनिन याबद्दल म्हणतात की "त्या भांडवली देशांमध्ये जिथे कामगार वर्गाची मोठी बहुसंख्या क्रांतिकारी चेतनेच्या स्तरावर अजून पोहोचलेली नाही, कम्युनिस्ट आंदोलनकर्त्यांनी या मागे पडलेल्या कामगारांच्या चेतनेला ध्यानात घेऊन आणि क्रांतिकारी फळीमध्ये त्यांचा प्रवेश सोपा करण्यासाठी सतत कम्युनिस्ट प्रचाराच्या नवनवीन रूपांचा शोध घेतला पाहिजे. त्या फुलणाऱ्या, अचेतन, अपूर्ण, डगमगणाऱ्या आणि अर्धभांडवली क्रांतिकारी प्रवृत्तींना समोर आणले पाहिजे ज्या कामगारांच्या डोक्यामध्ये भांडवली परंपरा आणि संकल्पनांवर हावी होण्यासाठी संघर्ष करत आहेत आणि त्यांना आपल्या नाऱ्यांमधून कम्युनिस्ट प्रचाराचे साधन बनवले पाहिजे. सोबतच, कम्युनिस्ट प्रचाराने जनसमुदायांच्या मर्यादित व अस्पष्ट मागण्या आणि आकांक्षांपर्यंत संतुष्ट राहता कामा नये. या मागण्या आणि आकांक्षांमध्ये क्रांतिकारी भ्रूण अस्तित्वात असतात आणि ते कामगार वर्गाला कम्युनिस्ट प्रचाराच्या प्रभावात आणण्याचे साधन असतात."

पहिली गोष्ट ही की जनतेच्या मागण्या आणि आकांक्षांची माहिती तेव्हाच मिळू शकते जेव्हा पक्ष कार्यकर्त्यांचा जनतेमध्ये पकड (पैठ) असेल आणि ते जनतेच्या जीवनाशी आणि त्यांच्या अडचणींशी परिचित असतील. दुसरे हे की जनतेच्या अस्पष्ट आणि अपूर्ण योग्य विचारांना आणि वर्गसंघर्षाच्या व्यवहाराच्या अनुभवाला एकत्र करून कामगार पक्ष मार्क्सवादी विज्ञानाच्या व तत्वज्ञानाच्या प्रकाशात त्यांच्या सारतत्वांना निवडून, तसेच त्यांचे सामान्यीकरण करून नारे व कम्युनिस्ट प्रचार सामग्री तयार करतो. पक्षाचे नारे तसेच प्रचार सामग्री मार्क्सवादी विज्ञान आणि तत्वज्ञानाच्या प्रकाशात आणि क्रांतिकारी जनदिशेच्या अंमलबजावणीच्या माध्यमातूनच तयार होऊ शकतात. "जनसमुदायांपासून जनसमुदायांपर्यंत" घेऊन जाण्याचा मार्ग हाच आहे. माओ समजावतात की "जनसमुदायाच्या विचारांना (विखुरलेल्या आणि अव्यवस्थित) एकत्र करा, त्यांचा सार काढा (अध्ययनाद्वारे त्यांना केंद्रित आणि सुव्यवस्थित विचारांमध्ये बदला), नंतर जनसमुदायांमध्ये जा, या विचारांचा प्रचार करा, आणि जनसमुदायांना समजवा जेणेकरून ते त्यांना आपल्या विचारांच्या रूपात स्विकारतील, त्यांच्यावर दृढतेने कायम राहतील, आणि त्यांना कृतीत बदलवतील तसेच या प्रकारच्या कारवाई दरम्यान या विचारांच्या अचूकतेची पडताळणी करतील. यानंतर पुन्हा एकदा जनसमुदायांच्या विचारांना एकत्र करून त्यांचे सार काढा आणि नंतर पुन्हा एकदा जनसमुदायांमध्ये जा जेणेकरून ते विचार जतन होतील आणि कार्यान्वित होत राहतील. या प्रकारच्या प्रक्रियेला एका अंतहिन चक्राच्या रूपामध्ये वारंवार करत राहिल्याने ते विचार प्रत्येक वेळी पहिल्यापेक्षा जास्त योग्य, पहिल्यापेक्षा जास्त सजीव आणि पहिल्यापेक्षा जास्त समृद्ध बनत जातील. असा आहे मार्क्सवादी ज्ञान सिद्धांत."

जनांदोलने, कामगारांची आर्थिक आणि राजकीय आंदोलने यांच्यामध्ये कामगार पक्षाची प्रचार सामग्री तसेच ठोस नारे जिवंत शक्ती बनतात. पण इथवर पोहोचून ही प्रक्रिया थांबत नाही तर कामगार पक्ष पुन्हा जनतेमधील विचारांना एकत्रित करतो, त्यांचे सारभूत तत्व वेगळे करतो, आणि सामान्यीकरण, प्रचार सामग्री आणि ठोस नारे जनतेसमोर ठेवतो. ही प्रक्रिया अनंतकाळ पुनरावृत्त होत राहते.

माओंच्या "ठोकळेबाज पार्टी-लेखनाचा विरोध करा" या लेखामध्ये कम्युनिस्ट प्रचार कसा असावा याला लेनिनचा दाखला देत स्पष्ट केले आहे. लेनिनने 1894 मध्ये बाबुश्किनच्या मदतीने सेंट पीटर्सबर्ग मधील संपकरी कामगारांना उद्देशून एक पत्रक लिहिले. लेनिन नेहमीच ठोस पडताळणी आणि अभ्यासाच्या आधारावरच प्रचार सामग्री तयार करत असत. माओंनी दिमित्रोव आणि लेनिनच्या दाखल्याने सांगितले की प्रचाराची शैली स्पष्ट, सरळ आणि जनतेच्या भाषेत असली पाहिजे. त्यांनी बोल्शेविक पार्टीच्या इतिहासाच्या पुस्तिकेतील खालील भागाला उधृत केले आहे:

"लेनिनच्या मार्गदर्शनामध्ये 'कामगार वर्गाच्या मुक्ती संघर्षाच्या सेंट पीटर्सबर्ग समिती' ने सर्वात अगोदर रशियातील समाजवादाला कामगार आंदोलनासोबत जोडण्याची सुरूवात केली. कोणत्याही कारखान्यात संपाची सुरूवात होताच ही 'संघर्ष समिती', जिच्याकडे तिच्या गटांच्या सदस्यांमार्फत कारखान्यांच्या स्थितीबद्दल व्यवस्थित माहिती असायची, लगेचच पत्रके घेऊन आणि समाजवादी नारे घेऊन कामगारांचे समर्थन करत असे. या पत्रकांमध्ये उद्योगपतींद्वारे कामगारांच्या दडपशाहीचा पर्दाफाश केला जाई, कामगारांना हे सांगितले जाई की त्यांनी आपल्या हितांसाठी कशाप्रकारे संघर्ष केला पाहिजे, आणि त्यामध्ये कामगारांच्या मागण्या प्रस्तुत केल्या जात असत. ही पत्रके भांडवलशाहीच्या दुखऱ्या व्रणांबद्दल, कामगारांच्या गरिबीबद्दल, 12-14 तास कराव्या लागणाऱ्या कंबरतोड मेहनतीबद्दल आणि श्रमदिनाबद्दल, अधिकारांच्या पूर्ण अभावाबद्दल स्पष्टपणे सत्य प्रस्तुत करत असत. त्यांच्यामध्ये योग्य राजकीय मागण्यांना सुद्धा प्रस्तुत केले जाई."

महत्त्वाची गोष्ट ही की कामगार पक्षाचा प्रचार क्रांतिकारी असण्याचा अर्थच हा आहे की हा प्रचार फक्त कामगारांच्या आर्थिक मागण्यांपर्यंत मर्यादित राहू शकत नाही. आर्थिक मागण्यांचा आशय फक्त व्यावसायिक वा ट्रेड युनियन मागण्यांशी जोडलेला आहे. या मुद्यावर रशियात लेनिनचा अर्थवाद्यांशी वाद झाला. अर्थवाद्यांचे म्हणणे होते की आर्थिक मागण्यांवर संघर्षाच्या माध्यमातूनच कामकरी जनतेला राजकीय संघर्षात ओढले जाऊ शकते आणि आर्थिक मागण्यांचा संघर्षच पुढे जाऊन स्वत: राजकीय संघर्ष बनतो. लेनिनने याला प्रतिक्रियावादी आणि हानिकारक विचार म्हटले. लेनिनने सांगितले की हा मध्यमवर्गीय बुद्धीजिवींचा पूर्वाग्रह आहे की कामगार फक्त त्यांच्या वेतन-भत्त्यांच्या मागण्यांवरच विचार करू शकतात आणि लढू शकतात आणि त्यांना शुद्ध राजकीय मुद्यांमध्ये कोणताही रस नसतो. लेनिनने या वादाच्या माध्यमातून ट्रेडयुनियनवादी प्रचार आणि क्रांतिकारी प्रचारामधील फरकही स्पष्ट केला. कामगार वर्गाच्या प्रचाराचा सार काय असावा हे ह्या वादामध्ये लेनिनच्या भुमिकेवरून स्पष्ट होते.

1861 मध्ये रशियामध्ये भूदास प्रथा समाप्त झाली होती आणि शेतीमध्ये प्रशियन मार्गाने क्रमिक भांडवली विकास झाला. फॅक्टऱ्या-कारखान्यांमध्ये 1880 पासून तेजी आली. नवनव्या विकसित झालेल्या उद्योगांमध्ये कामगारांचे जीवन नरकासमान होते. या नरकासमान जीवनाच्या विरोधातच रशियात 1890 पासून फॅक्टऱ्या कारखान्यांमध्ये संपांचे सत्र सुरू झाले. संपांची तीव्रता नव्या सहस्त्रकात अजूनच वाढली आणि तिच्यामध्ये क्रांतिकारकांचा हस्तक्षेपही वाढत गेला. कामगार वर्गाचे आंदोलन 1905 च्या पहिल्या रशियन लोकशाही क्रांतीची एक प्रमुख शक्ती बनले. कामगार फक्त आपल्या आर्थिक मागण्यांसाठीच संघर्ष करत नव्हते, तर ते झारकालीन रशियात सरळ राजकीय लोकशाहीच्या मागणीसाठी सुद्धा लढत होते. संप आंदोलनात कम्युनिस्टांनी हिरीरीने नेतृत्व दिले. यामध्ये लेनिनची प्रमुख भुमिका होती. लेनिनने 1894-95 मध्ये सेंट पीटर्सबर्गच्या कामगारांचा संप संघटीत केला आणि सोबतच या आंदोलनांमध्ये सघन क्रांतिकारी प्रचारही केला. कारखान्यांमधील नरकासमान स्थितीचा भंडाफोड करण्यासाठी कामगार मोठ्या संख्येने छपाई करू इच्छित होते. लेनिन सांगतात की अशा "पत्रकां"मध्ये बहुतेक कारखान्यांच्या स्थितीचा भंडाफोड लिहीला जाई, आणि लगेचच कामगारांना अशाप्रकारचा भंडाफोड करण्याचा नाद लागला. जसे कामगारांच्या लक्षात आले की कम्युनिस्ट गट त्यांना एक नव्या पद्धतीचे पत्रके देऊ पाहतात आणि देऊ शकतात, ज्यामध्ये गरिबीने ग्रस्त त्यांच्या जीवनाबद्दल, त्यांच्या कंबरतोड मेहनतीबद्दल, अधिकारांच्या अभावाबद्दल पूर्ण सत्य लिहिलेले असेल, तसे कारखान्यांमधून आणि फॅक्टऱ्यांमधून पत्रांची रांगच लागली. या 'भंडाफोड करणाऱ्या साहित्या'मधून ज्यांच्या स्थितीचा भंडाफोड केला गेला आहे त्या विशेष कारखान्यांमध्येच नाही तर जिथे कुठे बातमी पोहोचत असे त्या सर्व कारखान्यांमध्ये खळबळ माजत असे. वेगवेगळ्या उद्योगांमधील तसेच वेगवेगळ्या पेशांमधील कामगारांच्या गरजा आणि संकटे ढोबळमानाने एकसारखीच आहेत, त्यामुळे 'कामगारांच्या जीवनाबद्दलचे सत्य' सर्व कामगारांना आंदोलित करत असे." (लेनिन, काय केले पाहिजे?)

परंतु एकंदरित पाहता या संघर्षांमध्ये कामगार आपल्या श्रमशक्तीरूपी मालाला जास्तीत जास्त चांगल्या भावाला विकण्याकरिता "खरेदीदाराशी झगडायला शिकत होते." फॅक्टऱ्यांच्या स्थितीचा भंडाफोड करण्यापासून पुढे जाऊन त्याला सर्वांगीण राजकीय भंडाफोडीपर्यंत पोहोचवणे लेनिनच्या मते कामगार पक्षाचे महत्त्वाचे काम होते. लेनिन स्पष्ट सांगतात की कामगार वर्गाचा पक्ष फक्त श्रमशक्तीच्या विक्रीची चांगली किंमत मिळवण्यासाठीच नाही तर त्या सामाजिक व्यवस्थेला नष्ट करण्यासाठी कामगार वर्गाच्या संघर्षाचे नेतृत्व करतो "जी संपत्तीहीन लोकांना धनिकांच्या हाती विकले जाण्याची सक्ती करते". लेनिन स्पष्ट करतात की कामगार वर्गाचा पक्ष फक्त मालकांच्या संदर्भातच कामगारांचे अग्रदल नसते, तर वास्तवात लेनिनच्या शब्दांमध्ये "समाजातील प्रत्येक वर्गासोबतच तसेच एका संघटित राजकीय शक्तीच्या रूपाने राज्यसत्तेशी संबंधित प्रत्येक मामल्यात" अग्रदल असते. कामगार वर्ग एका राजकीय वर्गाच्या रूपाने पक्षामार्फतच संघटित होऊ शकतो. कामगार वर्ग एका राजकीय वर्गाच्या रूपात संघटित होण्याचा काय अर्थ आहे? याचा अर्थ आहे कामगार वर्गाच्या उन्नत तत्वांना एका राजकीय प्रकल्पाच्या संकल्पनेने सज्ज करणे; दुसऱ्या शब्दांमध्ये राजकीय वर्ग तो वर्ग असतो, ज्याचे लक्ष्य भांडवली राज्यसत्तेचा ध्वंस आणि आपल्या राज्यसत्तेची स्थापना करणे असते. भांडवलदार वर्गासाठी सुद्धा ही भुमिका त्यांचे अग्रदल निभावतो आणि कामगार वर्गासाठी सुद्धा ही भुमिका त्यांचे अग्रणी तत्वच निभावतात. या अग्रणी तत्वांना मार्क्सवादी तत्वज्ञान आणि विज्ञानाने सज्ज करणाऱ्या आणि क्रांतिकारी जनदिशा लागू करणाऱ्या पक्षाच्या नेतृत्वातच गोलबंद आणि संघटित केले जाऊ शकते. त्याशिवाय कामगार वर्ग फक्त जनसमुदायांचे अंग बनून राहतो, त्यांना नेतृत्व देणारी अग्रणी शक्ती म्हणजे एका

पान 11 वर

# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (बारावे आणि अंतिम पुष्प )

आज भारतातच नाही, तर संपूर्ण दुनियेत कामगार भांडवली लुटखोरांच्या वेगवान होत चाललेल्या हल्ल्यांचा सामना करत आहेत, आणि कामगार आंदोलन विखुरलेपण, साचलेपणा, आणि हताशेने ग्रासलेले आहे. अशामध्ये इतिहासाची पाने उलटून कामगार वर्गाच्या गौरवशाली संघर्षांपासून शिकण्याचे आणि त्यांच्यापासून प्रेरणा घेण्याचे महत्व फार वाढते. आजपासून 150 वर्षे अगोदर, 18 मार्च 1871 ला फ्रांसची राजधानी पॅरिस मध्ये पहिल्यांदा कामगारांनी आपले शासन कायम केले. याला पॅरिस कम्युन म्हटले गेले. त्यांनी शोषकांद्वारे पसरवल्या जाणाऱ्या या विचारांना ध्वस्त केले की कामगार राज्यकारभार चालवू शकत नाहीत. पॅरिसच्या बहादूर कामगारांनी फक्त भांडवली सत्तेच्या रथालाच उलटवले नाही तर 72 दिवसांच्या शासनाच्या दरम्यान येणाऱ्या दिवसांचे एक छोटे मॉडेल जगासमोर प्रस्तुत केले आणि दाखवले की समाजवादी समाजामध्ये भेदभाव, असमानता, आणि शोषण कशाप्रकारे समाप्त केले जाईल. पुढे चालून 1917 च्या रशियन कामगार क्रांतीने या क्रांतीचा पुढचा टप्पा रचला.

कामगार वर्गाच्या या साहसी कारवाईने फक्त फ्रांसमधीलच नाही तर जगातील भांडवलदारांचे काळीज थरथरले. त्यांनी कामगारांच्या पहिल्या सत्तेला सुरुंग लावण्यासाठी जीवतोड प्रयत्न केले आणि शेवटी कामगारांच्या कम्युनला त्यांनी रक्ताच्या नद्यांमध्ये न्हाऊन काढले. पण कम्युनचे सिद्धांत अमर झाले.

पॅरिस कम्युनच्या पराजयातूनसुद्धा जगातील कामगार वर्गाने महत्वाचे धडे घेतले. पॅरिसच्या कामगारांचे बलिदान कामगार वर्गाला सतत आठवण देत राहील की भांडवलशाहीला नष्ट केल्याशिवाय त्यांना मुक्ती मिळू शकत नाही.

पॅरिस कम्युनला 150 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने ‘कामगार बिगुल’ च्या मार्च 2021 अंकापासून आम्ही जगातील पहिल्या कामगार राज्याच्या सचित्र कथेची सुरुवात केली. ‘मजदूर बिगुल’ मध्ये मार्च 2012 पासून प्रकाशित झालेल्या धारावाहिक कथेचा अनुवाद आम्ही गेल्या 11 अंकांमध्ये प्रसिद्ध केला. **12 व्या पुष्पाद्वारे या मालिकेचा शेवट करत आहोत.**

या लेखमालेतील सुरुवातीच्या काही पुष्पांमध्ये आपण पॅरिस कम्युनच्या पार्श्वभूमीमध्ये जाणले की भांडवलाच्या सत्तेविरोधात कामगारांचा संघर्ष कशाप्रकारे पावलोपावली विकसित झाला. आपण पाहिले की कम्युनची स्थापना कशी झाली आणि तिच्या रक्षणासाठी कामकरी जनता कशाप्रकारे शौर्याने लढली. आपण हे सुद्धा पाहिले की कम्युनने खऱ्या लोकशाहीच्या तत्वांना इतिहासात पहिल्यांदा लागू कसे केले आणि हे पण दाखवले की “जनतेची सत्ता” वास्तवात कशी अस्ते. गेल्या काही पुष्पांमध्ये आपण हे पाहिले की कम्युनचा पराजय कोणत्या कारणांमुळे झाला. या चूकांना नीट समजणे आणि भांडवलशाहीच्या विरोधात निर्णायक लढाईत त्यांच्यापासून धडे घेणे कामगार वर्गासाठी अत्यंत आवश्यक आहे.

— संपादक मंडळ


## कम्युनच्या शिक्षणाच्या प्रकाशात कामगारांचा मुक्ती संघर्ष विजयी होईल



**1.** मागील अंकात आपण कामगार वर्गाच्या इतिहासातील सगळ्यात प्रेरणादायी गाथेबाबत जाणून घेतले. कशा प्रकारे फ्रांसमध्ये नेपोलियन तृतीय यांने द्वितीय-साम्राज्याच्या कोलमडलेल्या शासनात थोडा जीव टाकण्याचा प्रयत्न करताना जुलै 1870 मध्ये प्रशियाविरूध्द युद्धाची घोषणा केली; कशा वाईट पद्धतीने तो युद्ध हारला आणि प्रशियाच्या सेनेसमोर पॅरिसला अरक्षित सोडले; कशाप्रकारे सप्टेंबर 1870 मध्ये एका भांडवली-गणतंत्राची घोषणा केली गेली आणि तथाकथित "संरक्षण सरकारची" स्थापना झाली; कशाप्रकारे शत्रूने घेरलेल्या शहरासोबत या सरकारने दगाबाजी केली आणि मग पॅरिसची जनता उठून उभी राहिली व आपल्या बचावासाठी स्वत: हत्यारबंद झाली; कशाप्रकारे जेव्हा सरकारने त्यांच्या नॅशनल गार्डला (रक्षक दलाला) निशस्त्र करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा पॅरिसच्या जनतेने 18 मार्चला कम्युनची घोषणा केली आणि शहराच्या शासनाला आपल्या हातात घेतले; कशाप्रकारे गद्दार थियेरचे सरकार व्हर्सायला पळून गेले, आणि तेथे प्रशिया सोबत मिळून कम्युनला उखडून टाकण्याची योजना बनवली; आणि कशाप्रकारे पॅरिसच्या कामगारांनी 72 दिवस आपले राज्य कायम राखले आणि आपल्या रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत त्यांनी कम्युनचे रक्षण केले. जेव्हा व्हर्सायची सेना शहरात घुसली, तिने अनेक हजार स्त्री-पुरूषांना ठार मारले—त्यांना, ज्यांनी राजधानीच्या शासनावर ताबा मिळवण्याची आणि शोषित-वंचित लोकांच्या हितामध्ये शासन संचालित करण्याची हिंमत केली होती.

वर: कम्युनच्या लाल झेंड्याच्या नेतृत्वात पॅरिसच्या झुंझार कामगारांनी बॅरिकेडच्या लढाईत भांडवलदाराच्या फौजेचा हिमतीने मुकाबला केला.

उजव्या बाजूला: कम्युनच्या घोषनेनंतर कम्युनच्या सरकारच्या रक्षणात ठामपणे उभा राहिलेला हत्यारबंद कामगारांची फळी.



**2.** जेथे कुठे कामगार या बहादुरीच्या सघंर्षाची कहाणी पुन्हा एकदा ऐकायला जमा होतील, एक अशी कहाणी जी सुरुवातीपासूनच कामगारांच्या शौर्यगाथेच्या मौल्यवान वारशात सामिल झाली आहे, ते 1871 च्या शहीद झालेल्या कामगारांच्या स्मृती गर्वाने आठवतील. आणि सोबतच ते आजच्या वर्ग संघर्षाच्या त्या शहीदांची सुद्धा आठवण काढतील, ज्यांना मारून टाकण्यात आले आहे किंवा जे भांडवली देशांच्या तुरुंगात यातना भोगत आहेत, कारण त्यांनी आपल्या शोषकांविरूद्ध बंड करण्याची हिंमत दाखवली, तशीच जशी पॅरिसच्या कामगारानी 150 वर्ष अगोदर केली होती.

# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (बारावे आणि अंतिम पुष्प )

**3.** कार्ल मार्क्सच्या शब्दात "स्वर्गावर धाव घेण्यासाठी तयार" असे जे कम्युनार्ड होते, त्यांच्या शौर्यापासूनच फक्त कामगार प्रेरणा घेणार नाहीत! तर ते कम्युनच्या कथेतील मिळकतीं सोबतच तिच्या त्या चुका आणि कमतरतांना सुद्धा तपासतील ज्यांच्यामुळे पॅरिसच्या कामगारांना एवढी मोठी किंमत मोजावी लागली होती.



ज्या वेळी पॅरिसचे कामगार आपल्या वर्गशत्रूशी लढत होते आणि एका नव्या समाजाची रचना करत होते, त्यावेळी मार्क्स सतत या ऐतिहासिक घटनाक्रमावर लक्ष ठेवून होते आणि कामगारांना सल्ला देत होते.

**4.** कम्युनने आंतरराष्ट्रीय कामगारवर्गाला खूप धडे दिले. कामगार वर्गाच्या मार्क्स, लेनिन, एंगल्स या नेत्यांनी कम्युनच्या अनुभवाचा खोलवर अभ्यास केला आणि रशियन कामगारांनी कामगारांचे राज्य मजबुतीने स्थापन करून हे दाखवून दिले की त्यांनी पहिल्या कामगार क्रांतीच्या शिकवणीला चांगले समजून घेतले होते. त्यानंतर जगातील अनेक देशात कामगारांच्या नेतृत्वात कामकरी जनतेचे शासन प्रस्थापित झाले आणि जगातून शोषण व असमानता नष्ट करण्याच्या दिशेने मोठी पावले टाकली गेली. या सर्वात पॅरिस कम्युनची मशाल त्यांना रस्ता दाखवत होती. "स्वर्गाचे मालक" असणाऱ्या शोषकांनी आपल्या जुन्या दुनियेला वाचवण्यासाठी पूर्णपणे जोर लावला आणि कामगार वर्गाच्या आत घुसलेल्या गद्दारांनी त्यांना पूर्णपणे मदत केली. नव्या दुनियेला रचण्याच्या अथक प्रयत्नांमध्ये कामगार वर्गाच्या नेत्यांकडूनही काही चुका झाल्या. आज जगाच्या स्तरावर पाहिले तर मानव मुक्तीच्या लढाईत कामगार सेनेला जिंकलेले मोर्चे हरवून माघार घ्यावी लागली आहे. परंतु या पराजयापासून धडा घेवून कामगार वर्ग पून्हा एकदा उठून उभा राहिल आणि या वेळी भांडवलशाही- साम्राज्यवादाला नेहमीसाठी कबरेत झोपवूनच थांबेल हे नक्की.




पहिल्या इंटरनॅशनलच्या सभेमध्ये पॅरिस कम्युनबद्दल अहवाल सादर करताना कार्ल मार्क्स.




**5.** कम्युनच्या 40 व्या स्मृतीदिनी 1921 मध्ये रशियन क्रांतीचे नेते लेनिन यांनी लिहिले, "आधुनिक समाजात कामगारवर्ग, ज्याला भांडवलाद्वारे आर्थिक स्वरूपात गुलाम बनवले गेले आहे, तोपर्यंत राजकीयरित्या शासन करू शकत नाही, जोपर्यंत तो आपल्या त्या बेड्या तोडत नाही ज्या त्याला भांडवलशाहीशी बांधतात. म्हणूनच कम्युनने समाजवादाच्या दिशेने पुढे जायला हवे होते, म्हणजेच कम्युनने भांडवलदार वर्गाच्या शासनाला, भांडवलाच्या शासनाला, उखडून फेकून देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे होते आणि अस्तित्वात असलेल्या सामाजिक व्यवस्थेच्या पायालाच ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला पाहिजे होता." 1917 मध्ये रशियन कामगारांनी सोवियत कम्युनची स्थापना केली, तेव्हा त्यांच्या जवळ अधिक अनुकुल वस्तुगत परिस्थिती सोबत नेतृत्व देण्यासाठी कामगार वर्गाची एक अशी सशक्त पार्टी होती, जी पॅरिसच्या कामगारांजवळ नव्हती.

कम्युन फ्रेंच कामगार वर्गाची महान परंपरा आहे. पेरे लाशेज येथील चुप्प-भिंती (जेथे कम्युनार्डांना गोळ्या घातल्या होत्या) फ्रेंच कामगारांना त्यांच्या कामगार पूर्वजांच्या शौर्याची आठवण करून देतात, जे वेतनी-गुलामीच्या विरोधात संघर्षात उतरले होते. कम्युन संपूर्ण कामगार वर्गाचा वारसा सुद्धा आहे. ही पहिली अशी क्रांती होती, जिच्यामध्ये कामगारांनी फक्त संघर्ष नाही केला तर त्याला नियंत्रित पण केले आणि कामगारवर्गीय उद्दिष्टाच्या बाजूने दिशा दिली.



**6.** पॅरिस कम्युन क्रांतिकारी कामगार वर्गाची युगप्रवर्तक मिळकत आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघाच्या(पहिले इंटरनॅशनल) आपल्या ऐतिहासिक "संबोधन" च्या शेवटी कार्ल मार्क्सचे हे शब्द होते: "कामगारांचे पॅरिस आणि त्यांच्या कम्युनला नव्या समाजाच्या गौरवपूर्ण अग्रदुताच्या स्वरूपात नेहमी लक्षात ठेवले जाईल. कम्युनच्या शहीदांनी कामगार वर्गाच्या हृदयात आपले कायमस्वरूपी स्थान बनवले आहे. कम्युनचा संहार करणाऱ्यांना इतिहासाने नेहमीकरिता आरोपीच्या पिंजऱ्यात असे उभे केले आहे की त्यांच्या पुरोहितांनी कितीही प्रार्थना केली तरी त्यांना सोडवण्यात ते अयशस्वी राहतील."



**समाप्त**

# कामगार वर्गाचा राजकीय पक्ष कसा असावा? (पुष्प दुसरे)

पान 8 वरून

राजकीय वर्गाच्या, कामगार वर्गाच्या रूपात बदलू शकत नाही.

कामगार पक्षाच्या प्रचारात राजकीय शिक्षण कसे असावे, याचे ठोस उत्तर देताना लेनिन म्हणतात की:

कम्युनिस्टांचा आदर्श "आदर्श ट्रेड युनियनचा सचिव नाही, तर एक असा जननायक असला पाहिजे ज्यामध्ये अत्याचार आणि दडपशाहीच्या प्रत्येक उदाहरणाने, मग ते कोणत्याही जागी झालेले असो आणि कोणत्याही वर्गाशी किंवा स्तराशी त्याचा संबंध असो, विचलित होण्याची क्षमता असेल, ज्याच्यामध्ये त्या सर्व उदाहरणांचे सामान्यीकरण करून पोलिसांची हिंसा तसेच भांडवली शोषणाचे एक अविभाज्य चित्र बनवण्याची क्षमता असेल; ज्याच्यामध्ये प्रत्येक घटनेचा, मग ती कितीही छोटी का असेना, फायदा घेऊन आपल्या समाजवादी विश्वासांना तसेच आपल्या लोकशाही मागण्यांना सर्व लोकांना समजावू शकण्याची आणि सर्व लोकांना कामगार वर्गाच्या मुक्ती संग्रामाचे विश्व-ऐतिहासिक महत्व समजावू शकण्याची क्षमता असेल." कामगार वर्गाच्या पक्षाने कामगार वर्गाला सर्व जनतेच्या जीवनाचे आणि व्यवहाराचे भौतिकवादी मूल्यांकन करायला शिकवले पाहिजे. लेनिनच्याच मते, "कामगार वर्गाची चेतना तोपर्यंत खरी राजकीय चेतना बनू शकत नाही, जोपर्यंत कामगारांना अत्याचार, दडपशाही, हिंसा आणि अनाचाराच्या सर्वच मामल्यांचे उत्तर देणे, मग भले त्यांचा संबंध कोणत्याही वर्गाशी असो, शिकवले जात नाही. आणि त्यांनी कम्युनिस्ट दृष्टीकोनातून उत्तर दिले पाहिजे, ना की इतर एखाद्या दृष्टिकोनातून. सामान्य कामगारांची चेतना तोपर्यंत खरी वर्गचेतना बनू शकत नाही जोपर्यंत कामगार ठोस आणि तत्कालिक राजकीय तथ्य आणि घटनांमधून दुसऱ्या प्रत्येक सामाजिक वर्गाचे त्याच्या बौद्धिक, नैतिक आणि राजकीय जीवनाच्या सर्व अभिव्यक्तींमध्ये अवलोकन करणे शिकत नाहीत, जोपर्यंत कामगार जनसमुदायांच्या सर्व वर्गांचे, स्तरांचे आणि समूहांचे जीवन तसेच कामांच्या सर्व बाजूंचे भौतिकवादी विश्लेषण आणि भौतिकवादी मूल्यांकन व्यवहारात करणे शिकत नाहीत." फक्त याच माध्यमातून कामगार वर्ग विद्यार्थी, शेतकरी, निम्न-भांडवलदार आणि इतर स्तरांची आर्थिक प्रकृती आणि त्यांच्या सामाजिक व राजकीय गुणांचे स्पष्ट चित्र बनवू शकतो. फक्त तेव्हाच कामगार वर्ग तसेच सामान्य कामकरी जनता त्या नाऱ्यांचा आणि बारीक सूत्रांचा अर्थ समजू शकते ज्यांच्यामागे प्रत्येक वर्ग आणि त्याचा प्रत्येक स्तर "आपल्या मनातील गोष्ट लपवतो." यालाच लेनिन सर्वांगीण राजकीय भंडाफोड म्हणतात जो कामगार वर्ग आणि सामान्य कामकरी जनतेच्या क्रांतिकारी क्रियाशीलतेला प्रशिक्षित करण्याची मूलभूत अट आहे.

आपण राजकीय प्रचाराच्या सारतत्वाची गोष्ट थोडक्यात समजून घेतली. परंतु कामगार पक्षाच्या प्रचारात या सारतत्वाला सुद्धा वेगवेगळ्या पद्धतीने मांडले जाते. कामगार वर्गाच्या पक्षाचे क्रांतिकारी प्रचार करण्याचे दोन प्रकार असतात: प्रचारात्मक (प्रोपगेंडा), आणि क्षोभकारक (एजिटेशन). हे दोन्ही वेगवेगळे प्रचार नाहीत, तर एकाच सारतत्वाला मांडण्याच्या भिन्न पद्धती आहेत. लेनिन प्रचारक आणि क्षोभकारक प्रचारातील फरक सांगताना म्हणतात: जर "... बेरोजगारीच्या प्रश्नावर प्रचारक बोलत असेल, तर त्याने आर्थिक संकटांच्या भांडवली स्वरूपाला समजावले पाहिजे, त्याने सांगितले पाहिजे की सध्याच्या समाजात अशी संकटे येणे का अनिवार्य आहे आणि त्यामुळे समाजाला समाजवादी समाजात बदलणे गरजेचे आहे, इत्यादी. थोडक्यात हे की प्रचारकाने जनतेसमोर अनेक-सारे विचार प्रस्तुत केले पाहिजेत, इतके-सारे विचार की फक्त (तुलनेने) थोडेसे लोकच त्यांना एका अविभाज्य आणि संपूर्ण एककाच्या रूपात समजू शकतील. परंतु या प्रश्नावर जेव्हा कोणी क्षोभकारक बोलेल, तर तो एखाद्या अशा गोष्टीचे उदाहरण देईल, जी सर्वाधिक ज्वलंत असेल आणि ऐकणारे जिला सर्वात व्यापक रूपाने समजत असतील – उदाहरणार्थ, भुकेने झालेला एखाद्या बेरोजगार कामगाराच्या परिवारातील मृत्यू, वाढती गरिबी, इत्यादी - आणि मग उदाहरणांचा वापर करत, ज्यांच्याशी सर्वजण परिचित आहेत, तो "सामान्य जनते"समोर फक्त एक विचार ठेवण्याचा प्रयत्न करेल, म्हणजे हे की हा अंतर्विरोध किती विसंगत आहे की एकीकडे तर धनसंपत्ती वाढतेय तर दुसरीकडे गरिबी वाढत आहे. या घोर अन्यायाविरोधात क्षोभकर्ता जनतेमध्ये असंतोष आणि राग निर्माण करण्याचा प्रयत्न करेल तसेच या अंतर्विरोधाचे आणि पूर्ण स्पष्टीकरण देण्याचे काम तो प्रचारकासाठी सोडेल. थोडक्यात, प्रचारक छापिल सामग्रीचा वापर करतो, तर क्षोभकर्ता जिवंत शब्दांचा वापर करतो."

प्रचारक भांडवली व्यवस्थेच्या अंतर्विरोधांना त्यांच्या समस्त क्लिष्टतेत समजतो आणि म्हणूनच जनतेच्या समोर विचारांच्या संपूर्ण साखळीद्वारे पूर्ण चित्र रंगवतो, जेव्हाकी क्षोभकर्ता या अंतर्विरोधाच्या एका प्रातिनिधिक बाजूला पकडून असंतोष आणि राग निर्माण करतो.

कामगार पक्षाच्या प्रचाराशी जोडलेला शेवटचा मुद्दा प्रचाराच्या रूपांचा आहे. कामगार वर्गाच्या पक्षाच्या प्रचाराची तीन रूपं असतात: व्यक्तिगत रूपाने केलेले तोंडी अभियान, राजकीय आणि कामगार आंदोलनांमध्ये केलेला प्रचार, तसेच मासिके-नियतकालिकांद्वारे आणि साहित्याद्वारे केला जाणारा प्रचार. कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी प्रचाराच्या या तीन रूपांमध्ये नियमाने कोणत्या ना कोणत्या रूपाने भाग घेतला पाहिजे. पुढील लेखामध्ये आपण कामगार पक्षाद्वारे सामान्य जनतेच्या संघर्षांमध्ये भागिदारी आणि राजकीय संघर्षांवर बोलू.

(मूळ हिन्दी लेख मजदूर बिगुल, जानेवारी 2022 मध्ये प्रकाशित)

**अनुवाद:** अभिजित

(अपूर्ण, पुढील अंकांमध्ये चालू राहील.)

# लैंगस्टन ह्युजेसच्या काही कविता

## उफाळणारे जलनग

तुम्हा लोकांसाठी  
तुम्ही लोक, जे की समुद्रावरचा फेस मात्र आहात  
समुद्र नव्हे  
काय अर्थ आहे तुमच्यासाठी  
लहरींच्या सतत माऱ्याने तुटणाऱ्या पर्वतांचा  
वा त्या लहरींचा  
अथवा या उफाळलेल्या जलनगांच्या अदम्य सामर्थ्याचा  
तुम्ही तर समुद्रावरचा फेस मात्र आहात  
तुम्ही धनदांडगे  
समुद्र नाही आहात

## जुलूम

स्वप्नं  
नाही येत आता  
स्वप्नं पाहणाऱ्यांकडे  
ना गीतं येतात  
गाणं गाणाऱ्यांकडे

काही देशांत  
रात्रीचा काळोख  
आणि थंडगार लोखंड पसरलेला आहे  
चोहीकडे हवेमध्ये  
परंतु स्वप्नं  
येतील नव्याने पुन्हा  
आणि गीतं  
फोडतील  
या कैदखान्यांना

## न्याय

न्याय एक आंधळी देवता आहे  
आम्हा काळ्या लोकांना समजते  
तिला बांधलेल्या पट्टीच्या पलीकडे लपले आहेत दोन सडके घाव  
जिथे कदाचित असायचे दोन डोळे

(अनुवाद: अमन)

# डब्ल्यू.टी.ओ. संमेलनात भारत सरकारकडून देशी भांडवलदारांच्या वर्गहितांची भुमिका

## साम्राज्यवादाचा दलाल नव्हे तर 'ज्युनियर' भागीदार असल्याचे पुन्हा सिद्ध

✎ रवि

नुकतेच जागतिक व्यापार संघटनेचे (वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन डब्ल्यू.टी.ओ.) 12वे मंत्री संमेलन जिनिव्हा येथे पार पडले. या संमेलनात भारताने मांडलेल्या भुमिकांना घेऊन संमेलनात भारताची बाजू वरचढ ठरली की नाही याबद्दल देशभरात विविध चर्चांना उधाण आले आहे. भाजप समर्थक मोदीची पाठ थोपटवून भारताने शेतकरी, मच्छीमार, गरीब आणि लघु व मध्यम उद्योगांचा आवाज आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवला असे गोडवे गात आहेत. तर काहीजण भारताने जागतिक भांडवलदार वर्गासमोर नांगी टाकल्याचे बोलत आहेत. सत्य या दोन्हीपेक्षा वेगळे आहे. ना मोदीं सरकारने देशातील जनतेचे हित जपले आहे, ना जागतिक भांडवलदार वर्गासमोर गुडघे टेकले आहेत. मोदी सरकारने डब्ल्यु.टी.ओ. मध्ये भारतातील भांडवलदार वर्गाच्या राज्यसत्तेची भुमिका निभावत बाजू मांडली आहे.

भांडवलशाहीत राष्ट्रहित हे भांडवलदारांचेच हित असते आणि ते साधत असताना भांडवलदारवर्ग देशातील आर्थिक-सामाजिक-राजकीय समिकरण लक्षात घेऊन तोलुन-मापुन धोरणं आखत असतो जे त्याच्या दुरगामी फायद्याचे असतात. परंतु हे उघड उघड न दाखवता ही धोरणं जनतेच्या फायद्याची असल्याचा आव राज्यसत्ता आणत असते. त्यामुळे भारताने घेतलेल्या भुमिकांचे भांडवली विचारक करत असलेले विश्लेषण व्यर्थ असुन, भारतीय भांडवलदार वर्गाच्या साम्राज्यवादी शक्तींसोबत वाटाघाटी करण्याच्या क्षमतेचे विश्लेषण करणे गरजेचे आहे.

या भूमिकांचे विश्लेषण करण्याआगोदर जागतिक व्यापार संघटना, म्हणजेच डब्ल्यू. टी. ओ. काय आहे हे जाणून घेऊ. डब्ल्यू. टी. ओ. ही एक आंतरराष्ट्रीय संघटना आहे जी सदस्य देशांमधील व्यापाराचे नियमन आणि सुलभीकरण करण्यासाठी स्थापन करण्यात आली आहे. सध्या 164 देश डब्ल्यू. टी. ओ. चे सदस्य आहेत. मुक्त व्यापार सुरळीत चालण्यासाठी डब्ल्यू. टी. ओ. चे सदस्य देश चर्चा करून एकमताने काही नियम ठरवतात आणि त्यांना लागू करतात. आर्थिक वादविवाद सोडवण्यासाठीसुद्धा या व्यासपीठाचा वापर होतो. एकंदरीत, वेगवेगळ्या देशांतील मोठ्या भांडवलदारांनी आपसांत वाटाघाटी करून, म्हणजेच स्पर्धेद्वारे आपापले हित जोपासताना, समान सहमती बनवावी यासाठीचा मंच म्हणजे डब्ल्यू. टी. ओ. जगभरातील भांडवलदारांमध्ये नफ्याच्या वाट्यावरून स्पर्धा असल्यामुळे आणि आपापल्या राज्यसत्तांच्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करत असल्यामुळे जे अंतर्विरोध आहेत, ते अशा मंचांवर अभिव्यक्त होतात.

### कोरोना-प्रतिबंधक लसींवरील स्वामित्व हक्क

डब्ल्यू. टी. ओ. च्या सर्व सदस्य देशांनी कोरोना-प्रतिबंधक लसींवरील स्वामित्व हक्क (पेटंट) तात्पुरते आणि मर्यादित रूपात विसर्जित करण्याला मान्यता दिली. 5 वर्षांसाठी सदस्य देश कोरोना-प्रतिबंधक लसींचे उत्पादन स्वामित्व हक्क धारकांच्या सहमतीशिवाय करू शकतील. तसेच आयात केलेल्या लसींच्या निर्यातीवर असलेली 49% ची मर्यादा काढून 100% निर्यातीला संमती दिली गेली. जेव्हा विकसित देशांतील लस उत्पादक स्वामित्व हक्क वापरून महामारीच्या काळात नफ्याचे




डोंगर उभे करत होते तेव्हा भारत आणि दक्षिण अफ्रिकेने लसींवरील स्वामित्व हक्क विसर्जित करण्याच्या अभियानाची सुरुवात केली ज्याला नंतर 100 पेक्षा जास्त देशांचा पाठिंबा मिळाला. आता या करारानंतर वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी "इतर विकसनशील देशांना लस निर्मिती प्रकल्प उभे करण्यास सहाय्य करण्यासाठी भारतीय लस उत्पादक तयार आहेत" हे विधान करून भारतीय भांडवलदारांची इच्छाच बोलून दाखवली आहे. भारताचा पेटंटच्या कल्पनेला विरोध नाहीच कारण तो स्वत: भांडवली देश आहे. इथे फक्त एका मुद्यावर तात्पुरती सवलत मिळवली गेली आहे, ज्याद्वारे भारताने देशांतर्गत लसनिर्मात्या भांडवलदारांचे हित साधले आहे.

### मासेमारी

डब्ल्यू. टी. ओ. मध्ये मासेमारीचा प्रश्न 21 वर्षांपासून फसला होता. खोल समुद्रातील अतिमासेमारीमुळे जगभरातील एक तृतीयांश मत्स्य साठे धोक्यात आले आहेत. यावर उपाय म्हणून मासेमारीसाठी दिले जात असलेले अनुदान संपवण्याचा प्रस्ताव विकसित देशांकडून मांडण्यात आला होता. मासेमारीला अनुदान देण्यामध्ये चीन सर्वात पुढे आहे आणि त्यामुळेच समुद्री खाद्य निर्यातीमध्ये चीनचा जगात पहिला क्रमांक लागतो. भारतात मासेमारी क्षेत्रात जवळपास 3 कोटी रोजगार आहेत. जवळपास 35 लाख लोक समुद्रात मासेमारी करतात. भारतात मुख्यत्वे पारंपारिक पद्धतीने मासेमारी केली जाते. जवळपास 67% मासेमार कुटूंब दारिद्र्य रेषेच्या खाली आहेत; सरकारी अनुदानावरच त्यांचे अस्तित्व टिकून आहे. भारतात मासेमारीमध्ये यांत्रिकीकरणाचे प्रमाण फार कमी आहे. एकूण मत्स्य उत्पादनात औद्योगिक मासेमारीचा वाटा अल्प आहे. मासेमारी करणारा वर्ग हा मोठ्या प्रमाणात निम्न-भांडवलदार वर्ग आहे, ज्याचा पाठिंबा भांडवली राज्यसत्तेच्या अस्तित्वाकरिता महत्वाचा आहे. म्हणूनच राज्यसत्तेचे दुरगामी हित लक्षात घेता, भारताने या प्रस्तावाला विरोध केला. शेवटी फक्त बेकायदेशीर, अनियंत्रित, नोंद नसलेल्या आणि अतिमासेमारीला अनुदान न देण्याच्या प्रस्तावावर एकमत झाले ज्यात वरील शद्बांचे अर्थ संबंधित सरकारांनी लावायचे आहेत.

### अन्न सुरक्षा

युक्रेन-रशिया युद्धाने संपुर्ण जगासमोर अन्नपुरवठ्याचे संकट उभे ठाकले आहे. जागतिक स्तरावर गव्हाचे आणि सातुचे 33%, मक्याचे 52% आणि सूर्यफूलाच्या तेल आणि बियांचे 50% पेक्षा जास्त उत्पादन या दोन देशांमध्ये होते. त्यामुळे युरोपिय देशांनी आणि अमेरिकेने मिळून देशांतर्गत सार्वजनिक अन्नसाठा करण्याचा देशांचा अधिकार संपवून अन्नधान्याचा मुक्त व्यापार सुरू करण्याचा प्रस्ताव डब्ल्यू. टी. ओ. मध्ये मांडला. या प्रस्तावावर देशांतर्गत अन्नसुरक्षा लक्षात घेता भारताने असहमती दर्शवली. उष्णतेच्या लाटेचा देशातील गव्हाच्या उत्पादनावर परिणाम झाल्याने नुकतेच भारताने देशांतर्गत मागणी भागवण्यासाठी गव्हाच्या निर्यातीवर बंदी आणली. परंतु त्याचवेळेस सार्वजनिक अन्नसाठ्यातुन निर्यात करण्यावर डब्ल्यू. टी. ओ. ने घातलेली बंदी उठवण्याची मागणी सुद्धा भारताने केली. विकसित देशांच्या विरोधात जाऊन भारताने देशातील अन्नसाठ्याच्या व्यापारावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि जागतिक स्तरावर आपली बाजू बळकट करण्यासाठी ही भुमिका घेतली. शेवटी या मुद्द्यावर एकमत न झाल्याने कोणताही करार झाला नाही. इथेही भारताने एकीकडे देशांतर्गत असंतोष नियंत्रणात ठेवण्यासाठी खुल्या व्यापाराच्या विरोधात, त्याच वेळी आपल्या देशातील कृषक भांडवलदार वर्गाला नफा मिळवून देण्याकरिता इच्छेने निर्यात करण्याची भुमिका स्विकारलेली दिसते.

### इलेक्ट्रॉनिक प्रसारण

भारतामध्ये इलेक्ट्रॉनिक ट्रान्समिशन्सच्या आयातीत झपाट्याने वाढ होत आहे, ज्यात मुख्यत्वे चित्रपट, संगीत, व्हिडिओ गेम्स आणि मुद्रित वस्तूंचा समावेश होतो. भारतासारख्या बहुभाषिक देशात बनणारा इलेक्ट्रॉनिक माल सुद्धा स्थानिक भाषांमध्ये बनत असल्यामुळे या मालाची निर्यात नगण्य आहे. इतर अनेक विकसनशील देशांमध्ये सुद्धा हीच परिस्थिती आहे. म्हणून भारताने या प्रकारच्या मालावर सीमाशुल्क आकारण्यावर डब्ल्यू. टी. ओ. ने 1998 पासून लादलेल्या बंदीला उठवण्याचा प्रस्ताव दिला. या बंदीमुळे विकसनशील देश 10 अब्ज डॉलर्सचा आयात महसूल मिळवण्यापासून वंचित आहेत. परंतु या प्रस्तावावर सुद्धा एकमत न झाल्याने ही बंदी पुढेही चालु राहील. या प्रस्तावावर मात्र विकसित भांडवली देशांमधील भांडवलदार वर्गाने करार होऊ न दिल्याचे दिसून येते. इथे भारताचे प्रयत्न जागतिक वरकडामध्ये (surplus) आपला वाटा वाढवण्याचे प्रयत्न होते असे दिसते.

डब्ल्यू. टी. ओ. च्या 12 व्या संमेलनात झालेल्या चर्चेतुन हे दिसुन येते की भारताने प्रत्येक महत्वाच्या मुद्यावर देशी भांडवलदार वर्गाचे हित लक्षात घेऊन, साम्राज्यवादी शक्तींच्या प्रभावाला बळी न पडता, उलट त्यांच्या आपसांतील अंतर्विरोधांचा फायदा घेत देशांतर्गत वरकडाचा जास्तीत जास्त वाटा आपल्या पदरात पाडण्यासाठी, आणि त्याचवेळी जागतिक वरकडाचा वाढता वाटा मिळवण्यासाठी प्रयत्न केले आहेत. भारताला साम्राज्यवादी शक्तींचा गुलाम किंवा दलाल म्हणवणाऱ्या "विद्वान" बुद्धीजीवींना ही एक चपराकच आहे. खरे पाहता भारत किंवा वसाहतवादापासून मुक्त झालेले तत्सम स्वतंत्र देश साम्राज्यवादाचे जुनियर भागीदार म्हणुन भुमिका निभावत आहेत. देशांतर्गत वरकडाच्या विनियोगाचा मोठा हिस्सा स्वतःकडे ठेऊन हे देश छोटा हिस्सा साम्राज्यवादी शक्तींना देतात, आणि बदल्यात जागतिक वरकडाचा छोटा हिस्सा ते प्राप्त करतात. ते साम्राज्यवादी अमेरिकन गटामध्ये किंवा सायनो-रशियन गटामध्ये पुर्णपणे सामिल झालेले नाहीत तर या दोन्ही गटांच्या आंतरसाम्राज्यवादी स्पर्धेचा फायदा घेत स्वतःचे हित जपत आहेत.

# राहुल गांधींची सुद्धा ईडी चौकशी: वाढत्या आर्थिक संकटापायी भांडवलदार वर्गाच्या वाढत्या दमनकारी चरित्राची अभिव्यक्ती

✎ राहुल

नुकतीच राहुल गांधींची ईडी चौकशी झाली आहे. यानिमित्ताने केंद्राकडून चाललेला केंद्रिय तपास यंत्रणांचा "गैर"वापर चर्चिला जात आहे. केंद्रातील भाजप सरकारकडून गेल्या काही वर्षांमध्ये अनेक "विरोधी" पक्षांच्या अनेक नेत्यांमागे ईडी सारख्या यंत्रणांचा ससेमिरा लावून त्यांची संपत्ती जप्त केली गेली आहे. तामिळनाडूतील डी.एम.के. चे मुख्यमंत्री स्टॅलीन यांची मुलगी, बंगालमध्ये मुख्यमंत्री ममता बॅनर्जींचा भाचा अभिषेक बॅनर्जी, महाराष्ट्रात अजित पवारांचे नातेवाईक, प्रफुल्ल पटेल, जम्मू-काश्मिरचे माजी मुख्यमंत्री फारूक अब्दुल्ला, कर्नाटकातील काँग्रेस अध्यक्ष डी.के. शिवकुमार, राजस्थान काँग्रेसचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांचा भाऊ अग्रसेन, अशी बरीच मोठी यादी देता येईल. यासोबतच बंगालमधील सुवेंदू अधिकारी, मुकूल रॉय, तेलंगणातील टी.डी.पी.चे नेते वाय.एस. चौधरी, आसाममधील हेमंत बिस्वशर्मा, असे जे नेते भाजपला सामील झाले अशा अनेक नेत्यांवरच्या ईडीच्या कारवाया थंडावल्याचे सहज दिसून येते. हे स्पष्ट आहे की भाजपकडून ईडीचा वापर भांडवली पक्षांच्या राजकीय विरोधकांना नामोहरम करण्यासाठी केला जात आहे.

सीबीआय, ईडी, इन्कमटॅक्स खाते यासारख्या केंद्रिय तपासयंत्रणांच्या तथाकथित "गैर" वापराबद्दल एकीकडे बरीच ओरड चाललेली दिसते, तर दुसरीकडे जनतेचा एक हिस्सा यावरही समाधानी होताना दिसतो की "लोकशाही" तिचे काम चांगले करत आहे आणि भ्रष्टाचार उघडकीस आणण्याचे काम मोदी सरकार करत आहे. तिसरीकडे काही लोक भ्रष्टाचारावर तोंड उघडावे की मोदी सरकारविरोधात बोलावे याबद्दल संभ्रमात आहेत. असेही म्हटले जात आहे की तपास यंत्रणांचा गैरवापर काँग्रेस सरकारांनी नेहमीच केला होता आणि भाजप सरकार जे करत आहे त्यामध्ये वेगळे काही नाही.

**धूर आहे तर आग असलीच पाहिजे.** भ्रष्टाचाराच्या गटारगंगेत लोळून संपत्तीरूपी चिखलाचे थर मिरवणारे हे सर्व राजकीय नेते आहेत. भ्रष्टाचाराच्या माध्यमातून गडगंज संपत्ती न मिळवणारा भांडवली नेता आज विरळाच मानला जाईल. परंतु भाजपचे नेते तर शेरास सव्वाशेर म्हणावे इतके भ्रष्ट आहेत. महाराष्ट्रात भाजपने सध्या चालवलेली शिवसेनेच्या आमदारांची खरेदी या भ्रष्टाचाराच्या साखळीतली नवीनतम कडी आहे. त्यामुळे हा भ्रम सोडला पाहिजे की भाजप भ्रष्टाचाराच्या विरोधात खरोखर काही पावले उचलत आहे.

आर्थिक गैरव्यवहारांच्या चौकशीकरिता ईडी ही संस्था बनवली गेली आहे आणि तिला आरोपींची खाजगी संपत्ती जप्त करण्याचा अधिकार आहे. गेल्या 10 वर्षांमध्ये ईडीकडून रु. 50,000 कोटींपेक्षा जास्त संपत्ती जप्त केली गेली आहे, जी भ्रष्टाचाराची व्याप्ती पाहता फार मोठी म्हणता येणार नाही. तेव्हा भ्रष्टाचार संपवणे दूरच, त्याला रोख लावणे हे सुद्धा या कारवायांचे उद्दिष्ट नाहीये कारण मूळात कारवाया होतच आहेत थोड्या आणि हे विसरता कामा नये की यापैकी बहुसंख्य प्रकरणांमध्ये तपास अतिशय धीमा चालू आहे आणि भाजपच्या नेत्यांना तर पैसे खाण्याची खुली सूट मिळालेलीच आहे. इतिहास पाहता अनेक प्रकरणे सिद्ध होण्याची शक्यता नाममात्र आहे. तेव्हा होत असलेल्या कारवायांमागे राजकीय विरोधकांना धाकात आणणे हेच भाजपचे मुख्य उद्दिष्ट आहे.

यासंदर्भातील विविध प्रकारच्या संभ्रमांच्या जाळ्याला दूर करत राजकीय गर्भितार्थापर्यंत पोहोचण्यासाठी सर्वप्रथम हे समजले पाहिजे की भांडवलशाहीमध्ये कोणत्याही सरकारचे काम हे भांडवली व्यवस्थेच्या (म्हणजेच खाजगी भांडवली मालकी, बाजाराची व्यवस्था, नफ्यासाठी उत्पादन, कामगारांच्या श्रमशक्तीचे शोषण, इत्यादींची व्यवस्था) दीर्घकालिक हितांचे रक्षण आणि या व्यवस्थेचे संचालन असते. भांडवलदार वर्गाचे विविध गट आपसात नफ्याच्या दराची स्पर्धा करतात. मोठे भांडवलदार, मध्यम/छोटे भांडवलदार,औद्योगिक/वाणिज्यिक/वित्तीय भांडवलदार, प्रादेशिक भांडवलदार, असे भांडवलदार वर्गाचे विविध गट एकमेकांशी स्पर्धाही करतात आणि त्याचवेळी कामगार वर्गाच्या शोषणाकरिता एकही असतात. त्यांच्या याच हितसंबंधांचे प्रतिबिंब असते भांडवली राजकीय व्यवस्थेतील संघर्ष. विविध राजकीय पक्ष हे भांडवलदार वर्गाच्या विविध हिश्श्यांच्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करतात, पण त्याच वेळी प्रत्येक पक्ष हा भांडवली व्यवस्थेच्या रक्षणासाठी सुद्धा कटिबद्ध असतो. ईडी सारख्या संस्था ज्या "खाजगी" संपत्ती जप्त करू शकतात, या भांडवली व्यवस्थेच्या दूरगामी हितांच्या रक्षणासाठीच असतात. भांडवलदार वर्गाचे सामूहिक हित जपले जावे याकरिता वैयक्तिक भांडवलदारांविरोधात कारवाया केल्या जाऊ शकतात आणि त्याकरिताच अशा संस्था बनवल्या जातात.

2012-13 पासून भारतातील अर्थव्यवस्थेचे नफ्याच्या दराच्या घसरणीचे संकट गडद होत चालले होते आणि अशामध्ये काँग्रेसचे तुलनेने 'लिबलिबित' नेतृत्व ते कायदे, नियम, सुधारणा बनवण्यास अडखळत होते ज्यांची भांडवलदार वर्गाला नफ्याचा दर चढा ठेवण्यासाठी गरज होती. थोडक्यात कामगार कायदे बदलणे, जनतेचे नागरी-लोकशाही अधिकार धाब्यावर टांगणे, मोठमोठ्या भांडवलदारांवर सवलतींची उधळण करत असताना मूलभूत गरजांच्या मुद्यांपासून राजकारण भरकटवत जात-धर्माचे राजकारण वेगवान करणे , आणि त्यासोबतच आपल्या बेकायदेशीर फॅसिस्ट गुंडसेनांच्या मदतीने दहशतीचे वातावरणही तयार करणे याची पूर्तता करणारा फॅसिस्ट भाजपच त्यामुळे बड्या भांडवलदार वर्गाचा लाडका पक्ष बनलेला आहे आणि निधीचा ओघही भाजपकडेच जात आहे. असे असले तरी काँग्रेस आणि भाजप हे दोन्ही पक्ष देशातील बड्या भांडवलदार वर्गाच्या हितांचे प्रतिनिधित्व करणारे पक्ष आहेत आणि प्रदीर्घ काळ याच दोन्ही पक्षांची केंद्रात सत्ता राहिली आहे आणि काँग्रेस पक्षाने स्वातंत्र्यानंतरची 50-60 वर्षे इमानइतबारे याच भांडवलदार वर्गाची सेवा केली आहे. एकमेकांच्या खालच्या स्तरावरील नेत्यांवर कारवाया, राजकीय कुरघोड्या, शेरेबाजी-टीकाटिपण्या, खरे-खोटे आरोप, रस्त्यावरच्या झडपा, कार्यालयांवरचे छोटे-मोठे हल्ले, तत्कालिन आरोप-हेत्वारोप-चौकशा-अटका यासारख्या गोष्टी राजकीय पक्ष नेहमीच आपसात करत आलेत, परंतु आपापल्या सर्वोच्च नेत्यांना सहसा "हात लावू नये" असा अलिखित प्रघातही बऱ्यापैकी पाळला गेला आहे. याचे कारण आहे भांडवलदार वर्गासोबत असलेले या "राष्ट्रीय" पक्षांचे नाते, आणि त्याद्वारे आपसात टिकवलेली धंद्याची गणितं. आपसातील राजकीय कुरघोडींमध्ये एकमेकांवर आरोप, चौकशा आणि काही प्रमाणात अटका हे सुद्धा इतिहासात दिसून येतेच. इंदिरा गांधींनी आणीबाणी लावून सर्व विरोधकांना अटकेत टाकले होते आणि उलट राजीव गांधीना सुद्धा बोफोर्स घोटाळ्यात चौकशीला सामोरे जावे लागले. शरद पवारांच्या भूखंड घोटाळ्याच्या चौकशीपासून ते ए.राजांना झालेली टू-जी घोटाळ्यातील कैद ही काही वानगीदाखल उदाहरणे. परंतु या उदाहरणांमध्ये राजकीय कुरघोडीचा आणि तात्कालिकतेचा पैलू प्रधान होता, जेव्हा की आज भाजपने जो कारवायांचा रणगाडा चालवला आहे, त्यामागे एक नियोजनबद्ध मोहीम आहे जी सर्वच राजकीय विरोधकांना टाचेखाली आणू पहात आहे. त्यामुळे सद्यकाळात भाजपने चालवलेला ईडीच्या कारवायांचा धडाका, आणि त्याचे आता राहुल-सोनिया गांधींपर्यंत पोहोचणे, कारवायांच्या साखळीमध्ये आता काँग्रेसच्या "सर्वात" मोठ्या नेत्यांवर कारवाई होणे, ही सत्ताधारी वर्गाची तगमग कुठवर पोहोचली आहे याची आणि भांडवलदार वर्गाला लोकशाहीच्या दिखाव्याची गरज संपत चालली आहे याचीच निदर्शक आहे.

युपीए-2 च्या काळापासून तीव्र होत गेलेल्या आर्थिक संकटाचे मळभ मोदी सरकार सत्तेत आल्यानंतरही हटलेले नाहीये. जीडीपीच्या वाढीचा दर कुठींत आहे आणि मोदी सरकारने केलेल्या आकडेमोडीतील हेराफेरीला काढले तर स्थिती अधिकच बिकट असल्याचे दिसते. बँका बुडीत कर्जापायी दिवाळखोरीकडे जात आहेत, आणि मोदी सरकारने आजवर बँकाना वाचवणाऱ्या सोन्याच्या खाणीचे म्हणजे एल.आय.सी. चे सुद्धा खाजगीकरण करायला काढले आहे. रिझर्व बँकेकडे असलेली रक्कम सुद्धा मोदी सरकारने वापरायला काढली आहे. अशामध्ये कोव्हिडने कंबरडे मोडले आणि रशिया-युक्रेन युद्धाने पेकाटात लाथ घातली आहे आणि मोदी सरकारची नोटबंदी, जी.एस.टी. सारखी पावले अजूनही फटके देतच आहेत. अशामध्ये अभूतपूर्व महागाईने जनतेच्या असंतोषाला तोंड फोडणे चालू केले आहे. अशा सर्व परिस्थितीमध्ये भांडवलदार वर्गाची गरज आहे की सत्तेवर पकड मजबूत रहावी याकरिता सर्व प्रकारचा विरोध दाबला गेला पाहिजे आणि विद्यमान फॅसिस्ट सरकारला सर्व निर्णय बिनबोभाट घेता आले पाहिजेत. आणीबाणी लागू केली गेली होती, तेव्हा ती देशामध्ये वाढत्या राजकीय संकटावर भांडवलदार वर्गाद्वारे दिली गेलेली एक खूप सुविचारित नसलेली तडकाफडकी प्रतिक्रिया होती, परंतु आज जी दडपशाही चालू आहे ती सुविचारित आणि नियोजनबद्ध आहे.

भांडवलदार वर्गाच्या विविध थिंक टॅंक्स मध्ये सुद्धा अर्थव्यवस्था कशी चालवली जावी यावरून मतभेद असतातच. खुद्द मोदी सरकारचेच अरविंद सुब्रह्मण्यम सारखे पूर्वीचे आर्थिक सल्लागार त्यांना सोडून गेले आहेत. परंतु आर्थिक संकट तीव्र होत असताना अशा मतभेदांची तीव्रता राजकीय घर्षणाकडे नेल्याशिवाय कशी राहील? आजच्या परिस्थितीमध्ये बड्या भांडवलदार वर्गाच्या विविध गटांचे आपसातील अंतर्विरोध थोडे जास्तच टक्करत आहेत हे नक्की. तीव्र होणारे आर्थिक संकट राजकीय स्वातंत्र्याच्या गळचेपीला जन्म देते आणि भांडवली व्यवस्था तिच्या "भांडवलदार वर्गाची हुकूमशाही" या खऱ्या रूपात नागडी होऊन समोर येऊ लागते. राहुल गांधी, सोनिया गांधींपर्यंत पोहोचलेल्या ईडी कारवाईमागे ही राजकीय-आर्थिक पार्श्वभूमी आहे.

कामगार वर्गाने समजले पाहिजे की या कारवाया म्हणजे भ्रष्टाचाराविरोधातील मोहिम नाहीच, तर भांडवली पक्षांच्या विरोधकांसहीत सर्व विरोधकांना नामोहरम करण्याचे तंत्र आहे. यामुळेच ती एकंदरीतच भांडवली लोकशाही अवकाशाचे संकुचित होत जाण्याची अभिव्यक्ती सुद्धा आहे. भ्रम न बाळगता हे सुद्धा समजले पाहिजे की हे भांडवलदारांचे प्रतिनिधी एकमेकांना नामोहरम करत असताना भांडवली राज्यसत्तेची शक्ती, म्हणजेच कामगार वर्गाचे दमन करण्याची शक्ती, कुठेही कमी होत नाहीये, तर ती अजून एकतंत्री पद्धतीने एकवटत आहे. कामगार विरोधी कायद्यांची येऊ घातलेली अंमलबजावणी लागू होणे, फौजदारी संहितेमध्ये बदल होऊन दडपशाहीची यंत्रणा मजबूत होणे, धार्मिक तणावांचे वाढणे या सर्व भांडवली संकटाची त्या अभिव्यक्ती आहेत ज्या थेट कामगार वर्गावर हल्ला आहेत. जगव्यापी आर्थिक संकट जसजसे गहरे होत जाईल तसतसे देशातील लोकशाहीचा बुरखा सुद्धा अधिकाधिक गळून पडत जाईल आणि कामगार वर्गावरील हल्लाही वाढत जाईल.

# फॅसिझम ची मुलभूत समजदारी विकसित करा आणि पुढे येऊन आपली जबाबदारी उचला

- कविता कृष्णपल्लवी

फॅसिझमचा विरोध करणारे अनेक बुद्धिजीवी आणि विविध संघटनांमध्येसुद्धा फॅसिझम संदर्भात अनेक प्रकारचे भ्रम आहेत. कामगार बिगुलच्या वाचकांकडूनही फॅसिझमबद्दल विविध प्रकारचे प्रश्न आमच्याकडे येत असतात. कविता कृष्णपल्लवी यांची खालील टिप्पणी आपल्याला हे समजायला मदत करते की फॅसिझम एक सामाजिक आंदोलन आहे, ज्याची मूळे भारतीय समाजात खोलवर गेलेली आहेत. याला केवळ निवडणुकीत हरवून पराजित किंवा नेस्तनाबूत केले जाऊ शकत नाही. त्याविरुद्ध एका लांब पल्ल्याच्या लढाईची तयारी करावी लागेल. ही टिप्पणी मोदी सत्तेत येण्याच्या आधी लिहिली गेली होती परंतु आज ती अजूनच जास्त प्रासंगिक आहे.

- संपादक

1. फॅसिझम मरणासन्न भांडवलशाही आहे (लेनिन). ती वित्तीय भांडवलाच्या आर्थिक हितांची सर्वात प्रतिक्रियावादी अभिव्यक्ती आहे.
2. फॅसिझम अनेक विसंगत तत्वांचे बनलेले एक प्रतिक्रियावादी सामाजिक आंदोलन आहे. मोठ्या वित्तीय-औद्योगिक भांडवलदारांच्या एका हिश्श्याव्यतिरिक्त व्यापारी वर्ग आणि कुलकांचा एक हिस्सासुद्धा याचे समर्थन करतो. उच्च मध्यम वर्गाचा एक हिस्साही याचे समर्थन करतो.
3. फॅसिझम भांडवली व्यवस्थेमध्ये त्रस्त अशा मध्यमवर्गातील पिवळ्या-रुग्ण चेहऱ्याच्या युवकांना लोकरंजक नारे देऊन आणि "निर्माण केलेल्या" खोट्या शत्रुविरुद्ध उन्माद तयार करून आपल्या भोवती संघटित करतो. विमानवीकरण आणि लंपटपणाचे शिकार असलेल्या बेरोजगार-अर्धबेरोजगार, असंघटित युवक कामगारांमधून फॅसिझम आपल्या गुंड संघटनांमध्ये भरती करत असतो.
4. फॅसिझम कठोर पुरुषसत्तावादी आणि स्त्री-विरोधी असतो. प्रथमपासूनच केले जात असलेले स्त्री विरोधी मानसिक अनुकूलन फॅसिस्ट कार्यकर्त्यांना सदाचाराच्या खोट्या वेशात मनोरोगी आणि कुंठितावस्थेचे शिकार बनवतो.
5. फॅसिझम एक कॅडर आधारित प्रतिक्रियावादी सामाजिक आंदोलन आहे, जे समाजात तृणमूल स्तरावर काम करते. ते नेहमीच अनेक संघटना आणि आघाड्या बनवून काम करते. प्रत्येक ठिकाणी त्याच्या विविध प्रकारच्या गुंड संघटना असतात. भांडवली लोकशाहीत संसदीय निवडणूक लढवणारा पक्ष त्याची केवळ एक आघाडी असते.
6. फॅसिझम नेहमीच उग्र अंधराष्ट्रवादी घोषणा देतो. तो नेहमीच संस्कृतीचा बुरखा पांघरून येतो, संस्कृतीचा मुख्य घटक धर्म किंवा वंश सांगतो आणि सांस्कृतिक राष्ट्रवादाचा नारा देतो. अशा प्रकारे देशात बहुसंख्याक धर्म किंवा वंशाचा राष्ट्रवादच मान्य होतो आणि धार्मिक किंवा वांशिक अल्पसंख्यांक बाहेरचे होऊन जातात. या धारणेला आणखी पुष्ट करण्यासाठी फॅसिस्ट इतिहासाला विकृत करतात, मिथकांना ऐतिहासिक सत्य म्हणून पुढे करतात आणि ऐतिहासिक सत्याचे मिथ्याकरण करतात.
7. फॅसिझम धार्मिक किंवा वांशिक अल्पसंख्यांकांना लक्ष्य करण्यासाठी संस्कृती आणि इतिहासाचे विकृतीकरण करण्यासाठी तृणमूल प्रचाराच्या विविध रुपांसोबतच शिक्षणाचा कुशलतेने आणि व्यवस्थित उपयोग करतात. धार्मिक प्रतिष्ठानांचा सुद्धा ते भरपूर वापर करतात.
8. फॅसिस्ट सुव्यवस्थितपणे सैन्य आणि पोलीस तसेच नोकरशाहीमध्ये आपल्या लोकांना घुसवतो तसेच यामध्ये पूर्वीपासून असलेल्या उजव्या विचारसरणीच्या लोकांना हेरुन आपल्या प्रभावाखाली घेतो.
9. स्वतःच्या वृत्तपत्र-नियतकालिकांपेक्षाही अधिक फॅसिस्ट मुख्याधारेच्या भांडवली मीडियाचा वापर करून घेतात. यासाठी ते मीडिया प्रतिष्ठानांमध्ये योजनाबद्ध पद्धतीने आपले लोक घुसवतात आणि उजव्या विचारसरणीच्या बुद्धिजीवींना ओळखून त्यांचा वापर करतात.
10. फॅसिस्ट केवळ इतिहासाचे विकृतीकरण करतात असे नाही तर सामान्यपणे आपल्या हितपूर्तीसाठी कुठल्याही मुद्द्यांमध्ये पूर्णपणे खोट्याला सुद्धा सत्य म्हणून प्रस्तुत करतात. सगळेच फॅसिस्ट गोबेल्सच्या या सूत्र वाक्याला प्रमाण मानतात 'एका असत्याला शंभरदा सांगितले तर ते सत्य वाटायला लागते'.
11. फॅसिस्ट नेहमीच आतल्या-आत सुरुवातीपासूनच कम्युनिस्टांना आपला मुख्य शत्रू मानतात आणि योग्य संधी मिळताच त्यांचा सफाया करतात. डाव्या लेखक-कलाकारांना सुद्धा ते सोडत नाहीत. इतिहासात नेहमीच असे झालेले आहे. फॅसिस्टांबद्दल भ्रमात राहणाऱ्या, निष्काळजीपणे वागणाऱ्या किंवा ढिलेपणाने वागणाऱ्या कम्युनिस्टांना इतिहासात नेहमीच किंमत चुकवावी लागली आहे. फॅसिस्टांनी तर सत्ता सुदृढीकरणानंतर संसदीय कम्युनिस्टांना आणि सामाजिक लोकशाहीवाद्यांना सुद्धा सोडले नाही.
12. आजचे फॅसिस्ट हिटलर प्रमाणे ज्यूंचा सफाया करण्याबाबत विचार करत नाहीत. ते दंगे आणि राज्य प्रायोजित नरसंहाराच्या माध्यमातून दहशत निर्माण करून धार्मिक अल्पसंख्यांकांना अशा पद्धतीचा दुय्यम दर्जाचा नागरिक बनवून देऊ इच्छितात ज्यांच्यासाठी कायदा आणि लोकशाही अधिकारांचा काही अर्थच राहणार नाही. ते खालच्या दर्जाचे मजुरी गुलाम बनून जातील आणि स्वस्त दरांवर त्यांच्या श्रमशक्तीचे शोषण केले जाऊ शकेल. सोबतच कामगार वर्गामध्ये तयार झालेल्या धार्मिक भिंतींचा वापर करून कामगार आंदोलनाला विभागून कमजोर करतो, जेणेकरून आंदोलनाला तोडणे अजून सोपे होऊन जाते.
13. फॅसिस्ट गुंड कुठल्याही देशांमध्ये संपाला तोडण्यासाठी महत्त्वाची भूमिका पार पाडतात. जिथे सुद्धा ते सत्तेमध्ये आले, त्यांनी कम्युनिस्टांचा सफाया करण्यासोबतच कामगार आंदोलनाचे पाशवी दमन केले.
14. भूतकाळातून धडा घेऊन आजचा भांडवलदार वर्ग फॅसिझमचा आपल्या हितपूर्तीसाठी साखळीला बांधलेल्या कुत्र्याप्रमाणेच नियंत्रितपणे वापर करून घेऊ इच्छितो. परंतु हा खतरनाक कुत्रा साखळी तोडू सुद्धा शकतो आणि एवढा उत्पात करू शकतो जेवढी भांडवलदार वर्गाची इच्छासुद्धा नसेल. फॅसिझमच नवउदारवादाच्या धोरणांना दंडुक्याच्या जोरावर लागू करू शकतो, त्यामुळेच संकटग्रस्त भांडवलशाही हा पर्याय निवडण्याकडे जात आहे.
15. जर आपल्यामध्ये थोडी सुद्धा इतिहासाची समज असेल तर ही गोष्ट योग्य प्रकारे समजून घेतली पाहिजे की फॅसिझम सोबत लढण्याचा प्रश्न म्हणजे केवळ निवडणुकीतल्या जिंकण्या-हरण्याचा प्रश्न नव्हे. या तीव्र प्रतिक्रियावादी सामाजिक-राजकीय आंदोलनाचा सामना केवळ एक झुंजार क्रांतिकारी डावे आंदोलनच करू शकते.

**या बाबींसोबत जे साथी सहमत आहेत त्यांनी याचा व्यापक प्रचार करावा आणि स्वतः सुद्धा फॅसिझम विरोधी मोहिमेत सक्रिय सहभागी होण्याविषयी विचार करावा.**

अनुवाद: जयवर्धन

# लोकशाहीची थट्टा चाललेली नाही, ही लोकशाहीच थट्टास्पद आहे!

बदल्यात श्रमशक्ती विकली जाते. रोजच्या जीवनव्यवहारात देवाणघेवाणीतूनच

पान 15 वरून

जीवनगाडा चालतो आणि "माल" खरेदी-विक्री हीच सर्वव्यापी गोष्ट बनत जाते. शिक्षण, आरोग्य, हवा, पाणी सुद्धा माल बनवून विकले जातात! "विकणे" व "विकत घेणे" एक सर्वसामान्य गोष्ट बनत जाते. सर्व मानवी नाती स्पर्धा, देवाणघेवाणीच्या मूल्यांनी ग्रसित होतात. जनता सुद्धा लोकप्रतिनिधी आणि नेत्यांकडून "देवाणघेवाणी"ची अपेक्षा ठेवू लागते आणि "आम्ही तुम्हाला काहीतरी देतो, तर तुम्ही आम्हाला काहीतरी द्या" याच प्रकारच्या विचारांनी राजकारणाकडे पाहू लागते. सत्ता चालवणाऱ्यांनाही कायदे-नियम बनवताना देवाणघेवाणी कराव्या लागतील ही बाब स्विकार्य होऊ लागते. सत्ता अस्तित्वातच असते भांडवलाची सेवा करण्यासाठी, बाजाराच्या व्यवस्थेचे संचालन करण्यासाठी. तेव्हा अशी बाजाराची व्यवस्था चालवण्यासाठी बनलेले पक्ष, लोकप्रतिनिधी, सरकारं बाजाराच्या मूल्य-मान्यतांपासून वेगळी कशी राहतील? म्हणूनच लोकप्रतिनिधींची खरेदी-विक्री ही या सर्व पक्षांसाठी सामान्य बाब असते. त्यांना राग घोडेबाजाराचा नसतो, तर स्पर्धेत आपण हरलो याचा असतो. भांडवली राजकारण न समजलेल्या जनतेच्या एका हिश्श्याला नेहमीच काही काळ "धक्का" बसतो, परंतु बाजाराच्या मूल्य-मान्यता स्विकारलेल्या लोकांसाठी हे प्रश्न खूप गंभीर प्रश्न बनतही नाहीत.

भारतातच असे चालते अशा भ्रमात असाल तर तो लवकर दूर केलेला बरा. अमेरिकेसारख्या "विकसित" भांडवली देशांमध्ये तर कंपन्यांनी लोकप्रतिनिधींना निधी देणे आणि आपल्या हितासाठी 'लॉबिंग' करायला लावणे ही एक उघडपणे केली जाणारी गोष्ट आहे. भांडवलदारांचे हित हेच देशाचे आणि जनतेचे हित आहे या विचाराला इतके रुजवले गेले आहे की भारतात ज्याला भ्रष्ट मार्ग म्हटले जाते तोच अमेरिकेसारख्या देशांमध्ये राजमार्ग आहे! '

### यापुढे काय होणार आहे?

सर्वोच्च न्यायालयात काहीही होवो, धनुष्य-बाण चिन्ह कोणालाही मिळो, शिंदे सरकार राहो वा जावो, कामगार-कष्टकऱ्यांच्या जीवनात काहीही विशेष फरक पडणार नाहीये! मेट्रो, समृद्धी हायवे, सी-लिंक सारखे अवाढव्य प्रकल्प राबवून बड्या भांडवलदारांना कराच्या पैशातून कंत्राटं देणे, बिल्डर लॉबीला सर्व जमिनीवर कब्जा मिळून देण्यासाठी कायदे-नियम बनवणे, खाजगीकरण जोरात पुढे नेऊन भांडवलदारांच्या तुंबड्या भरणे, आणि या सर्वांच्या बदल्यात आपल्या पक्षाकरिता व स्वत:करिता दलाली घेणे; दुसऱ्या बाजूला कामगार विरोधी कायदे आणि नियम बनवत जाणे, तोकड्या कल्याणकारी योजनांची भीक देऊन जनतेचा असंतोष मर्यादित ठेवणे, पोलिस यंत्रणेमार्फत जनांदोलनांचे आणि कार्यकर्त्यांचे दमन करणे; भांडवलदारांच्या मालकीच्या प्रसारमाध्यमांच्या मार्फत सतत जात-धर्माचे मुद्दे तेवत ठेवणे आणि भांडवलदारांचे हित हेच जनतेचे हित आहे असे बिंबवत राहणे हे सर्व चालूच राहणार आणि त्यासोबतच जनतेची दुर्दशाही!

### अशीच आहे ही लोकशाही !

तर अशीच असते भांडवली लोकशाही! भांडवलदारांची, भांडवलदारांच्या हिताकरिता, भांडवलदारांच्या प्रतिनिधी पक्षांद्वारे चालवली जाणारी लोकशाही. विविध पक्षांमधील आपसातील स्पर्धा ही जनतेचे कल्याण करण्यासाठी नाही, तर भांडवलदार वर्गाच्या आपसातील स्पर्धेचे, लुटीच्या वाट्याचा जास्त वाटा मिळण्यासाठी होणाऱ्या स्पर्धेचे प्रतिबिंब असते. मालकांचे गट जास्त हिश्श्यासाठी झगडतात, आणि म्हणूनच त्यांची दलाली खाणारे पक्षही झगडतात. दिखाव्यासाठी मतं मात्र जनतेकडून घ्यायची असतात त्यामुळे "मंदिर-मशिद", "हिंदुत्व", "सर्वधर्मसमभाव", "भ्रष्टाचार", "देशभक्ती", "राष्ट्रवाद", प्रादेशिक किंवा जातीय अस्मिता, असे मुद्दे उभे करून जनतेला गुरंफटवून ठेवले जाते!

याला उपाय एकच! कामगार वर्गाने आपला स्वतंत्र राजकीय पर्याय उभा करणे. असा क्रांतिकारी कामगार पक्ष उभा करणे जो फक्त कामगार वर्गाने दिलेल्या निधीवर चालेल, आणि विचारधारा व राजकारण या दोन्ही बाबींमध्ये निर्विवादपणे कामगार-कष्टकरी वर्गाच्या बाजूने उभा असेल; असा पक्ष जो अस्मितेचे राजकारण निर्विवादपणे नाकारून कामगार वर्गाचे वर्गीय राजकारणच मांडेल; असा पक्ष जो निवडणुकांद्वारे आणि भांडवली संसदीय व्यवस्थेद्वारे मिळू शकणारे सर्व मर्यादित अधिकार मिळवण्यासाठी तर झगडेलच परंतु भांडवली राज्यसत्ता नष्ट करण्यासाठी जनतेला सतत क्रांतिकारी कार्यक्रमाची शिकवणही देत राहील.

# लोकशाहीची थट्टा चाललेली नाही, ही लोकशाहीच थट्टास्पद आहे!

पान 1 वरून

असलेल्या भाजपच्या सरकारवर विश्वासदर्शक ठरावावर राष्ट्रवादीने विरोधात मतदान न करता अनुपस्थिती नोंदवण्याचे जाहीर केले होते आणि बाहेरून समर्थन देण्याचेही जाहीर केले होते! नंतर वाटपाची मांडवली झाल्यावर शिवसेना सत्तेत सामील झाली. नंतर अजित पवारांच्या जलसिंचन भ्रष्टाचारावर 2014, 2019 च्या निवडणुकीत रान उठवणाऱ्या भाजपने 2019 मध्ये त्यांच्याच सोबत सरकार बनवले होते आणि हा तपास कधी पुढे गेलाच नाही! 2019 च्या निवडणुकीनंतर भाजपसोबत वाटणीचे गणित बिघडल्यावर, काँग्रेस-राष्ट्रवादीने मिळून राज्याचे वाटोळे केले आहे म्हणणाऱ्या शिवसेनेने तर चक्क या दोन पक्षांसोबतच सरकार बनवले, आणि 2.5 वर्षे सत्तेत मंत्रीपदांची मलाई खाल्यानंतर "हिंदुत्व" जागृत झालेल्या एकनाथ शिंदे गटाला अचानक या दोन पक्षांचे वास्तव पुन्हा समजले आणि ते ज्या भाजपचे 2.5 वर्षे वाभाडे काढत होते, त्याच भाजप सोबत सरकार बनवले!

म.वि.आ.च्या तिघाडीची निर्मिती करताना राष्ट्रवादीतीलच अजित पवार यांनी जे "बंड" केले होते, त्यातून राष्ट्रवादीची इतर गणितंही समोर आलीच होती, आणि पुढे जाऊन शिवसेनेसारख्या फॅसिस्ट पक्षासोबत युती करून काँग्रेसने सुद्धा त्यांची "धर्मनिरपेक्षता" किती निरपेक्ष आहे हे सिद्ध केले! भाजपने जो अजित पवारांसोबत 2019 च्या निकालानंतर "पहाटेचा शपथविधी" केला आणि त्यानंतर आता एकनाथ शिंदे गटाची जी सुरत-गुवाहाटी-गोवा अशी पंचतारांकित सैर करवली, त्यातून या नैतिकतेचे ढोल वाजवणाऱ्या पक्षाचे चरित्र पुन्हा एकदा सर्वांसमोर नागडे पडले आहे.

यातून काय समजले पाहिजे? "हमामात तर सगळेच नागडे" आहेत! समजले तर हे पाहिजे की रोज उठून हिंदुत्वाचा किंवा धर्मनिरपेक्षतेचा, भ्रष्टाचाराचा किंवा सदाचाराचा ढोल पिटणारे हे सर्व पक्ष एकाच माळेचे मणी आहेत आणि जनतेसमोर केली जाणारी भांडणं ही फक्त सत्तेचा वाटा मिळवण्यासाठी आहेत! तेव्हा नवीन सरकार म्हणजे अजून काही नाही तर लुटारुंच्याच टोळ्यांमधली झालेली आपसातील पुनर्वाटणी आहे! सध्या झालेल्या सरकार बदलाने तुमच्या-आमच्या जीवनात काहीतरी बदलेल अशा भ्रमात असाल, तर लवकर बाहेर आलेल बरे!

## 2.5 वर्षे एकनाथ शिंदेंनी काय केले?

आता एकनाथ शिंदेंच्या निमित्ताने "बाळासाहेब ठाकरेंचे हिंदुत्व", "पक्षनिष्ठा","विजोड युती", "महाराष्ट्राचे हित" असे शब्द रोज कानावर पडत आहेत, पण यांना खरोखरच "तत्वांची" (हिंदुत्वासारखे धर्मवादाचे मुद्दे कामगार-कष्टकरी वर्गासाठी तत्वाचे मुद्दे नाहीतच, तर आपल्या हिताच्या विरोधातील मुद्दे आहेत!) चाड असती, तर यांनी 2019 मध्येच शिवसेना का सोडली नाही? 2.5 वर्षे सत्तेची मलाई खाल्यानंतर थोडी कमी मलाई मिळतेय असे वाटून यांना सत्ता सोडण्याची उपरती का झाली? निधी मिळाला नाही असा जेव्हा हे लोकप्रतिनिधी गळा काढत आहेत, तो यासाठी नाही की तुम्हा-आम्हाला चांगली घरकुलं, शिक्षण, आरोग्य, रेशन देऊ शकले असते; तर याकरिता की यांना खाण्यासाठी पैसे कमी पडले! "धर्मनिरपेक्षता", "हिंदुत्व", "पक्षनिष्ठा", "तत्व", "नैतिकता" हे सर्व फक्त सत्तेच्या दलालीच्या जेवणासोबत तोंडी लावायचे पदार्थ असतात हे जनता आता चांगलेच समजू लागली आहे.

## हिंदुत्वाची आठवण कशी झाली?

साम-दाम-दंड-भेद या चाणक्याच्या घृणीत दमनकारी पद्धतीला सर्वात चांगले कोणी आत्मसात केले असेल तर भाजपने. आज आर्थिक संकट तीव्र होत असताना देशाच्या राज्यकर्त्या भांडवलदार वर्गाला गरज आहे की जनतेची मुस्कटदाबी करणारी धोरणे बिनविरोध लागू करता यावीत. याकरिता सामाजिक-राजकीय कार्यकर्ते, मानवाधिकार कार्यकर्ते, डावे कार्यकर्ते अशा सर्वांसहीत आता विरोधी पक्षांवरही दमनाचा बडगा वापरणे आवश्यक बनले आहे. म्हणूनच ईडी, सीबीआय, इन्कम टॅक्स खाते अशा संस्थांद्वारे विविध भ्रष्ट नेत्यांमागे चौकशांचा ससेमिरा लावला जात आहे. एकनाथ शिंदेचे सचिव सचिन जोशी यांच्यामागे ईडी लावली गेली होती हे आता सर्वज्ञात आहे. याचप्रकारे शिवसेनेतील अनेक नेत्यांना ईडीचा धाक दाखवून भाजपने आपल्याकडे "वळवले" आहे. हे सांगणे नलगे की अनेकांना संभाव्य सत्तेतील अजून मोठ्या वाट्याचे आमिष दाखवून, आणि रोख रकमा देऊनही वळवले असेलच. 2.5 वर्षे आराम करायला गेलेले "हिंदुत्व" अशाप्रकारे परत आले आहे! हे विसरू नका की हिंदुत्वाचे दुसरे ध्वजवाहक असलेल्या "भाजप"ला सुद्धा 2014 मध्ये राष्ट्रवादीच्या पाठिंब्याने सरकार बनवायला काहीच हरकत नव्हती!

## शिवसेनेचा इतिहास

मराठी माणुस, हिंदू, मराठी कामगार यांच्या हिताचा दिखावा करत असताना, मुंबईतील बड्या भांडवलदार वर्गाच्या हिताचे रक्षण करण्यासाठीच उभी केली गेलेली फॅसिस्ट शक्ती हीच शिवसेनेची सुरुवातीची खरी ओळख. मुंबईत अत्यंत शक्तिशाली असलेली कामगार चळवळ मुंबईतील कापड मिल मालकांसाठी आणि त्यांचे प्रतिनिधी असलेल्या काँग्रेस पक्षासाठी डोकेदुखी बनली होती. अशामध्ये शिवसेनेची स्थापना झालीच ती मुळी कामगार चळवळीला खिंडार पाडण्याकरिता. काँग्रेसचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी याकरिता बाळ ठाकरेंना विखारी भाषणे करण्याची खुली सूट दिली आणि कायदा धाब्यावर बसवत केलेली भाषणे नजरेआड करत शिवसेना वाढू दिली. शिवसेनेने सुरुवातीला मराठी विरुद्ध दाक्षिणात्य कामगार हा संघर्ष उभा केला आणि कामगार चळवळीत फूट पाडण्याची सुरुवात केली. दाक्षिणात्य-मराठी, उत्तरभारतीय-मराठी, हिंदू-मुस्लिम अशाप्रकारचे बदलत्या अस्मितांचे राजकारण करत शिवसेनेने समाजातील बेरोजगारी, गरिबीने गांजलेल्या युवकांना दिखाऊ आक्रमकतेने आकर्षित केले आणि जनतेसमोर नकली शत्रू उभा करत आपली शक्ती वाढवली. अनेक कामगार नेत्यांचे, जनसामान्यांचे खून शिवसेनेने जाहीरपणे मिरवले आहेत. मुंबईतील भांडवलदार वर्गापासून ते महाराष्ट्राच्या प्रादेशिक भांडवलदार वर्गाचे प्रतिनिधित्व करण्यापर्यंत शिवसेनेचा मर्यादित विस्तार झाला आणि राज्यातील सत्तेच्या वाट्यातही शिवसेना दावेदार बनली. "शाखां"च्या माध्यमातून कॅडर आधारित संघटना उभी केलेली शिवसेना एक फॅसिस्ट पक्ष आहे. शिवसेनेकडे नव्हती ती एक परिपक्व, अखिल-भारतीय आवाहन करू शकणारी फॅसिस्ट विचारधारा जी संघ परिवार आणि तिचा पक्ष असलेल्या भाजपकडे आहे. त्यामुळेच आज बड्या देशी भांडवलदार वर्गाची सर्वाधिक पसंतीचा पक्षही ती बनू शकत नाही. शिवसेनेच्या या अपरिपक्व बांधणीमुळेच ती तितकी सक्षम फॅसिस्ट संघटना बनू शकली नाही जितका भाजप आहे. शिवसेनेची ही कमजोरी समजू शकल्यामुळेच, शिवसेनेचाच संधीसाधूपणा पुढे नेत आजपर्यंत छगन भुजबळ, गणेश शिंदे, नारायण राणे, राज ठाकरे आणि आता एकनाथ शिंदे अशी फुटीची मोठी परंपरा राहिली आहे.

## काँग्रेस-राष्ट्रवादीचे हिंदुत्वासमोर समर्पण

म.वि.आ. सरकार स्थापन झाल्यामुळे शिवसेनेला तिची कट्टरतावादी भुमिका सोडावी लागली, काँग्रेस-राष्ट्रवादीने शिवसेनेच्या "वाघाला" मवाळ केले, आणि एक "धर्मनिरपेक्ष" सरकार स्थापन झाले असे अनेक उदारवाद्यांना उगीचच वाटते राहिले आणि त्यापायीच उद्धव ठाकरेंच्या मवाळ व्यक्तिमत्वाची आणि या सरकारची भलावण करण्यात भलेभले मागे राहिले नाहीत. वास्तव मात्र याच्या ठीक उलटे आहे.

म.वि.आ. सरकार स्थापन होणे ही काँग्रेस-राष्ट्रवादी कडून हिंदुत्वाच्या राजकारणाला दिलेली मान्यता होती. गेल्या 2.5 वर्षांच्या संपूर्ण कार्यकाळात शिवसेनेने अनेकदा राम मंदिर आणि हिंदुत्वाच्या मुद्यावर आपली भुमिका मांडली आणि काँग्रेस-राष्ट्रवादीने तिला विरोध केला नाही. सत्ता जाणे निश्चित झाले असताना मंत्रिमंडळाने एकमताने औरंगाबादचे नाव संभाजीनगर, आणि उस्मानाबादचे नाव धाराशीव करण्याचा निर्णय घेतला आहे, जो काँग्रेस-राष्ट्रवादीच्या सहमतीनेच झाला आहे. विधानसभेमध्ये खुलेआम हिंदुत्वाचा उल्लेख होत राहिला, "जय श्रीराम"चे नारे दिले जात राहिले आणि काँग्रेस-राष्ट्रवादीला त्यावर कधीही आपत्ती नव्हती. एकंदरीत हिंदुत्वाच्या राजकारणाच्या वैधतीकरणावर काँग्रेस-राष्ट्रवादीने ठळक मोहोर मारली आहे.

यात आश्चर्य वाटण्यासारखेही काही नाही. शिवसेना बनलीच ती काँग्रेसच्या पाठिंब्याने, आणि नंतरच्या काळातील शरद पवार आणि बाळ ठाकरेंच्या मैत्रीचे(!) किस्से मोठ्या चवीने सांगितले जातात. स्वत:ला पुरोगाम्यांचे पुढारी म्हणवणारे शरद पवार तेव्हाही फॅसिस्टांशी मैत्री करून असत, ती यामुळेच कारण भांडवलदारांचे हित बघणे आणि बाजाराची व्यवस्था नीट चालवणे हे समान उद्दिष्ट दोघेही नीट उमजून होते. उदारवादी राजकारण यामुळेच फॅसिझमशी कधीही निर्णायक मुकाबला करू शकत नाही हे समजणे गरजेचे आहे.

## ही लोकशाहीची थट्टा नाही! भांडवली लोकशाही अशीच असते!

लोकप्रतिनिधींची खरेदी विक्री ही ना नवीन बाब आहे ना आश्चर्याची गोष्ट. 1985 मध्ये भारतात "पक्षांतरबंदी कायदा" करावा लागला, याचे कारण हेच होते की सत्तेच्या गणितांमध्ये एका पक्षातून दुसऱ्या पक्षात जाणे आणि लोकप्रतिनिधींचा घोडेबाजार ही नेहमीची सामान्य गोष्ट बनली होती! 1967 साली हरियाणात "गया लाल" यांनी एका दिवसात तीन पक्षात चक्कर मारली होती, आणि त्यानंतर अशा लोकप्रतिनिधींसाठी "आया राम, गया राम" म्हण अस्तित्वात आली. भांडवलदार आपले सामुहिक हित जपण्यासाठी ज्यापद्धतीने बाजाराचे नियमन करू पाहतात, त्याच पद्धतीने भांडवली राजकारणाच्या बाजाराचे नियमन करण्याकरिता हा कायदा आणला गेला. पण कायदा अपुरा पडला! 1/3 लोकप्रतिनिधींपेक्षा कमी जणांनी पक्षांतर केल्यास बेकायदा ठरवणारा कायदा कुचकामी ठरला कारण की "किरकोळी"ने बाजारावर निर्बंध आल्यावर "ठोक" भावाने खरेदी-विक्रीचा मार्ग अवलंबला गेला आणि अनेक पक्षांतरे झाली. त्यामुळे पुन्हा कायदा बदलून किमान 2/3 लोकप्रतिनिधींना पक्ष सोडावा लागेल असा बदल केला गेला, पण महाराष्ट्र, गोवा, मणिपूर इत्यादी राज्यांमध्ये नजिकच्या काळात झालेल्या घोडेबाजाराने या कायद्याचा कुचकामीपणा पुन्हा समोर आणला आहे.

## घोडेबाजार: भांडवलदार वर्गाच्या पसंतीचा खेळ

घोडेबाजार कोणता पक्ष करू शकतो? निश्चितच तो ज्याच्याकडे भरपूर पैसा आहे. कोणत्या पक्षाकडे सर्वाधिक पैसा असू शकतो? त्याच पक्षाकडे ज्याच्यावर बड्या कॉर्पोरेट भांडवलदार वर्गाची सर्वाधिक मर्जी आहे. त्यामुळेच 80च्या दशकापर्यंत काँग्रेस पक्ष सर्वाधिक घोडेबाजार करत होता, कारण टाटा-बिर्लासारख्या बड्या भांडवलदारांचा लाडका पक्ष तोच होता. आज ही भुमिका भाजपकडे आहे, कारण सर्वाधिक फंडींग भाजपलाच होत आहे हे लपलेले नाही! 2019-20 मधील अधिकृत(!) आकड्यांकडेच पाहिले तर भाजपला जवळपास 4,847 कोटी रुपयांचा निधी भांडवलदारांनी दिला आहे, तर इतर सर्व राष्ट्रीय पक्षांना मिळून फक्त 2,141 कोटी रुपये. हे सांगायला नकोच की अनधिकृत आकडे याच्या कितीतरी पटीने मोठे असतात. त्यामुळेच आज घोडेबाजारात सर्वात मोठा खरेदीदार भाजपच असू शकतो!

पक्ष कोणताही असो, भांडवलदार वर्गाकरिता घोडेबाजार हा पसंतीचा मार्ग आहे कारण सत्तेवर प्रत्यक्ष नियंत्रण या मार्गाने फार सोपे होऊन जाते. निवडणुका, जनतेला भुलावणे, आपसातील साठमारी हा सर्व प्रकार टाळून घोडेबाजाराच्या मार्गाने सत्तेमध्ये आपल्या मर्जीच्या पक्षाला पोहोचवता येत असेल तर काय वाईट?

## लोकप्रतिनिधी विकले का जातात?

लोकांनी "निवडून" दिलेले, अगदी गरीब पार्श्वभूमीतून आलेले, "लढाऊ" वगैरे प्रकारचे, जोरदार भाषणे देणारे लोकप्रतिनिधी विकले जातात तेव्हा अनेकांना वाईट वाटते. भांडवली लोकशाहीबद्दल भ्रम असणाऱ्यांना असे वाटते की "प्रामाणिक" लोक निवडून गेले पाहिजेत, जेणेकरून अशा गोष्टींना आळा घालता येईल. असे उदारवादी भ्रम पाळले जातात कारण की ते भांडवलाच्या शक्तीला समजत नाहीत.

भांडवली आर्थिक व्यवस्था ही माल खरेदी-विक्रीची व्यवस्था आहे. इथे माणसाची श्रमशक्ती सुद्धा माल बनते आणि मजुरीच्या

पान 14 वर

# एन.सी.ई.आर.टी. अभ्यासक्रमात बदल

## मोदी सरकारकडून इतिहासाचे विकृतीकरण




✎ सुस्मित

जुन 2022 मध्ये एन.सी.ई.आर.टी. (NCERT) ने शालेय पाठ्यपुस्तकांमध्ये पुन्हा एकदा बदल केले आहेत. 2002 च्या गुजरात दंगलींचा संदर्भ, 1975 च्या आणीबाणीने जनतेवर झालेले परिणाम, तसेच विविध सामाजिक-राजकीय आंदोलने आणि सामाजिक चळवळींवरचे धडे (यात नर्मदा बचाओ आंदोलन, दलित पँथर्स, भारतीय किसान युनियन इत्यादींचा समावेश होतो) समाज विज्ञानाच्या अभ्यासक्रमातून काढून टाकण्यात आले आहेत. हे काही पहिलेच बदल नाहीत. 2014 पासून आतापर्यंत तीन वेळा पाठयपुस्तके बदलण्यात आली आहेत; पण नुकतेच करण्यात आलेले बदल हे आतापर्यंत करण्यात आलेल्या बदलांपेक्षा व्यापक स्वरूपांचे बदल आहेत. या बदलांमागे विद्यार्थ्यांचा कामाचा भार हलका करण्याचे कारण जरी देण्यात येत असले तरी खरे कारण जनतेपासून इतिहास लपवून अस्तित्वात असलेल्या राज्यव्यवस्थेविषयी, शोषक वर्गाविषयी जनतेच्या मनात प्रश्न निर्माण होऊ न देणे हेच आहे. शोषक वर्गाचे कोणतेही सरकार असो त्यांच्या सोयीनुसार इतिहासाला लपवण्याचे, बदलण्याचे काम नेहमीच करते. या लेखात अभ्यासक्रमात नुकत्याच केल्या गेलेल्या बदलांविषयी जाणून घेऊ तसेच शोषक वर्गाला इतिहासामध्ये मोडतोड करण्याची गरज का पडते हे सुद्धा समजावून घेऊ.

### इतिहासाच्या पुस्तकांमध्ये करण्यात आलेले बदल

प्रत्येकच सरकार आपापल्या सोयीने पाठ्यपुस्तके लिहून घेत असते, त्यामुळे इतिहासाच्या पाठ्यपुस्तकांमधले बदल काही नवीन नाहीत. त्यांचा थोडक्यात आढावा घेऊ.

स्वातंत्र्यानंतर काँग्रेस हीच एक मोठी राजकीय शक्ती होती आणि जवळपास 60 वर्षे काँग्रेसचीच सरकारे सत्तेत होती. काँग्रेसने लिहून घेतलेला इतिहास हा पूर्णपणे देशी भांडवलदारांच्या बाजूचा इतिहास होता, ज्यामध्ये काँग्रेसचे वर्गीय चरित्र लपवण्याचा सतत प्रयत्न केला गेला. त्यामुळेच काँग्रेसचा भ्रष्टाचार, इंग्रजांसोबत सत्तांतरासाठी केलेल्या तडजोडी, ब्रिटीश भांडवलाला दिलेली साथ, टाटा-बिर्लांच्या बाँबे प्लॅनलाच देशाचे आर्थिक धोरण बनवणे, 1946 च्या नाविकांच्या बंडाला केलेला विरोध, भूमी सुधार कायदे लागू करताना जनतेशी केलेली गद्दारी, सामंतांच्या जमिनी जप्त न करता त्यांना भांडवली शेतकरी बनण्याची दिलेली संधी, काश्मीर आणि उत्तर-पूर्व राज्यातील जनतेशी केलेला विश्वासघात, देशातील विविध सामाजिक-राजकीय चळवळींचे दमन अशा अनेक गोष्टी इतिहासाच्या पानांमधून गायब असत. त्यानंतर जनता पक्षाच्या काळात आणि नंतर भाजपाच्या काळात पाठयपुस्तकांच्या भगवीकरणाला सुरुवात झाली. भौतिकवादी दृष्टीकोनातून इतिहास लिहिणाऱ्या रोमिला थापर आणि बिपीन चंद्र यांच्या पुस्तकांना देशविरोधी पुस्तके म्हटले गेले. वाजपेयी सरकारच्या काळात अभ्यासक्रमातला "मार्क्सवादी" प्रभाव काढून टाकण्याचा प्रयत्न केला गेला. यानंतर काँग्रेस सरकारच्या काळात पुन्हा भाजपाने केलेल्या बदलांना उलट करण्याचे प्रयत्न झाले. थोडक्यात सर्वच भांडवली सरकारांनी आपापल्या सोयीने इतिहास मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

नवीन केलेल्या बदलांमध्ये मोदी सरकारने भारताच्या इतिहासातील अनेक महत्वाच्या घटना, संकल्पना पाठपुस्तकातून गायब केल्या आहेत आणि खोटा इतिहास सुद्धा जोडला आहे.

### फॅसिस्टांनी घडवलेल्या दंगली

2002 मध्ये मोदी गुजरातचे मुख्यमंत्री असताना झालेल्या गुजरात दंगलींचे संदर्भ दोन पुस्तकांमधून काढून टाकण्यात आले आहेत. बारावीच्या राज्यशास्त्राच्या पुस्तकातील 2 पाने काढून टाकण्यात आली आहेत, ज्यांमध्ये घटनाक्रम सांगण्यात आला होता व कारसेवकांची रेल्वेची बोगी जाळण्यात आली आणि नंतर मुसलमानांवर हिंसा करण्यात आली असा उल्लेख होता. तसेच राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने गुजरात सरकारची हिंसा रोखण्यात अपयशी ठरल्याबद्दल टीका केली होती, हा सुद्धा उल्लेख होता. दुसरा संदर्भ बारावीच्या समाजशास्त्राच्या पुस्तकातला होता. यात एक संपूर्ण परिच्छेद काढून टाकण्यात आला आहे जो या आशयाचा होता, "आपल्या समुदायातल्या लोकांच्या प्रतिष्ठेसाठी धर्मवाद दुसऱ्या समुदायातल्या लोकांचा खून, बलात्कार करण्यास प्रवृत्त करतो." यावरून हे स्पष्ट आहे की मोदी सरकार आणि आर. एस. एस.च्या हिंदुत्ववादी राजकारणाचा काळा इतिहास लपवण्यासाठी हा बदल करण्यात आला आहे. बारावीच्या राज्यशास्त्रातला आणीबाणी वरचा लेख काढून टाकण्यात आला आहे. या धड्यात इंदिरा गांधींच्या काळात लावलेल्या आणीबाणीच्या काळात कशाप्रकारे सत्तेचा गैरवापर करण्यात आला, राजकीय कार्यकर्त्यांचे दमन झाले, मीडिया वर बंधनं लावण्यात आली, तुरुंगातल्या कैद्यांचा छळ, सक्तीने केलेली नसबंदी हे दाखवले होते. बारावीच्या समाजशास्त्राच्या पुस्तकातील आणीबाणीचा संदर्भ सुद्धा काढून टाकण्यात आला आहे. आणीबाणीत संसदेला स्थगित करून सर्व कायदे सरकारच बनवत होते, जनतेचे नागरी अधिकार काढून घेण्यात आले होते आणि अनेकांना तुरुंगात डांबण्यात आले होते याचे वर्णन काढले गेले आहे. मोदी सरकारच्या काळात सुद्धा कुठलीही आणीबाणी जाहीर न करता हीच परिस्थिती आहे. अनेक राजकीय, सामाजिक कार्यकर्त्यांना यु.ए.पी.ए सारखे कायदे वापरून तुरुंगात डांबण्यात येत आहे; जनतेच्या नागरी, लोकशाही अधिकारांचे दमन होत आहे, दहशतीचे वातावरण बनवले गेले आहे आणि विरोधाला पूर्ण दाबले जात आहे. जनतेने इतिहासातून बोध घेऊन सध्याच्या सरकारला प्रश्न विचारू नये यासाठीच हा बदल करण्यात आला आहे.

### लोकचळवळी

आंदोलने आणि सामाजिक चळवळींबद्दलचा धडाच गायब करून टाकण्यात आला आहे. या धड्यात चिपको आंदोलन, दलित पँथर्स तसेच नर्मदा बचाओ आंदोलन इत्यादी चळवळींबद्दल माहिती होती. याशिवाय सगळ्या पुस्तकांमधून नक्षलवाद आणि नक्षलवादी चळवळींबद्दल असलेले संदर्भ काढून टाकण्यात आले आहेत. फासीवादी मोदी सरकार ज्या पद्धतीने भांडवलदार वर्गाची सेवा करत आहे आणि जनतेची आंदोलने, चळवळी संपवण्याचं काम करत आहे, त्यांनी जनतेच्या चळवळी इतिहासाच्या पानांमधूनसुद्धा संपवल्या नसत्या तर नवल होते. वर उल्लेखलेल्या सर्व आंदोलनांच्या सैद्धांतिक कमजोरी होत्या, किंवा चुकीचे वर्गीय पूर्वाग्रह होते, किंवा नक्षलवादासारख्या चळवळीने सैद्धांतिक कमजोरींसहीत "अतिरेकिपंथा"चा मार्ग घेतलेला होता, परंतु तरीही ही सर्व जनतेची आंदोलने होती आणि त्यांना इतिहासातून वगळण्यामागचा उद्देश जनतेच्या संघर्षांचा संपूर्ण इतिहासच गायब करणे आणि जनसमुदायांचे अराजकीयीकरण करणे हा आहे.

### राजद्रोह

ब्रिटिशकालीन राजद्रोहाचा कायदा कसा स्वैर होता हे सांगणारा एक परिच्छेद काढून टाकण्यात आला आहे. सर्वच सरकारांनी या कायद्याचा वापर ("गैरवापर" नव्हे, कारण जो कायदाच गैर आहे, त्याचा प्रत्येक वापरच गैर असणार) विरोधाला दाबण्यासाठी केला आहे आणि आजही मोदी सरकार हाच कायदा वापरून सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, बुद्धिजीवी यांना खोट्या आरोपांखाली अटक करत आहे व त्यांचा आवाज दाबत आहे. त्यामुळे हा भाग पाठ्यपुस्तकातून वगळण्याचे कारण कुणालाही समजू शकेल.

### जातीव्यवस्था

वर्णव्यवस्थेबद्दलचा एक भाग कमी करण्यात आला आहे. यात जन्माच्या आधारावर ठरणारे व्यवसाय, अस्पृश्यता याबद्दलचे संदर्भ काढण्यात आले आहेत. चार आश्रमाबद्दल बोलताना महिलांना वेद शिकण्याची परवानगी नव्हती आणि त्यांना नवऱ्याने निवडलेला आश्रमच निवडावा लागत असे याचा उल्लेख काढून टाकण्यात आला आहे. महिलांना आणि शूद्रांना वेद फक्त ऐकण्याची परवानगी होती, शिकण्याची नव्हती याचा उल्लेख काढून टाकण्यात आला आहे. जातीभेदाबद्दलचा एक भाग काढून टाकण्यात आला आहे आणि अस्पृश्यता कशी काम करते याची उदाहरणे सुद्धा गाळण्यात आली आहेत. या उदाहरणांवरून मोदी सरकारची जातीय आणि महिलाविरोधी मानसिकताच समोर येते. भारतीय समाजाला लागलेला जातीचा कलंक हे सरकार लपवण्याचे काम करत आहे. दोन हजार वर्षांपूर्वी जणू सर्व काही आलबेल होते आणि लोक गुण्यागोविंदाने राहत होते अशी प्रतिमा उभी करून सध्याच्या समाजातले जातीचे भयानक वास्तव लपवले जात आहे. भारताच्या इतिहासाचे खोटे गोडगुलाबी चित्र उभे करण्याच्या संघ परिवाराच्या प्रयत्नांचाच हा एक भाग आहे.

### मध्ययुगीन भारतातल्या मुस्लिम राजवटी

पुस्तकांमध्ये दिल्ली सल्तनतीच्या दक्षिणेकडील विस्तारावरील धडा काढून टाकण्यात आला तसेच मुघल राजांचे यश उल्लेखलेला भाग वगळण्यात आला आहे. अवध, बंगाल आणि हैद्राबाद ही राज्ये मुघल साम्राजातून वेगळी झाली यांचा इतिहास गाळला आहे आणि राजपूत, शीख, जाट, मराठे यांचा इतिहास ठेवण्यात आलेला आहे. हिंदुत्ववाद्यांकडून नेहमीच मध्ययुगीन भारताचे सामंती वास्तव आणि सामंती राजवटींचा संघर्ष नाकारून इतिहासात हिंदू राजवट विरुद्ध मुस्लिम राजवट असा खोटा संघर्ष उभा केला जातो आणि आणि त्याच आधारावर आज भांडवलशाहीच्या काळात सुद्धा धर्माचे राजकारण करून कामगार वर्गामध्ये फूट पाडण्याचे काम केले जाते. मध्ययुगीन मुघल भारताचा इतिहास म्हणजे जणू काही अंधारयुग होते आणि मुघल साम्राज्याला आतापर्यंत पुस्तकात गरजेपेक्षा जागा देण्यात आली होती असा आक्षेप हिंदुत्ववाद्यांकडून घेण्यात येतो. हे करत असताना त्या संपूर्ण युगाचे सामंती शोषणाचे स्वरूपच झाकले जाते आणि वर्गसंघर्षाचा इतिहास झाकला जातो.

### राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे गुणगान

हरियाणाच्या सरकारने 9 वीच्या पुस्तकात संघाचे संस्थापक बळीराम हेडगेवार यांचे "सांस्कृतिक राष्ट्रवाद" वापरून स्वातंत्र्य चळवळ पुढे नेण्याच्या "योगदानाचा" उल्लेख केला आहे. त्यांचा उल्लेख "देशभक्त" असा करण्यात आला आहे. सावरकरांच्या योगदानाचा एक धडाच पुस्तकात टाकला आहे. पण ज्या प्रकारे त्यांनी ब्रिटिशांना माफीनामे लिहून जेल मधून सुटका करून घेतली व ब्रिटीशधार्जिणे राजकारण केले, आणि शोषणकारी समाजाच्या तत्वज्ञानाचे समर्थन केले त्याबद्दल अवाक्षरही नाही. आज जे संघ आणि भाजपावाले इतरांना देशभक्ती शिकवत असतात त्यांचे स्वातंत्र्य चळवळीत काहीच योगदान नाहीये. जेव्हा भारतातील क्रांतिकारक आणि चळवळीतले नेते ब्रिटिशांशी लढत होते तेव्हा संघ ब्रिटिशांच्या बाजूने हातमिळवणी करत होता; आपले खरे शत्रू ब्रिटिश नसून मुस्लिम आणि कमुनिस्ट आहे हे सांगत होता. खरा इतिहास जर समोर आला तर तोंडघशी पडावे लागेल म्हणूनच खोटा इतिहास लिहिण्याची गरज पडते.

### इतिहास बदलण्याची गरज का पडते ?

इतिहास लपवण्याची, खोटा इतिहास लिहिण्याची गरज फक्त शोषक वर्गालाच असते. जर जनतेला खरा इतिहास कळला तर जनतेला सध्याच्या व्यवस्थेबद्दल, सत्ताधाऱ्यांबद्दल प्रश्न निर्माण होतील आणि शोषणकारी व्यवस्थेच्या अस्तित्वावरही प्रश्न निर्माण होणे चालू होईल. म्हणूनच शोषणकारी सत्ताधारी वर्ग खोटा इतिहास लिहून जनतेच्या मनात विभ्रम निर्माण करत असतो आणि चुकीच्या प्रश्नांना उभे करून खऱ्या प्रश्नांना झाकण्याचे काम करत असतो. त्याकरिता सत्ताधारी शोषक वर्गाला अशी नवीन पिढी बनवायची असते जिच्यात वैज्ञानिक दृष्टीकोन रुजलेला नसेल, सत्तेला प्रश्न विचारण्याचे धाडस नसेल आणि जी या शोषणकारी व्यवस्थेची समर्थक बनेल. भाजपने अभ्यासक्रमात घडवलेले बदल याच उद्दिष्टाने केलेले आहेत.

• संपादक मंडळ – निखील एकडे, बबन ठोके • संपादकीय कार्यालय- रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग, 7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043
मो. नं. 8669735643 , 9619039793 • जागृति प्रिंटर्स, 12-ए, ग्राउंड फ्लॉर, भायखला सर्विसेज इंडस्ट्रीज, भायखळा, मुंबई - 9820017588 येथे मुद्रित